म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. ९११८३

# रसयात्रा : कुसुमाग्रजांची निवडक कविता

संपा. बा. भ. बोरकर
शंकर वैद्य

REFBK-0017550
REFBK-0017550

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थ
क्रमांक ७०६१० नि: ७/८
९८८३

# रसयात्रा :

## कुसुमाग्रजांची निवडक कविता

गेली चाळीस वर्षे मोठ्या निष्ठेने कुसुमाग्रज काव्यलेखन करीत आहेत. सत्य, शिव, सौंदर्य यांच्यावर आधिष्ठित असलेल्या नंदनवनाची उपासना करणाऱ्या केशवसुती संप्रदायाचे ते आजचे महत्त्वाचे प्रतिनिधी आहेत. सामाजिक समस्या, राजकीय घडामोडी आणि सांस्कृतिक चलबिचल या विस्तृत संदर्भाकडे पाठ न फिरवता स्वतःची सुखदुःखे, स्वप्ने आणि शकले यांची जोपासना करू पाहाणाऱ्या एका तरुण मनाची ही कविता जणू स्वतंत्र भारताची प्रातिनिधिक कविता आहे. लक्षावधी मने कुसुमाग्रजांनी शब्दाशब्दांतून बोलकी केलेली आहेत. त्यांच्या निवडक कवितांचा हा एकमेव संग्रह.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अ. क्र. ९८५५०

# कुसुमाग्रजांचे काव्यसंग्रह

जीवनलहरी

विशाखा

किनारा

मेघदूत

समिधा

मराठी माती

स्वगत

हिमरेषा

वादळ वेल

क्रमांक १७८३ नों: दि: २।१०

# रसयात्रा

## कुसुमाग्रजांची निवडक कविता

संपादक

वा. भ. बोरकर
शंकर. वि. वैद्य

REFBK-0017550
REFBK-0017550

कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

प्रथमावृत्ती. एप्रिल एकोणीसशे एकूणसत्तर.
मूल्य पाच रुपये.
प्रकाशक. अनिरुद्ध अनंत कुलकर्णी.
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, टिळकरोड, पुणे २.
मुद्रक. य. गो. जोशी, आनंद मुद्रणालय, पुणे
मुखपृष्ठ : पद्मा सहस्रबुद्धे. मुंबई १९.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
...... ...... क्रि: ......
...... ...... ...... दी: दि:

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| | प्रस्तावना | १-४० |
| १ | दूर मनोऱ्यात | १ |
| २ | हिम लाट | २ |
| ३ | स्वप्नाची समाप्ती | ३ |
| ४ | अहि–नकुल | ६ |
| ५ | किनाऱ्यावर | ९ |
| ६ | मातीची दर्पोक्ती | ११ |
| ७ | गोदाकाठचा संधिकाल | १३ |
| ८ | स्मृती | १५ |
| ९ | आगगाडी व जमीन | १६ |
| १० | क्रांतीचा जयजयकार | १९ |
| ११ | जालियनवाला बाग | २२ |
| १२ | जा जरा पूर्वेकडे | २३ |
| १३ | तरी ही केधवा | २५ |
| १४ | मूर्तिभंजक | २७ |
| १५ | कोलंबसाचे गर्वगीत | ३१ |
| १६ | पृथ्वीचे प्रेमगीत | ३३ |
| १७ | सात | ३५ |
| १८ | शेवटचे पान | ३७ |
| १९ | उषःकाल | ३९ |
| २० | प्रकाश प्रभू | ४१ |
| २१ | सैगल | ४२ |
| २२ | देवाच्या दारी | ४३ |
| २३ | टिळकांच्या पुतळ्याजवळ | ४७ |
| २४ | समिधाच सख्या या | ४९ |
| २५ | किनारा | ५० |
| २६ | वर्षा गमन | ५२ |
| २७ | विराट वड | ५४ |
| २८ | मायदेशचा वारा | ५६ |
| २९ | उत्तर रात्री | ५८ |
| ३० | प्रीती साठा प्रीती | ६० |
| ३१ | निळा पक्षी | ६१ |
| ३२ | ताजमहाल | ६२ |
| ३३ | उषा स्वप्न | ६४ |

३४ जीर्ण देवळापुढे ६७
३५ समाधान ६९
३६ पाऊल चिह्ने ७१
३७ फेरीवाला ७२
३८ नौका ७५
३९ कलंदर ७७
४० पालखी ७८
४१ पहाट पक्षी ७९
४२ रे परत पाखरा ८४
४३ बंधन ८६
४४ तुझे गीत ८८
४५ नाही ९०
४६ शिलारूप मी ९२
४७ आहे ती व्यथेची ९३
४८ भाव मोहन ९५
४९ स्मरण ९७
५० मूर्ती ९९
५१ मातीचे गायन १००
५२ आम्ही दोघे १०१
५३ लाट तेजाची १०३
५४ ध्रुव पद १०५
५५ खुलदाबाद १०८
५६ तेहि असे ११०
५७ मौन १११
५८ आग्न्याच्या किल्ल्यात ११२
५९ प्रवास सरला ११४
६० निराकार ११५
६१ जोगीण ११६
६२ मला हवा तो ११७
६३ पुनव ११८
६४ बाजीराव ११९
६५ पणती १२१
६६ स्पर्श १२२
६७ पांथस्थ १२३

६८ माध्यान्ह १२४
६९ औरंगाबाद १२५
७० नदी १२६
७१ पाप १२८
७२ गती १३०
७३ उषा–स्तवन १३२
७४ कैफ १३५
७५ तो पक्षी १३६
७६ नाटक १३९
७७ अतर्क्य १४०
७८ मार्जिन १४१
७९ सैनिक १४३
८० खाकी १४६
८१ मीच १४९
८२ स्मरण १५०
८३ मार्ग १५१
८४ हा चंद्र १५३
८५ नट १५५
८६ एका टक्केवाल्याचे मत १५६
८७ वगैरे १५८
८८ बेसूर १६०
८९ म्हणून १६१
९० या रस्त्याला १६२
९१ म्हणेन १६३
९२ कोण १६४
९३ तेव्हा १६६
९४ झाड १६७
९५ चाक १७०
९६ काही जीवनलहरी १७१
टीपा

● ● ●



# प्र स्ता व ना

कुसुमाग्रजांनी त्यांच्या काव्यलेखनास प्रारंभ केला त्याला आजवर सुमारे चाळीस वर्षे होऊन गेली आहेत. १९३३ पासून आतापर्यंत त्यांचे जीवनलहरी, विशाखा, किनारा, मराठी माती, स्वगत, हिमरेषा असे सहा काव्यसंग्रह—व समिधा हा गद्यकाव्याचा संग्रह—प्रसिद्ध झाले आहेत. याशिवाय हिमरेषेनंतर म्हणजे १९६४नंतरच्या काळातही त्यांनी लिहिलेल्या बऱ्याच कविता अनेक मासिकांतून प्रसिद्ध होत आहेत. कुसुमाग्रजांनी काव्यलेखनाला प्रारंभ केला त्यापूर्वीच आधुनिक मराठीतील केशवसुतांनंतरची गोविंदाग्रज, बालकवी यांची पिढी दिवंगत झालेली होती. तरीपण ज्यांच्या काव्यलेखनाला त्या पिढीच्या काळात प्रारंभ झाला होता असे तांबे, बी, सावरकर आदी कवी गोविंदाग्रज–बालकवी यांच्या अस्तानंतरही काव्यलेखन करीत होतेच. तांब्यांच्या काव्याला तर १९२० नंतरच्या काळात विशेष बहर आलेला होता व त्याच काळात रविकिरणमंडळाच्या रूपाने माधव जूलियन, यशवंत, गिरीश इत्यादींची तिसरी पिढी पुढे आलेली होती आणि नंतरच्या काळात स्वतःच्या विपुल काव्यरचनेनी भर त्यांनी मराठी कवितेत घातलेली होती. केशवसुत ते रविकिरणमंडळ या प्रदीर्घ काळातल्या काव्यलेखनातील काव्यानुभव, त्यांतील वैचारिक दृष्टी, सौंदर्यदृष्टी आणि जीवनविषयक वृत्ती अशी काही वैशिष्ट्ये कुसुमाग्रजांच्या मनावर आपला संस्कार निर्माण करून गेली आहेत हे काव्यपरंपरेची समज असलेल्या वाचकांना त्यांच्या कवितेच्या पहिल्या वाचनातच जाणवले. केशवसुत, मर्ढेकर अशा काही कवींचे मोठेपण पूर्वसूरींनी निर्माण केलेल्या काव्यपरंपरेच्या बाहेर पडून प्रकटलेले असते तर गोविंदाग्रज, बी यांच्यासारखे काही कवी परंपरेचा वारसा घेऊन येतात व त्यातूनही स्वतःचे स्वतंत्र असे श्रेष्ठत्व प्रस्थापित करीत जातात. कुसुमाग्रजांचा समावेश या दुसऱ्या

प्रकारात करता येईल. त्यांची कविता मराठी कवितेच्या अनेकधारी प्रवाहातूनच निर्माण झालेली एक वैशिष्ट्यपूर्ण धारा आहे.

केशवसुत व कुसुमाग्रज यांच्या सामाजिक विचारांचे नाते परस्परांशी जुळणारे आहे. केशवसुतांच्या मनात सत्य, शिव, सौंदर्य यांवर अधिष्ठित असलेले एक नंदनवन होते. ते त्यांचे आदर्श जीवनाचे सुखस्वप्न होते. त्यांच्या सर्वच विषयांवरील कवितांच्या मुळाशी जीवनासंबंधीचे सखोल चिंतन आहे व त्याचे धागे त्या आदर्श नंदनवनाच्या स्वर्गीय कल्पनेशी दृढतेने जुळलेले आहेत. त्यांची सामाजिक कविता ही त्या आदर्शाचा एक अविभाज्य भाग आहे. त्यांनी केलेला स्वातंत्र्य, समता, बंधुता यांचा पुरस्कार, विषमतेवर केलेला हल्ला ही त्या आदर्शाच्या प्रस्थापनेसाठी अपरिहार्य आहेत. कुसुमाग्रजांच्या कवितेत असे एक अखंडतेने सर्वच विषयांना केंद्रभूत असलेले स्वप्न नाही, तरीही त्यांच्या सामाजिक कवितेचे केशवसुतांच्या कवितेशी नाते जुळताना दिसते. ‘ नवा शिपाई ’, ‘ मजुरावर उपासमारीची पाळी ’ अशा केशवसुतांच्या व ‘ कोलंबसाचे गर्वगीत ’, ‘ बळी ’ अशा काही कुसुमाग्रजांच्या कविता एकत्र वाचल्या तर या दोन कवींच्या सामाजिक दृष्टीत व समाजाबाबतच्या वृत्तीत पुष्कळ साम्य आहे असे जाणवते; परंतु कुसुमाग्रजांच्या कवितेचा विकास मात्र थोड्या वेगळ्या अंगाने झालेला आहे. समाजवादी विचारसरणीने त्याला एक नवे परिमाण प्राप्त करून दिलेले आहे. सामाजिक विषमतेचा प्रश्न हा केवळ वर्तमान-काळातील नाही तर पिढ्या न् पिढ्या चालत आलेला सनातन प्रश्न आहे, केवळ महाराष्ट्र वा भारत यांपुरताच तो मर्यादित नाही तर श्रीमंत व गरीब, उच्चपदस्थ व दलित, जेते व जित यांच्यातील संघर्षाच्या स्वरूपात जगातील देशादेशांत त्याचे अस्तित्व आहे, ही मानवी स्वार्थी वृत्तीतून जीवनात रुजलेली, दृढमूल झालेली एक व्यापक समस्या आहे, अशा जगड्व्याळ स्वरूपात कुसुमाग्रजांना हा प्रश्न दिसू लागलेला होता. ही विषमता निपटून काढावयाची असेल तर, ‘ प्रखर आंदोलन उभारून क्रांती घडवून आणली पाहिजे, त्यासाठी दलितांनी आपल्यातील ताकद एकत्रित केली पाहिजे ’ ही हाक भोवतालच्या वातावरणात त्यावेळी घुमू लागलेली होती. राजकीय क्रांतीप्रमाणे या सामाजिक क्रांतीसाठीही ‘ यज्ञ ’ची आवश्यकता होतीच. कुसुमाग्रजांच्या कवितेने अवकाशाच्या ओसाडीत अजून मुक्या राहिलेल्या त्या पडसादांना याच काळात वाचा फोडली. केशवसुतांशी नाते असूनही कुसुमाग्रजांची कविता काळानुसार अशी आशय-दृष्ट्या वेगळी झाली. स्वतःच्या राष्ट्राच्या सीमा ओलांडून तिने सगळ्या मानवजातीच्या सुखदुःखांशी आपले नाते जोडले. म्हणूनच चिनी-जपानी युद्धात तेव्हा घडत असणाऱ्या

राक्षसी अत्याचारांनी व्यथित होऊन त्यांचा निषेधाचा सूर 'जा जरा पूर्वेकडे' या कवितेतून तीव्र उपरोधातून प्रकटला.

कुसुमाग्रजांच्या कवितेवर सावरकरांच्या कवितेचाही संस्कार घडलेला आहे हे दोघांनी अंगिकारलेली दिव्यदाहकाची पूजा व दास्यमुक्तीसाठी स्वीकारलेली आत्म-समर्पणाची वृत्ती या साम्यांतून दिसून येते. 'अनादि मी, अनंत मी, अवध्य मी भला। मारिल रिपु जगतिं असा कवण जन्मला' असे म्हणत बलवंतालाच आव्हान देणारी बलीची मृत्युंजयी जिद्द दोघांतही आढळते. सावरकरांच्या कवितेतील यज्ञ-कल्पनाही कुसुमाग्रजांच्या मनावर खोल संस्कार करून गेलेली आहे. सावरकरांच्या 'आकांक्षा', 'आत्मबल' व कुसुमाग्रजांच्या 'अहि-नकुल', 'मी जिंकले' या कवितां-तील विषय, वृत्ती आणि मांडणीतील साधर्म्य लक्षणीय आहे. कुसुमाग्रजांच्या कल्पनेचा थाट जरी स्वतंत्र असला तरी सावरकरांच्या व त्यांच्या कल्पनाविलासाची जात-कुळी एकच आहे. पण सावरकरांची राष्ट्रकल्पना, त्यांची राजकीय विचारसरणी, 'तुम्ही आम्ही सकल हिंदू। बंधुबंधू' असे बंधुत्वाचे नाते हिंदुत्वातून सांधण्याची वृत्ती यांतून सावरकरी कवितेला जो आग्रही पीळ प्राप्त झालेला आहे व काही ठिकाणी कवितेला साधनाचे स्वरूप प्राप्त झाले आहे, त्या सर्वांपासून कुसुमाग्रजांची कविता अलिप्त आहे. सावरकरी कवितेने स्वीकारलेल्या आशयाच्या मर्यादा कुसुमाग्रजांनी स्वीकारलेल्या नाहीत. पण केशवसुतांप्रमाणेच सावरकरांच्याही काव्यविश्वात एक संगती आहे. 'बद्धता-मुक्ती' या दोन विरोधी अवस्थांतला संघर्ष त्या काव्यविश्वाच्या केंद्रस्थानी आहे. राजकीय—सामाजिक—आध्यात्मिक अशा वेगवेगळ्या पातळ्यांवरील बद्धतेतून मुक्तीसाठी त्यांच्या मनाची उसळी असते. याच कारणाने राजकीय पारतंत्र्य व त्यातून मुक्ती यांचा विचार करताना 'मोक्ष मुक्ति हीं तुझीच रूपे, तुलाच वेदांती स्वतंत्रते भगवती! योगिजन परब्रह्म वदती' अशा स्वरूपात स्वतंत्रतेचे दर्शन सावरकरांना घडते. लौकिक व अलौकिक अशा दोन्ही अर्थांनी असलेला हा 'स्वतंत्रतेचा' धागा त्यांच्या कवितेत संगती निर्माण करतो. कुसुमाग्रजांचे विश्व असे एका केन्द्राशी निगडित, एकात्म नाही. (त्यांची कविता ही, 'प्रवासातच आहे प्रवासाची सांगता' अशा निर्णयास आलेल्या रसिक प्रवाशाची वाटचाल आहे.) तरीपण क्रांतिकारकाची युयुत्सू वृत्ती, मृत्यूंजयी जिद्द, कल्पनाशक्ती, अशा काही बाबतींत कुसुमाग्रजांची सावरकरांशी जवळीक दिसते.

पण मराठी कवितेत आशयदृष्ट्या पूर्वी न प्रकटलेला असा एक विशेषही कुसुमाग्रजांच्या राष्ट्रीय-राजकीय कवितेत आहे. क्रांतीला उद्युक्त झालेला समूह संगीनसज्ज

ब्रिटिश राजसत्तेला 'गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार' असे म्हणत निधडेपणाने सामोरा जातो आहे हे सामुहिक दृश्य मराठी कवितेत अपूर्व असे आहे.

केशवसुत, सावरकर, कुसुमाग्रज यांच्या कवितांतील साम्य व वेगळेपणा ध्यानात घेतल्यानंतर 'रविकिरणमंडळ' व कुसुमाग्रज यांच्या नात्याकडेही वळून पाहता, माधव जूलियनांच्या कवितेचे काही संस्कार कुसुमाग्रजांच्या कवितेवर झालेले दिसतात. माधव जूलियनांनी मराठीत आणलेल्या फारशी भाषेतील कवितेच्या ओघाचा कुसुमाग्रजांच्या कवितेवर अलसा संस्कार उमटलेला दिसतो. 'जीवनलहरी'त—

नैशापुरवासी कवि
आली तव साद मला
पेला भर मदिरेचा
जोवर हा घट भरला

असा जो उमर खय्यामला संदर्भ आलेला आहे व त्यालाच उद्देशून 'विशाखे'त जी कविता आली आहे ती माधवरावांनी उमर खय्यामविषयी जे कुतूहल निर्माण केले त्यातूनच आली असावी. माधवरावांनी रुबायांच्या रचनेसाठी जी जाती व रचना स्वीकारली तिचा उपयोगही कुसुमाग्रजांनी 'स्मृति', 'मातीची दर्पोक्ती' आदी कवितांत केलेला आहे. 'जीवनलहरी' या काव्यप्रकाराची रचना स्वतंत्र असली तरी रुबाया-रचनेशी तिचे जवळचे साम्य आहे. तरीपण हे संस्कार अतिशय गौण स्वरूपाचे मानता येतील. माधवरावांची 'संगमोत्सुक डोह' व कुसुमाग्रजांची 'माळाचे मनोगत' यांतील विषय, भावना, छंद या बाबतींतील साम्य मात्र अतिशय स्पष्ट आहे. 'तूं उंच गडी राहसि', 'प्रीतीविण', 'मेघास', 'आस' या कुसुमाग्रजांच्या कविता रविकिरणमंडळाच्या कवितेत सहज खपून जाणाऱ्या अशा आहेत. माधवरावांची व कुसुमाग्रजांची ताजमहालवरील कविता यांतील कल्पनासाम्यही लक्षणीय आहे. देवप्रिया, भ्रांत, भिल्लीण ही गझल-वृत्ते आणि भूपती, माधवकरणी, आदी जाती व काही छंदांसंबंधीचे आकर्षण माधवरावांच्या कवितेनेच कुसुमाग्रजांच्या मनात निर्माण केले असावे. त्यांची 'जा जरा पूर्वेकडे' ही ओळ तर माधवरावांच्या 'भ्रांत तुम्हां कां पडे' ची सहज आठवण करून देते. असे असले तरी कुसुमाग्रजांची कविता रविकिरणमंडळाच्या संस्कारांतून एकदम बाहेर पडली. एवढेच नव्हे तर रविकिरणमंडळाच्या काव्यातील उणीवा विशाखेतील सामर्थ्याच्या तुलनेने स्पष्ट दिसाव्यात एवढ्या प्रभावाने ती प्रकटलेली दिसते. तिचे स्वतंत्र तेज प्रकर्षाने जाणवावे असे तिचे स्वरूप होतेच

परंतु रविकिरणमंडळाची पार्श्वभूमी मिळाल्याने ते विशेषत्वाने जाणवले यात शंका नाही.

रविकिरणमंडळाच्या कामगिरीचा व मर्यादांचा विचार करणे हा वस्तुतः स्वतंत्र विषय आहे. परंतु त्यांच्या ज्या प्रकारच्या कवितांची पार्श्वभूमी कुसुमाग्रजांच्या उत्थानास पोषक ठरली त्यांसंबंधी थोडा विचार करणे अवश्य आहे. केशवसुत, बालकवी, गोविंदाग्रज या मोठ्या कवींनी निर्माण केलेली ताकद पचवून व तिचा उपयोग करून घेऊन रविकिरणमंडळाची पिढी जोमाने पुढे गेली आहे असे दिसत नाही. कधी कधी असा संशय येतो की केशवसुत, बालकवी यांच्या कवितेचे नेमके मर्म त्या काळातील काही टीकाकारांना जसे समजले नाही तसे रविकिरणमंडळातील कवींनाही समजले नसावे. नाहीतर माधव जूलियननांनी 'झपूर्झा,' या केशवसुतांच्या कवितेची, 'तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने 'झपूर्झा' ही कविता सदोष आहे. काव्यदृष्ट्या ती निष्कारण दुर्बोध व रूक्ष आहे. कारागिरीचा बाह्य भपका मात्र तिच्यात आहे म्हणून पुष्कळांना ती न समजताही आवडते. याच कवितेने मराठी आधुनिक कवितेत गूढगुंजनाचे खूळ पसरविले' अशी संभावना केली नसती. आणि रविकिरणमंडळाचेच सदस्य असलेल्या माडखोलकरांनी कर्वे, गोखले, आपटे, राजवाडे, परांजपे यांच्या तुलनेने केशवसुतांविषयी लिहिताना, 'पण आपल्या या समकालीनांच्या मानाने केशवसुतांनी प्रकट केलेली मनाची संस्कारक्षमता किंवा बुद्धीची आक्रमकशक्ती एकंदरीत सामान्य वाटते.' असा अभिप्राय दिला नसता. केशवसुतांनी कविता म्हणजे काय, ती कशी घडते, प्रतिभा, कल्पना या शक्ती म्हणजे काय, त्या काय कार्य करतात, प्रतिभेमुळे कवी सामान्याहून कसा वेगळा असतो, त्याच्या व्यक्तित्त्वाने अनुभव सौंदर्यरूप धारण करून कसा प्रकट होतो, ती प्रक्रिया कशी घडते, कवीने कसा ध्यास घेऊन लिहावयास हवे, यांचा शोध करून घेतलेला होता. जीवनाचे मर्म समजावून घेत, मनात मुरवून घेत, त्यांतून प्रतीत झालेल्या सौंदर्याच्या आधारे आत्मविकासाची वाट अव्यभिचारी निष्ठेने हा कलावंत चाललेला होता व त्या संबंधातल्या आपल्या अनुभवाचे सौंदर्यरूप आपल्या कवितांतून प्रकटवीत होता. त्या अनुभवातल्या सूक्ष्म, खोल छटा व्यक्त करता याव्या म्हणून धडपडत–तडफडत होता. यांतून कवीचे स्वतंत्र व्यक्तित्व, त्याची आत्मनिष्ठा, अनुभवाशी तादात्म्य, निर्मितीची अपरिहार्यता यांचे जे अनन्यसाधारण महत्त्व, मर्म उकलून स्पष्ट झाले होते ते काव्यक्षेत्रात वाटचाल करणाऱ्या उत्तरकालीन कवींना निश्चित मार्गदर्शक ठरणारे होते. परंतु 'बी' व काही अंशी रेंदाळकर यांचे अपवाद सोडता त्याची बौद्धिक जाणही इतरांना फारशी आली नसावी असे खेदाने म्हणावे लागते

केशवसुतांची कविता समजावून घेताना कविता या विषयाचे जे गांभीर्य प्रतीत होते, त्याची जी महानता जाणवते, ती नंतरच्या काव्यात अभावानेच आढळते. कविता हा अनन्यसाधारण व्यक्तित्व असलेल्या कलावंताच्या जीवनानुभवाचा सौंदर्यात्मक आविष्कार असतो या जाणीवेपासून रविकिरणमंडळाची कविता निखळलेली वाटते. त्या कवींच्या काही चांगल्या रचनांचे स्मरण ठेवूनही असे म्हणावे लागते की ही कविता अनुभवाची कलात्मक जाण कमी असलेली, अनुभवापेक्षा विषयाच्या विविधतेच्या मागे गेलेली, निवेदनात्मक शैलीत व सांकेतिक अलंकरणात अडकलेली, अनावश्यक तपशिलाने पसरट झालेली व वाचकांसाठी सोपी केलेली अशी होती. एखाद्या घटनेशी निबद्ध असलेला बऱ्यापैकीं तपशील पद्यात गुंफला की झाली कविता या प्रकारची विपुल कविता या कालखंडात निर्माण झाली. तिच्या तुलनेने कुसुमाग्रजांची अनुभवाचा कस, अनुभवाचा वेगळेपणा व कलादृष्टीची स्वतंत्रता असलेली कविता अधिकच प्रभावाने वाचकांच्या मनात ठसली.

माधव जूलियन व यशवंत यांच्या दोन कविता व कुसुमाग्रजांची एक कविता यांचा तुलनात्मक विचार केला तर कुसुमाग्रजांच्या कवितेत विशेष काय आहे हे प्रत्यक्षच स्पष्ट होईल. माधवरावांची ' पुरुषाची छाती ' ( स्वप्नरंजन ), यशवंतांची ' देहाचा पूल ' ( यशोधन ) आणि कुसुमाग्रजांची ' सात ' या तीन कवितांची तुलना करून बघण्यासारखी आहे. या तीनही कवितांत काही श्रेष्ठ मूल्यांसाठी साहस करून त्यात जीव गमावणारे वीर आहेत. माधवरावांनी कवितेच्या प्रारंभी,

> विनायकाची रसरसलेली कोठे प्रतिभा ती
> गात्रया पुरुषाची छाती ?
> प्रतिष्ठाच जी धर्माची ही स्त्री हिचियासाठी
> स्फुरावी पुरुषाची छाती;
> धन रक्षाया, धन वेचाया प्रिय तत्त्वासाठी
> भजावी पुरुषाची छाती;

या प्रकारच्या सोळा ओळींची रचना करून कोणकोणत्या मूल्यांसाठी छाती स्फुरावी याचे प्रतिपादन केले आहे. कवितेच्या एकात्म रूपाचा भंग करणाऱ्या ओळी पुढेही कवितेत आल्या, कवीने केलेल्या निवेदनाचे व भाष्याचे रूप तिला येत गेले. एखाद्या साहसातले नाट्य असे घडवून उभे करावे की ' धन्य, धन्य ' हे उद्‌गार हवे असल्यास वाचकांनी काढावेत, कवितेतील अबलेच्या साह्यास जो कोणी आला त्याचे व्यक्तित्व मनाला जाणवावे; पण असे येथे घडलेच नाही. ( तसेच

' विनायकाची रसरसलेली प्रतिभा हा संदर्भ वि. ज. करंदीकरांना असेल तर तोही अनाठायी ठरेल असे वाटते.) यशवंतांच्या 'देहाचा पूल' या कवितेत जळत्या खंदकावरून शिवाजीमहाराजांना जाता यावे म्हणून मराठे वीर खंदकावर पडतात व जळतात हा नाट्यपूर्ण विषय आहे. परंतु एकूण त्रेसष्ट ओळींच्या कवितेत—

पूर्वीच्या इतिहासाचें उलटतां पान एखादें
फुरफुरति अमुचे बाहू जरि गुलाम झालों बन्दे'

या प्रकारचे निवेदन व भाष्य करणाऱ्या प्रारंभी एकवीस व शेवटी सात अशा एकूण अठ्ठावीस ओळी खर्ची घातल्या आहेत. नाट्याचा मूळ गाभा वर्णन करताना,

'खंदकावरी झणिं कोण, आपुले देह टाकून, मज देइल पूल करून?"

असा प्रश्न राजांनी टाकताच,

निघतांच शब्द बाहेर, जन निजले त्यावरि चार
त्यांचिया शरीरांवरुनी छावणींत सगळे घुसले
कण्ठनाल रिपुचे चिरिले रक्त तृषित भाले प्याले

अशा ओळी येतात.

——गादीवर निजावे तितक्या शांतपणे ते 'चार जन' निजले आणि उरले ते निर्विकारपणे त्यांवरून गेले. उलट कुसुमाग्रजांची 'वेडात मराठे वीर दौडले सात' ही कविता प्रारंभापासूनच ते नाट्य घडवू लागते. 'श्रुति धन्य जाहल्या श्रवुनि आपुली वार्ता' या उपरोधपूर्ण ओळीपासून शिवाजीचे व्यक्तित्व जाणवावयास लागते. 'विसरला महाशय काय लावितां जात' या स्वाभिमान डिवचणाऱ्या कठोर प्रश्नाच्या परिणामातून प्रतापराव गुर्जराचे व्यक्तित्व आकार घेऊ लागते. त्याला आपली चूक कळते, कर्तव्याची ओळख पटते, पश्चात्तापाने त्याचे डोळे ओलावतात, त्याच्या मनाचा निश्चय होतो आणि 'कोसळल्या उल्का जळत सात दर्यात' या आवेगाने तो शत्रूवर तुटून पडतो. 'खालून आग, वर आग, आग बाजूंनी' अशा भडकलेल्या वणव्यात ते सात अभिमानी वीर पाखरांसारखे जळतात. 'वेडांत मराठे वीर दौडले सात' ही प्रारंभीची ओळ व त्यांचे बलिदान होते तेव्हा येणारी 'खग सात जळाले अभिमानी वणव्यात' ही ओळ, यांमधील 'वेडात दौडले' व शेवटी 'जळाले' या या दोन टोकांत त्या अनुभवाचे रूप कुसुमाग्रजांनी उत्कर्षाने घडविले. कुसुमाग्रजांची शैली चित्रांमागून चित्रे गतिमानतेने उभी करीत जाते व कवितेतील संपूर्ण अनुभव आपल्या साक्षीने घडतो आहे असा प्रत्यय येतो.

वरील तुलनेसाठी मी निवडलेल्या कविता नाट्यपूर्ण घटना असलेल्या आहेत. माधवरावांनी व यशवंतांनी लिहिलेल्या भावकवितेचे विस्मरण मला झालेले नाही. त्या भावकवितेतील व मर्ढेकरांपासून मराठी कवितेत आलेली अंतर्मुखता कुसुमाग्रजांच्या काव्यात त्याकाळी नव्हती किंवा अल्पांशाने होती म्हणून त्या प्रकारच्या त्या तिघांच्या कवितांची तुलना या ठिकाणी मला अभिप्रेत नाही. काव्यदृष्टीतील घटकांपुरतेच हे विवेचन मर्यादित आहे.

प्रायः कुसुमाग्रजांची कविता ही स्वतःच्या ठिकाणी, फारशी रमलेली नाही असे 'विशाखे'कडे पाहिल्यावर ध्यानात येते. त्यांच्या व्यक्तिमनाचा सभोवतालच्या सामाजिक, राष्ट्रीय सुखदुःखाशी असा संवाद जुळला की समाजमनच त्यांच्यातून बोलू लागले. कधी समूहात मिसळून, कधी समाजाचा प्रतिनिधी बनून, तर कधी समाजजीवनाचा अर्थ शोधणारा चिंतक बनून. कुसुमाग्रजांची मूळ दृष्टीच बहिर्मुख असल्यामुळे असे घडले असेल किंवा समाजमनाशी संवाद जुळल्यामुळे ही बहिर्मुखता निर्माण झाली असेल परंतु ती त्यांच्या कवितेत आहे हे खरे. 'जीवन-लहरी'तल्या चिंतनातही समाज, प्रेम, जीवन यांसंबंधी काहीतरी 'सांगावे' या वृत्तीतून बहिर्मुखता येतेच. यामुळेच स्वतःच्या आत्मपर अनुभवाचा शोध घेत तो घडवावा या मार्गाने ते फारसे गेलेले नाहीत. क्वचित याला काही अपवाद आहेत; पण अनुभव, घटना, प्रसंग हे त्यांच्या वैयक्तिकतेतून सुटे होत जातात व व्यक्तिनिरपेक्ष पण कलासापेक्ष असा त्यांचा घाट कुसुमाग्रजांच्या नजरेला दिसू लागतो. त्याला वस्तुनिष्ठ अस्तित्व येत जाते. त्यांच्या आत्मपर कवितांतही खोल आत्मगत सूर अबोल राहून 'ध्येय, प्रेम, आशा यांची होतसे का कधी पूर्ति' अशा सिद्धान्तवजा ओळी येतात किंवा तो आत्मगत सूर निसर्गवर्णनांच्या आधारे सूचित केला जातो. 'स्मृती' कवितेतल्या आठवणी मनात 'तुलनेने' जाग्या होतात, 'किनाऱ्यावर' मधील मीलनात 'जीवित दर्यापरी, नसें तें केवळ सुंदर, केवळ भीषण' अशा व्यक्तिबाह्य जीवनाला संदर्भ देणाऱ्या व काहीशा सुभाषितात्मक ओळी आलेल्या आहेत. प्रेमाची ओढ सुद्धा 'पृथ्वीच्या प्रेमगीता'च्या रूपाने व्यक्त होते. आत्मनिष्ठा व वस्तुनिष्ठा यांचे एक आगळेच मिश्रण त्यांच्या कवितेत झालेले आहे. आत्मनिष्ठेला पारखी नसलेली पण बहिर्मुखतेने अनुभवाचा घाट पाहणारी अशी, काहीशी सावरकरी थाटाची, ही कविता आहे. हा घाट मात्र कुसुमाग्रज अतिशय रेखीवपणे व रसरशीतपणे घडवतात. हा त्यांचा विशेष रविकिरणमंडळापासून त्यांना अलग करणारा आहे. केशवसुत ते रविकिरणमंडळ या काळातील कवितेतीच्या प्रदीर्घ पार्श्वभूमीवर प्रकटलेल्या 'विशाखे'तील कवितेचे

तिच्या वर उल्लेखलेल्या काही काव्यात्मक वैशिष्ट्याखेरीज आणखीही एका कारणाने अभूतपूर्व स्वागत झालेले दिसते.

'विशाखे'तल्या कविता १९३२ ते १९४१ या कालखंडात लिहिल्या गेल्या आहेत. या कालखंडात इंग्रजी राजसत्तेची मगरमिठी तोडण्यासाठी देशप्रेमी तरुणांच्या मनात निर्माण झालेल्या प्रबळ ऊर्मींचा व्याप आणि तीव्रता वाढत चाललेली होती. देशकार्याला भावना व विचार या दोन्ही दृष्टींनी असे मोल प्राप्त झाले होते की स्वातंत्र्य-पारतंत्र्य यांच्याशी निगडित असलेल्या अनेक जाणिवांना प्रतीकात्मक रूपे प्राप्त झालेली होती. हे कार्य म्हणजे एक धर्मकर्तव्य होते, त्यात मुक्तीचे सुख सामावलेले होते, देशासाठी मातृभूमी, हा शब्द उत्कट भावनात्मकतेतून योजला जात होता. अशा भारलेल्या वातावरणात 'शाप शृंखला' या शब्दांनी परतंत्र अवस्था कळत होती आणि 'उषःकाल, सूर्योदय' या शब्दांतून स्वातंत्र्याचे आगमन सूचित होत होते. एखाद्या देशात अशी मंतरलेली परिस्थिती निर्माण होते त्यावेळी त्या राष्ट्राच्या जाग्या झालेल्या अस्मितेला 'वर्तमानकालातील लढा हा स्वतःच्या प्रदीर्घ प्रवाही अशा इतिहासामधला एक अपरिहार्य टप्पा आहे असे दिसून त्या लढ्याची स्फूर्तिप्रद परंपरा समाजाला झळाळून दिसू लागते. इतिहासकालीन लढ्यांशी व वर्तमानकालीन लढ्यांचे भावनात्मक नाते या काळात दृढतेने जुळून येते. पराक्रमांची व बलिदानांची वर्णने युयुत्सू वृत्तीला आवाहन करीत राहतात. हेच सर्व विशाखेच्या आगमनकालात महाराष्ट्रात घडले होते आणि सगळे भारलेले वातावरण ज्वालाग्राही वृत्तीने अधिकच स्फोटक होत चाललेले होते. कुसुमाग्रजांची कविता हा त्या स्फोटक वातावरणाचा एक ज्वालाग्राही उद्रेक होता. देशभक्तांच्या मनातील द्वेष, चीड, निर्धार यांना कुसुमाग्रजांच्या कवितेने अत्यंत सुसंवादी रीतीने व्यक्त केलेले होते. म्हणूनच त्या कविता वाचताना, ऐकताना लोकमानसाला एक आपला कवी लाभल्याचा विलक्षण आनंद झाला. काळाचे व कवीचे हे जुळलेले नाते विशाखेच्या यशाला फार मोठ्या प्रमाणात कारणीभूत झाले.

सामाजिक परिस्थितीचा विचार करता असे दिसते की पाऊणशे वर्षांपूर्वीच आपल्या पारतंत्र्याची व मागासलेपणाची मीमांसा करताना रूढिग्रस्त, प्रवाहपतित समाज-रचनेतील दोषांवर विचारवंतांनी नेमके बोट ठेवलेले होते. वैचारिक मंथनाला समाजात प्रारंभ झालेलाच होता आणि स्वातंत्र्य, समता, बंधुता ही त्रयी लोकजीवनात रुजवली पाहिजे हा विचार पोटतिडिकेने प्रतिपादिला जात होता; साहित्यातही त्याचे पडसाद उमटले होते. तशातच समाजवादी विचारसरणीच्या प्रसारामुळे लोकांच्या

धारणेला एक नवेच तात्त्विक अधिष्ठान प्राप्त झाले. [कुसुमाग्रजांच्या बळी, लिलाव, गुलाम, सहानुभूती या कवितांत दलितांच्या विदारक दुःखाचे आविष्करण होते. 'देवाच्या दारीं' या कवितेत 'मी माझ्या भयातूनच देवाची निर्मिती केलेली आहे, वास्तविक मीच माझ्या जीवनाचा शिलेदार आहे' अशी स्वसामर्थ्याची घोषणा होती. 'यज्ञांत शुद्ध ही धरा करा' असे 'हा काठोकाठ कटाह भरा' या कवितेत आर्जवी आवाहन होते आणि 'कोलंबसाच्या गर्वगीता'त 'मानवतेचें निशाण मिरवूं महासागरांत जिंकुनी खंड खंड सारा' असा उफाळून आलेला मानवाचा आत्मविश्वास होता. अशा रीतीने सामाजिकदृष्ट्याही लोकमानस व कुसुमाग्रजांची कविता यांची एकतानता जुळून आली. सामाजिक व राजकीय या दोन्ही क्षेत्रांत क्रांती हेच उद्दिष्ट डोळ्यांसमोर असल्यामुळे कुसुमाग्रजांच्या कवितेतील "क्रांती"चा आविष्कार उभय अर्थांनी लोकांना वेधून गेला; एवढेच नव्हे तर अशा प्रकारचा प्रत्यक्ष राजकीय संदर्भ नसलेल्या प्रतीकात्मक कवितांतूनही (आगगाडी व जमीन, हिमलाट, अहि-नकुल, दूर मनोऱ्यात) लोकांना आपले मनोगत आढळले. त्यांतील संघर्षांचे राजकीय-सामाजिक क्षेत्रांतील संघर्षांशी सहजपणाचेच नाते सापडत गेले. 'स्वप्नाची समाप्ती' सारख्या भावपूर्ण प्रेमकवितेतही ध्येय, ध्वज, गड, दिवसाचे दूत या शब्दांतून राजकीय अर्थाची छाया अनेकांना भासू लागली]

तथापि एक कलावंत म्हणून कुसुमाग्रजांच्या दृष्टीने विचार करता 'विशाखे'तील सामाजिक व राजकीय कविता लिहिताना एका कलात्मक समस्येला त्यांना तोंड द्यावे लागले असले पाहिजे असे वाटते. आपल्या कालखंडातील जाणिवा व्यक्त करावयाच्या आणि कालखंडाची चौकट भेदून तोच आशय सार्वकालिकही करावयाचा हे घडवून आणणे अवघड होते. नाहीतर कित्येक वेळा सामाजिक व राजकीय जीवनातील समस्यांतून निर्माण झालेल्या कवितांचा आस्वाद घेताना त्यांचे मर्म पूर्णांशाने आकलन व्हावे यासाठी तत्कालीन विशिष्ट घडामोडींची पार्श्वभूमी समजावून घ्यावी लागते. कारण ते विशिष्ट वातावरण हे त्या काळातील अनेक कल्पनांचे आकलन घडविणारे माध्यमच झालेले असते. आणि मग ते कालमान बदलले की त्या त्या कवितांची आवाहनशक्तीही कमी होऊ लागते. [कुसुमाग्रजांनी विशिष्ट समस्येच्या तळाशी असलेल्या शाश्वत भावनेचा, व्यापक जीवनाशी असलेल्या तिच्या नात्याचा शोध घेऊन प्रतीकात्मक पातळीवर अनेक कवितांची उभारणी केल्यामुळे काळाशी जखडून ठेवणाऱ्या पेचातून त्यांची कविता सुटलेली आहे. [ 'दूर मनोऱ्यात', 'हिमलाट', 'अहि-नकुल', 'आगगाडी व जमीन', 'कोलंबसाचे गर्वगीत', 'पाचोळा' अशा कवितांतून ही

प्रतीकात्मक रचना दिसते. पण केवळ प्रतीकात्मतेने कवितेला सौंदर्य प्राप्त होते असेही नसल्याने कुसुमाग्रजांच्या अशा राजकीय–सामाजिक संदर्भ असलेल्या कवितांचे सामर्थ्य इतरत्रही शोधावे लागते. कोणत्याही अनुभवातील नेमके कोणते घटक कालनिरपेक्ष आहेत याचे पक्के भान ठेवून कलादृष्ट्या त्यांतील नाट्यबीजाला ते स्वतःचे लक्ष्य करीत जातात. त्या बीजाचे स्फुरण परिस्थितिजन्य असले तरी त्याचे आविष्करण अगदी स्वतंत्र, स्वयंपूर्ण, वस्तुनिष्ठ अशा स्वरूपात होते. म्हणूनच ही कविता आवाहनशक्ती गमावून बसत नाही. अहि–नकुलमध्ये सापाचा व मुंगसाचा संघर्ष आहे. मुळात खोलवर पाहता दोन सनातन विरोधी प्रवृत्तींचा, त्यांच्या ठायी असलेल्या शक्तींचा हा संघर्ष आहे. त्या संघर्षावर पक्की पकड राखून तिचा अंगभूत असा भाग म्हणूनच इतर अनेक थरांवरील अर्थच्छटा ती कविता व्यक्त करीत जाते. मुंगूस–सापाच्या द्वंद्वात अनेक परिस्थितिसापेक्ष द्वंद्वे वाचकाला भासमान होत राहतात पण मूळ संघर्षाचे अस्तित्व मात्र अबाधितच राहिलेले असते. कलावंताच्या दृष्टीनेही त्याच गाभ्याला केंद्र धरून लेखन झालेले असते. तेच त्याचे साध्यही असते. दोन विशिष्ट अर्थांमध्ये चातुर्याने खेळवत ठेवणारी रूपकात्मक किंवा प्रतीकात्मक रचना मराठीतल्या काही कवितांत केली गेलेली दिसते. अशा चातुर्योद्भव रचनेमध्ये कविता दोन वेगवेगळ्या पातळ्यांवर विभागली जाते. कुसुमाग्रजांच्या या प्रतीकात्मक कविता एकसंध असतात, केवळ कारागिरीशी संबंधित असलेल्या चातुर्याशी गुंतून पडलेल्या नसतात, हा त्यांचा विशेष आहे.

कुसुमाग्रजांच्या या प्रकारच्या काव्यलेखनाची प्रक्रिया अशी घडत असावी :–

ज्या अनुभवाचे व्यक्तरूप म्हणून प्रतीक येते त्या अनुभवाचा घाट प्रथमतः संघर्षमय रूपात कुसुमाग्रजांना आकलन होतो. त्याचवेळी दोन परस्परविरोधी शक्तींतल्या अटळ संघर्षातले विरोधी घटक जिवंत होऊन गतिमान होतात व त्यांत विविध प्रकारच्या ताणांचे नाते निर्माण होते. कवितेच्या विकासात हे ताण वाढून ठिणगी पडते किंवा ठिणगी नाही पडली तर त्या ताणांचे पीळ अधिकच पिळले गेलेले असतात. संघर्षात गुंतलेल्या दोन्हींपैकी कोठल्या तरी एका घटकाला पराभव पत्करावा लागतो, 'पृथ्वीचे प्रेमगीत 'मधल्या पृथ्वीप्रमाणे मूक ज्वलन स्वीकारावे लागते, किंवा तडजोडीचे समाधान स्वीकारणे भाग पडते. अशा परस्परविरोधी प्रेरणांत त्यांची कविता खेचलेली असते. कुसुमाग्रजांच्या कवितेतील सौंदर्याचा मूलस्रोत या नाट्यातून, या संघर्षातून, या विरोधातून उमटलेला आहे. ' विशाखे 'तल्या जवळ जवळ सर्व प्रकारच्या प्रमुख कवितांत याचा प्रत्यय येईल. ' विशाखे 'तील अगदी पहिल्याच

कवितेत ‘ वादळला हा जीवनसागर अवसेची रात ’ अशी ओळ येते आणि शेवटी नेमकी दुसऱ्या टोकाची ‘ अन् लावा हृदयांत सख्यांनो आशेची वात ’ ही ओळ घेऊन तिच्यावर कविता संपते. ‘आगगाडी व जमीन’मध्ये, ‘नको ग ! नको ग ! आक्रंदे जमीन ’ या ओळीत चिरडल्या जाणाऱ्या जमिनीच्या वेदना व तिला चिरडणाऱ्या गाडीच्या उन्मत्त सामर्थ्याचे आविष्करण येते तर शेवटच्या कडव्यात ‘ उलटी पालटी होऊन गाडी ती—हजार शकलें पडलीं खालतीं ’ या विरोधी अवस्थेत परिणती झालेली दिसते. ‘ अहि–नकुल ’मधला विषारी आग ओकीत येणारा नाग शेवटल्या कडव्यात ‘ पिंजून कापसापरि पडे तो नाग—ते खंड गिळाया जमले कीटक भोतीं ’ अशा केविलवाण्या अवस्थेत दिसतो. प्रारंभी, त्याच्यापुढे तृणाची पाती लवतात, झुडुपे हादरतात, पण शेवटी त्या सर्पाच्या रक्तातच ती तृणपाती आनंदाने न्हात असलेली दिसतात. ‘ तें होतें जीवित—अन् हा जीवितभास ’ या विरोधात टिळकांच्या पुतळ्याजवळ या कवितेचा घाट घडत येतो. ‘ पृथ्वीचे प्रेमगीत, ’ ‘ कोलंबसाचे गर्वगीत, ’ ‘स्मृति’ अशाही अनेक कवितांतून याच वैशिष्ट्यांचे दर्शन घडते. ‘ स्वप्नाची समाप्ती’मध्ये जवळ जवळ येणारा सूर्योदयाचा काल व त्याबरोबरच संपत येणारा प्रेमाचा सहवास यांतून निर्माण झालेला पीळ, मनात निर्माण झालेला धसका, यांतून त्या कवितेतील ताटातुटीचे दु:ख वाढत जाते. ‘ ना धन ना दारा ’ ‘ ना फूल ना कळी ’, ‘ न जाणें न नेणें, ’ ‘ प्रीतीचे वा कीर्तीचे धागे, ’ ‘ उधळलीस वा उधळशील तूं फुलें, ’ अशा कित्येक चरणांपर्यंत या विरोधात्मक रचनेची मुळे पोचलेली दिसतात. ‘ विशाखे ’तल्या पहिल्या कवितेतील पहिली ओळ—‘वादळला हा जीवनसागर अवसेची रात ’ आणि शेवटच्या कवितेतील शेवटची ओळ ‘ तव आंतर—अग्नी क्षणभर तरि फुलवावा ’ अशी आहे. या दोन ओळी जणू काही कुसुमाग्रजांच्या कवितेचे हे वैशिष्ट्यच सांगत आहेत असे वाटते.

विरोधातून नाट्य परिणामकारकपणे जाणवावे यासाठी त्या अनुभवातील क्रियांची जबरदस्त उलथापालथ दर्शवून ते प्रकट करण्याची कुसुमाग्रजांची पद्धती आहे. या क्रियांचे आघातही अगदी वज्रप्रहारासारखे नि:पात करणारे असतात ‘ हिमलाट ’ धरेस ‘ दुभंग ’ करीत जाते, इमला ‘ समूळ ’ कोसळतो, मूर्तीच्या ‘ ठिकऱ्या ठिकऱ्या ’ होतात आणि आगगाडीची ‘ शकले शकले ’ होतात. घन अस्तित्व असलेल्या घटकांत हे चलनवलन, उलथापालथ चालू असतेच परंतु सूक्ष्म भावसंवेदनांच्या बाबतीतही जे घडत असते तेही असेच आवेगपूर्ण असते. ‘ काय बोचतें हृदयाच्या अंतर्हृद-याला ’ असे बालकवींप्रमाणे कुसुमाग्रज सहसा म्हणणार नाहीत. ‘ भावपराग उरीं

थरथरले ' ( ' भक्तिभाव '—विशाखा ), ' भाव डोळ्यांतुन दाटले ' भरारा ' ('बंदी'—विशाखा ) असे ' थरथरले ', ' दाटले भरारा ' हे शब्द योजून भावावेगाचे चित्रण ते करतात. त्यांचा ' एकान्त ' सुद्धा ' एकान्त काळीज पिंजत बसे ' असा असतो ( माळाचे मनोगत ).

कुसुमाग्रजांच्या कवितेत अशा नाट्याचे आणि आवेगपूर्ण क्रियांचे दर्शन घडविले जाते ते भौगोलिक विश्वाच्या व मानवी जीवनाच्या भव्य संबंधात; कधी कधी त्यांच्या भव्य रंगमंचावर व तेही अगदी नाट्यपूर्ण आविर्भावांतून. याची, ' वादळला हा जीवनसागर ', ' हिमलाट पहाटे पहा जगावर आली ', ' क्रांति जगांवर अभिनव शिंपित ', ' जीवित दर्यापरी ', ' दिशांचें आम्हांला धाम ', ' या त्रिभुवन उजळित प्रभाकरा ' या ओळींतील जीवन, जग, दिशा, त्रिभुवन आदी शब्दांतून कल्पना येईल. हे भव्यतेचे वेड कुसुमाग्रजांच्या कवितेत अगदी ' जीवनलहरी 'पासून दिसते. अनुभव भव्य स्वरूपात पाहाणे, जाणवणे वा तो भव्य रंगमंचावर उभा करून चितारणे हा त्यांचा मनोधर्मच आहे. कुसुमाग्रजांना समूहाची सुख-दुःखे जाणवली, त्यांचा विचार करता करता विशाल मानवतेचा विचार त्यांत आला, त्यांच्या कोलंबसाला ' दिशांचे धाम ' दिसले, त्यांचे प्रेमगीत सुद्धा ' पृथ्वीचे प्रेमगीत ' झाले आणि नागाच्या फूत्कारात त्यांना ज्वालामुखीचा उद्रेक जाणवला. या भव्योत्कट मनोधर्मामुळेच त्यांच्या कवितांतील घटकांचा व कल्पनांचा आवाकाही अफाट होत जातो. काळोखाचा सागर बनतो, तारकांची दळे, वेताळांचे मेळे निर्माण होतात. शतकांमागून शतके, युगांमागून युगे येतात, काळाची असंख्य पाखरे थव्याथव्याने दाटतात, कणांकणांवर किरणे पसरतात आणि अणुअणूस उधाण येते. फुलांचे ताटवे बहरतात, प्रेतांच्या पाचोळ्यासारख्या राशी पडतात आणि मरणांच्याही माला तयार होतात. एकुलते एक आकाशसुद्धा ' सात नभाखाली ' सातपट उलगडते. हे वाढता वाढता वाढून अगदी मापनातीत होते तेव्हा ' अफाट अमर्याद, असीम, अथांग, अनंत ' अशा शब्दांत व्यक्त होत जाते.

वरील विवेचनात 'रंगमंच' हा शब्द हेतुपुरस्सर योजला आहे, कारण आशयातील घटकांना कुसुमाग्रज दृश्य नाट्याप्रमाणे आविर्भावात उभे करतात. गडबडा लोळणारा वात; लचकत, मुरडत, थबकत जाणारा सर्प, ( 'साप' नाही ! नादबंधाच्या दृष्टीने 'गर्व', 'दर्प', ' आक्रंदन ', ' दर्वळे ', ' कर्वत ' यांच्या मंडळात तो रफार असलेला ' सर्प 'च व्हावयास हवा ) ' घट हले शिरावर चरणचालीने धुंद ' अशी ठुमकत चालणारी वनराणी ' ( विशाखा ), ' वणव्यांच्या मेखला कमरेस बांधून तळहातावर ज्वाळा

नाचविणारा ग्रीष्म ( किनारा ), विषण्ण दृष्टीने नभास 'देखत' आविर्भावात उभा असलेला 'विराट वड ( किनारा ), 'दर्यावर आंदोलणाऱ्या लाल निळ्या रेषा' ( किनारा ), 'तडितांचे पैंजण बांधून नाचत गर्जत येणारी महाकाली' ( किनारा ), 'एकदम जागच्या जागी उभी राहिलेली वादळे' ( मराठी माती ), हे घटक कधी नाट्यपूर्ण आविर्भाव, हालचाली यांतून तर कधी खटका असलेल्या कृतीमधून नजर खेचून घेणारा मुद्राभिनय करतात. त्यात एक प्रकारचा दिमाख, ऐट असते. 'नाचवितां ध्वज तुझा' मधला 'नाचवितां', 'मानवतेचें निशाण मिरवूं' मधला 'मिरवूं' हे शब्द हीच ऐट दर्शवितात. वसंतऋतू येतो तो 'वाजत गाजत', कोकिळ गातो तोही 'आम्रांतून ललकारत.' हे सारे घटक झगझगीत, झळाळणारे, राजवर्खी वर्ण धारण करून येतात आणि सूक्ष्म मनोविकार, गूढ भाव, धूसर छटा कधी वर्णिल्याच तर त्यांनाही लखलखीत स्पष्ट रूप प्राप्त होते; त्यांना दृश्यत्व येते. याप्रमाणेच नादांचे सूरही—कुजबुजीपासून घोषणेपर्यंत—स्वच्छ, स्पष्ट असतात. सैगलची तानसुद्धा, 'तप्त कांचनाची जणू तू खेचतोस तार' अशी मूर्त होते. या सर्वांतून प्रकट होत येणारी भावना उंच स्वरातील व मन उद्दीपित करणारी असते. कुसुमाग्रजांच्या कवितेत अशा सर्व घटकांचे एक रसायन झालेले असल्यामुळे 'कोलंबसाच्या गर्वगीता'तला भव्य सागर व्यक्तित्व धारण करून प्रचंड उलथापालथीने मनात हेलावू लागतो आणि त्या कोलंबसाचा दुर्दम्य आवेश आपल्याचा मनातून प्रकटू लागतो. 'न जाणें न नेणें कुठे चाललें मी' असे म्हणणाऱ्या अगतिक पृथ्वीचे कारुण्य मनाला काचणारा पीळ पाडीत जाते. सळसळत येणाऱ्या पिवळ्या धमक नागाचे दाहक लावण्य धाक निर्माण करते, मुंगूस येताच तो थबकून मरणाचा कानोसा घेतो तेव्हा त्याला जाणवव असलेले मरणाचे भय आपल्या मनाला क्षणभर स्पर्शून जाते. नाट्यपूर्ण अनुभवान्तर्गत जी भावना असेल,—ती कधी आश्वासन देणारी असेल, कधी व्याकुळ करणारी असेल, कधी भयानकतेने चित्त थरारून टाकणारी असेल, कधी उद्दाम त्वेष निर्माण करणारी असेल, कधी मांगल्याने मन ओथंबवून टाकणारी असेल,—ती कवितेतून उत्कटपणे आविष्कृत होते. सर्व घटकांच्या एकमेळातून एक ठसठशीत लावण्यपूर्ण चैतन्याकृती निर्माण होते.

ही चैतन्याकृती साकार करण्यात कुसुमाग्रजांच्या कल्पनाशक्तीचा वाटा मोठा आहे. तिच्यामुळे त्यांना अनुभवाचे पैलू नवनवीन स्वरूपांत दिसत जातात. त्या पैलूंचा मुख्य आशयाशी जो संवेदनात्मक संबंध असेल नेमका तो संबंध त्यांच्या उपमानांतून आविष्कृत होतो. अहि-नकुल या कवितेतल्या सापाची गती, त्याचे रूप, त्याचा

स्वरूप प्राप्त झाले आहे. शैलीच्या या धाटणीने एकंदर कवितेला काही मर्यादाही निर्माण केलेल्या आहेत त्यांचे विवेचन पुढे येईलच.

विशाखेच्या संदर्भात आणखी एका मुद्याचा विचार महत्त्वाचा ठरतो तो म्हणजे लयीचा. त्यांच्या अनुभवातील भावस्रोत व नाट्यपूर्ण क्रिया घडविणाऱ्या घटकांच्या गतीस अनुकूल ठरेल असे वृत्त ते निवडतातच, परंतु क्रियेची वळणे, आघात त्या वृत्तातील लयीच्या तुकड्यातुकड्यांतून व्यक्त होतील याचीही काळजी ते घेतात. हे भान असल्यामुळे माधवकरणी, भूपती, चंद्रकांत, अष्टाक्षरी–षडाक्षरी छंद अशा जातींत व छंदांत नवेच अवसान संचारलेले दिसते. माधव जूलियनांच्या—

‘ विनायकाची रसरसलेली कोठे प्रतिभा ती
गावया पुरुषाची छाती ? ’

या ओळींत मोठ्या ओळीतील शेवटच्या ‘ ती ’ चे छोट्या ओळीतील ‘ छाती ’ शी यमक जोडल्याने त्या ओळींना स्थिरत्व येते. पुढच्या ओळींची आस मनास लागून राहात नाही. कुसुमाग्रजांना सागराचे हेलावणे व त्याला कोलंबसाने दिलेले आव्हान असे जाणवले की त्यांनी यमक उडवून देऊन ओळीचा आवाका असा वाढवून घेतला की——

‘ हजार जिव्हा तुझ्या गर्जु दे प्रतिध्वनीनें त्या
समुद्रा, डळमळु दे तारे ! ’

या दोन्ही ओळी एका जोमात म्हणता याव्यात; ‘ प्रतिध्वनीनें त्या ’ नंतर उच्चाराचा असा हिसका घेता यावा की उचललेली लाट वेगाने खाली यावी व ‘ विराट वादळ हेलकावु दे पर्वत पाण्याचे ’ ही ओळ वाचताना ती पुन्हा वर जावी आणि अनुभवातील आंदोलने योग्य शब्दांत प्रकट झाल्यामुळे त्यातून ते प्रक्षुब्ध समुद्राचे थैमान व त्याबरोबर कोलंबसाचा त्वेष–आविर्भाव दोन्ही जाणवावीत. अनुभवान्तर्गत आंदोलन व शब्दान्तर्गत किंवा चरणान्तर्गत असलेली लय यांच्या संबंधाचे कुसुमाग्रजांना हे भान असल्यामुळे त्यांच्या काव्यातील अनुभव त्यांना हव्या असलेल्या वजनाने, हव्या त्या सुरात प्रतीती देईल अशा पद्धतीने व्यक्त करता आलेला आहे.

विशाखेत आणखी असेही दिसते की कवितेची रचना विविध प्रकारच्या घाटांत झालेली आहे. ‘ स्मृती ’ या कवितेत प्रत्येक कडव्याच्या पहिल्या दोन ओळींत

दिमाखदार, धुंद करून टाकणारे दृश्य येते आणि ' परि स्मरते आणिक करते व्याकुल केव्हा ' ही भावपूर्ण कलाटणी देणारी ओळ प्रत्येक कडव्यात तिसरी येऊन चौथी ओळ प्रेयसीच्या भावपूर्ण आठवणीवर येऊन उतरते. ' स्मृती ' चा अनुभव नाट्यात्मकतेने व्यक्त करण्यासाठी ही रचनापद्धती अतिशय पोषक ठरलेली आहे. ' स्वप्नाची समाप्ती ' मध्ये जवळ जवळ येत चाललेल्या ताटातुटीच्या क्षणाचा धसका सारखा जाणवतो आहे. ' काढ सखे, गळ्यांतील तुझे चांदण्याचे हात ' ही ओळ हा धसका व्यक्त करीतच येते. भावनेच्या चढत्या बिंदूवर या ओळींचे आवर्तन आणून ही परिणामकारक रचना साधलेली आहे. त्या करुणरम्य ओळीच्या पुनरावर्तनाची मनाला नकळत आस लागून राहाते, परंतु कवितेच्या शेवटी नेमकी हीच ओळ अंतर्धान पावलेली असते. ती येत नाही याचाच अर्थ असा की प्रकाशाच्या पावलांची जी चाहूल लागलेली होती तिचे उजेडात रूपांतर झाले होते आणि त्या दोघांची ताटा-तूट झालेली होती. येथे एक रचनापद्धती, रचनेचा घाट कवीने स्वीकारला पण साचे-बंदपणाच्या आहारी न जाता तो कसा संयमाने व सूचकतेने हाताळला आहे याचेही प्रत्यंतर येते. ' मातीची दर्पोक्ती ' या कवितेत ' मातीवर चढणे एक नवा थर अंतीं ! ' या ओळींत अर्थाचा उत्कर्ष साधण्याची पुनरावृत्तीतून स्वीकारलेली रीत आहे. ध्रुवपदात्मक रचनेचा प्रकारही कुसुमाग्रजांनी काही कवितांत हाताळला आहे. एकदा ध्रुवपदात्मक रचना स्वीकारली की मध्यवर्ती अशी चमकदार कल्पना पहिल्या दोन ओळींत गुंफायची व नंतर अंतऱ्याच्या ओळींत उदाहरणे भरून पुन्हा ध्रुवपदावर यायचे असा प्रकार अनेक कवींच्या कवितांत आढळून येतो. परंतु ही गफलत होऊ न देता ' गर्जा जयजयकार ' मध्ये अर्थविकास साधला जातो. त्या ध्रुवपदाने क्रांति-कारकांचा निर्धार पुन्हा पुन्हा प्रकट व्हायला साह्यच होते. उलट असे म्हणता येईल की या कवितेला ध्रुवपदात्मक रचना आवश्यकच आहे हे ओळखून तशी रचना करण्यात कवीची कलादृष्टीच दिसून येते.

कुसुमाग्रजांच्या कवितांतली ही घाटबंद रचना अतिशय रेखीव असते. तिच्यात तपशिलाचा पसारा, पाल्हाळ, सैल रचना यांना जागाच नाही. कवितेच्या पहिल्या ओळीतच अनुभवाला हात घातला जातो व त्या अनुभवाचा उत्कर्ष घडवीत कविता शेवटच्या ओळींत नेमकेपणाने पूर्ण केली जाते. कलात्मक औचित्याची, संयमाची जाणीव कुसुमाग्रजांच्या मनात अखंड जागी आहे असे दिसते. तिच्यामुळेच कलाकृतीचे एकसंधत्व टिकून राहते। ' विशाखे ' पूर्वीच्या मराठीतल्या इतर कवितासंग्रहांशी तुलना करता इतक्या नीटनेटक्या व प्रमाणबद्ध कविता असलेला दुसरा कवितासंग्रह

मराठीत सापडणार नाही. या संग्रहाच्या यशाचा रसिकावर एवढा प्रभाव पडला की कुसुमाग्रजांच्या विशाखेपूर्वीच प्रकाशित झालेल्या ‘ जीवनलहरी ’ बद्दलही एका नव्या कुतुहलाने लोक विचार करू लागले.

जीवनलहरीत त्यांच्या वेगळेपणाची चुणूक दिसून गेलेलीच होती. बारा बारा मात्रांची एक एक ओळ अशा आठ–आठ ओळींचा एक एक बंध करून या जीवनलहरी लिहिल्या आहेत. प्रत्येकीत जीवनासंबधीचा एखादा विचार, कल्पना वा अनुभव स्वतःचे मनोगत दुसऱ्याजवळ सांगावे किंवा स्वतःशीच त्यासंबंधी चिंतन करावें या सुरात सांगितलेला आहे. हा सूर कवीच्या मनातली भावमयता, चिंतनशीलता प्रकट करतो व कवितांतील मूळ विचार वा कल्पनेची गोडी वाढवितो. एक वेगळा काव्य-प्रकार म्हणून रसिकांनी व समीक्षकांनी या संग्रहाची दखल घेतली. इतर कवींनी या प्रकाराचे अनुकरणही केले. कुसुमाग्रजांच्या पुढील विकासासंबंधीचा विसार या कवितांनी दिला असला तरी विशाखेशिवाय केवळ या कवितांच्या आधारावर कुसुमाग्रजांना मानाचे स्वतंत्र स्थान प्राप्त झाले असते असे वाटत नाही. कारण हा काव्यप्रकार असा आहे की लहान जीव असलेल्या अनुभवाचा आविष्कारच त्यात होऊ शकतो. एका जीवनलहरीत व्यक्त झालेल्या अनुभवात दुसरीने अधिक भर घालावी व या पद्धतीने सर्व कवितांतून एका व्यक्तिमत्त्वाचा विकास सुसंगतीने पूर्ण होत प्रकटत जावा अशा रीतीने हा काव्यप्रकार राबवला गेला तर जीवनलहरीप्रकाराचे वैशिष्ट्य अबाधित ठेवूनही त्यात वेगळे सामर्थ्य निर्माण करता येण्याची शक्यता आहे. परंतु या संग्रहात तसे घडलेले नाही. अनेक स्फुट रुबाया व कणिका मराठीत जशा काही काळ चमकल्या आणि अस्तंगत झाल्या त्याप्रमाणे जीवनलहरींचेही झाले असते, परंतु विशाखेमुळे कुसुमाग्रजांच्या जीवनलहरीलाही कवीच्या वाटचालीत गंगोत्रीचे स्थान आहे असे आढळून आले, आणि कुसुमाग्रजांच्या समग्र काव्याच्या संबंधात त्यांचा वेळोवेळी विचार केला गेला.

कुसुमाग्रजांच्या कलावैशिष्ट्यांचे मागील विवेचन प्रामुख्याने ‘ विशाखे ’च्या संदर्भात केले असले तरी ते काही अंशी ‘ किनारा ’ ‘ मराठी माती ’, व पुढल्या संग्रहांतील अनेक कवितांना लागू पडणारे असल्यामुळे विशाखेवर भर देऊन विवेचन केलेले आहे. ‘ स्वगत ’ व ‘ हिमरेषा ’ या संग्रहांत कुसुमाग्रजांच्या कवितेने नवीन वळणे घेतलेली आहेत. कुसुमाग्रजांच्या वृत्तीतील अंतर्मुखता वाढू लागली तशी त्यांची कविताही बदलू लागली. ‘ किनारा ’ पासून ‘ स्वगत ’ पर्यंत या बदलाच्या खुणा वाढत गेल्या व कवीची दृष्टी, अनुभवाचे रूप, लय या बाबतीत

‘ स्वगत ’ ने अगदी वेगळे रूप धारण केले आहे. विडंबनाचा सूर व मोकळीढाकळी संभाषणात्मक शैली यांमुळे ‘ हिमरेषा ’ त्यांच्या इतर संग्रहांहून वेगळा वाटतो. त्या सर्वांचा विचार करण्यापूर्वी ‘विशाखे’ च्या काही मूलभूत मर्यादांचा व ‘विशाखे’ नंतरच्या कवितांचा आलेख कसा उतरत सावरत गेला याचा विचार करणे आवश्यक आहे.

कुसुमाग्रजांच्या कवितेला प्रेरक झालेली वैचारिक मूल्ये समाजात अगोदर प्रसृत झालेली सर्वमान्य मूल्ये होती. साहित्यातून, राजकीय-सामाजिक लेखनातून त्यांचा अनेकदा उच्चार झालेला होता. या मूल्यांसंबंधी कविमनात आत्मगत असे चिंतन झाले असते तर व्यापक मानवी जीवनाशी असलेले त्या मूल्यांचे संबंध आत्मानुभवातून उकलत गेले असते व परिणामी कुसुमाग्रजांच्या कवितेला सखोल व व्यक्तित्वनिदर्शक असे स्वरूप आले असते आणि तिच्यात वेगळीच ताकदही आली असती. ही प्रक्रिया कुसुमाग्रजांच्या बाबतीत घडली नाही असे ‘ विशाखे ’चा विचार करताना वाटते. उलट सगळेच अनुभव असीम, अनंत, अमर्याद, अथांग, अगणित, अपार, असंख्य आणि शतशतके, लाख-नवलाख, कोट्यवधी आणि युगायुगांच्या भाषेत व्यक्त होत राहिले. कवीला जे जाणवले त्याचा प्रादेशिक व संख्यात्मक विस्तार मोठा परंतु अंतर्मुखतेतून येणारी सखोलता कमी असा प्रकार झाला. या प्रकारच्या भव्यतेत रमल्याने अनुभवाचा सूक्ष्म विचार करणे बाजूस राहिले; तसेच अनुभवाच्या तरल, गूढ अशा छटांनाही त्यांची कविता पारखी झाली. ‘ स्व ’च्या अनेक भुकांचे, सूक्ष्म भाव कंपनांचे सूर तिला ऐकू येईनासे झाले होते. त्यांचा शोध घेण्याची वृत्तीच त्या काळात नव्हती. विशाखेतली कविता प्रामुख्याने वस्तुनिष्ठ स्वरूपाची वा त्या स्वरूपास जवळ असणारी आणि सामूहिक भावनेचा आविष्कार करणारी म्हणूनच शुद्ध भावकवितेला आज दूरची वाटते. तसेच कुसुमाग्रजांच्या कल्पनाशक्तीचे व सौंदर्यदृष्टीचे स्वतंत्र तेज मान्य करूनही असे म्हणावेसे वाटते की ही सौंदर्यदृष्टी अभिजात साहित्याच्या परंपरेतून आलेल्या औचित्यतत्त्वांची बंधने मानणारी व जीवनविषयक अभिरुचीत लोकमान्य सभ्यतेचे संकेत सांभाळणारी आहे. विषय, भावना, कल्पनाविलास, विचार या सर्वच बाबतीत ती असे औचित्य साभाळणारी म्हणून लोकप्रिय धाटणीची आहे. अनेक राष्ट्रीय देवतांची पूजा करणाऱ्या कविता त्यांच्या आजवरच्या कवितासंग्रहात वैपुल्याने आढळतात. सर्वसामान्य लोकमानसाला भिडणाऱ्या तत्त्वांचे, विषयांचे आवाहन कुसुमाग्रजांच्या मनाला किती मोठ्या प्रमाणात होत असते याची साक्षच या प्रकारच्या त्यांच्या कविता देतात. लोकप्रिय विषय, सर्वसामान्य प्रतिक्रिया व औचित्यबंधने ही सर्व सांभाळून काव्यलेखन करू म्हटले की ते कलेसाठी आवश्यक असलेल्या

खऱ्याखुऱ्या वैशिष्ट्यपूर्ण आत्माविष्काराला आणि अस्सल नावीन्याला मारक ठरल्यावाचून राहात नाही./

रविकिरणमंडळाची पार्श्वभूमी कुसुमाग्रजांच्या उत्थानास जशी पोषक ठरली होती तशी रविकिरणमंडळ व कुसुमाग्रज, ( तसेच या दोहोंच्या परंपरेतून निर्माण झालेले कवी व इतर समकालीन कवी ) यांच्या कवितेची पार्श्वभूमी मर्ढेकरांच्या कवितेचे वैशिष्ट्य मनात ठसावे यासाठी कारणीभूत झाली. इकडे ' पिचेल मनगट परी उरांतिल अभंग आवेश ' तर तिकडे ' सह नौ टरकतु ', इकडे स्वातंत्र्याकांक्षेने उसळणारे वीर तर तिकडे ' मी एक मुंगी हा एक मुंगी ', इकडे ' निर्मितों नव क्षितिजें पुढती ' तर तिकडे ' विणीत बसल्या चिमणें जीवन; ' इकडे ' प्रकाशाचे विविध विलास ' तर तिकडे ' जिवाला अंधाराची आग लागलेली, इकडचे सारे सौंदर्य दिव्य-भव्य पण औचित्य कल्पनांना धरून तर तिकडचे साऱ्यांना ठोकरून किंवा नवी दृष्टी ठेवून. कुसुमाग्रजांची मूल्ये सर्वमान्य, कविता लोकप्रिय धाटणीची व सौंदर्य-दृष्टी औचित्य–तत्त्वे सांभाळणारी, तर याच्या उलट मर्ढेकरांची मूल्ये सर्वसामान्य सोडाच पण उलट धक्का देणारी, निष्ठांना मुळापासून तपासून पाहाणारी, हादरवून टाकणारी. कुसुमाग्रजांनी अस्मितेच्या गौरवगाथा गायिल्या, तर मर्ढेकरांनी जिण्याच्या झालेल्या विडंबनाचे चित्र कठोर उपहास करून चितारले. त्यांची सौंदर्यदृष्टी पारंपारिक कल्पनांपासून अगदी वेगळी, पारंपारिक नीतिकल्पनांशी तिचे असलेले ठरीव नाते तोडून टाकणारी होती. मर्ढेकर जीवनाविषयीचा व काव्याविषयीचा अगदी नवा दृष्टिकोन घेऊन पुढे आले होते. त्या दृष्टिकोनाने सारेच जुने–नवे साहित्यिक स्वतःकडे वेगळ्या नजरेने पाहू लागले. साहित्याविषयी प्रस्थापित झालेल्या अनेक कल्पनांमध्ये परिवर्तन होण्याची आवश्यकता त्यांनाही वाटू लागली. या व इतर काही कारणांमुळे 'स्वगत '-पासुनची कुसुमाग्रजांची कविता एकदम बदललेली दिसते.––मात्र मध्यंतरीच्या काळात त्यांचे ' किनारा ' व ' मराठी माती ' हे संग्रह प्रसिद्ध झालेले होते.

' किनारा ' या संग्रहात विशाखेमध्ये स्वातंत्र्याकांक्षी समूहाची जी भावना प्रकट वा सूचितपणे व्यक्त झाली होती तीच भावना काही वेगळ्या रंगांची भर घालून अवतीर्ण झाली. फरक एवढाच की प्रस्तावनेमधून आणि इतरांनी केलेल्या टीकांमधून ' मानवतेचा कवी, दलितांचा कैवारी ' अशा शब्दांत जी वैशिष्ट्ये वाचकांच्या व कदाचित् कवीच्याही मनावर बिंबविली गेली होती त्या मानवतेविषयी, दलितांविषयी स्वतःची काही वैचारिक भूमिका प्रकट करण्याची कवीस इच्छा झाली असावी. परिणाम असा झाला की कवीचा अकलात्मक अभिनिवेश त्यात मिसळला गेला.

(उदा० वैष्णव, कायदा) मानवतावादाचे, समतेचे, स्वातंत्र्यासंबंधीचे तत्त्वज्ञान समाजास या पूर्वीच कळलेले होते; काव्यातूनही त्याचे दर्शन घडलेले होते. आता मानवता, स्वातंत्र्य, समता हे शब्द चलनी नाण्यांसारखे वाटू लागले व ते मांडतानाचा अभिनिवेश काव्यात प्रचाराचा सूक्ष्म सूर ही मिसळवून गेला. तसेच 'समूहास आदेश, गौरवगान, समूहाचा प्रतिनिधी बनून केलेला आविष्कार, समूहाच्या नेत्यांचे गुणगान, समूहासाठी त्याग केलेल्या शत अनामिकांचे गान' अशा थाटाच्या समूहगीतांचे स्वरूप कवितांना प्राप्त झाले. 'आला किनारा', 'निळे चक्र हे!', 'माझा हिंदुस्थान', 'अजिंक्य निर्धार', 'जय भारता', 'नेताजी', 'मातीचा पुत्र', 'बलिदान' यांतील बहुतेक कविता वर निर्दिष्ट केलेल्या धाटणीच्या व चाल लावून म्हणण्यासाठी लिहिलेल्या आहेत. त्यांतील भावनाही ठराविक व स्थूल स्वरूपाच्याच आहेत. या कारणांनी या गीतस्वरूप कवितांनी जाणकारांच्या मनाची पकड घेतली नाही.

भारताला स्वातंत्र्य मिळाले तरीसुद्धा ते मिळाल्याचा आनंद व जयघोष व्यक्त करणारी किनाऱ्यातली कविता लोकमनाला आकृष्ट करू शकली नाही. याचे एक तात्कालिक कारण असे असावे की भारताच्या फाळणीचे दुःख, त्याप्रसंगी नेत्यांनाही जाणवलेली अगतिकता, निर्वासितांचे येणारे लोंढेच्या लोंढे, स्वातंत्र्यानंतर लागलीच झालेला महात्माजींचा वध आणि त्यामुळे महाराष्ट्रात निर्माण झालेले वातावरण आदी अनेक घटनांमुळे स्वातंत्र्यप्राप्तीचा आनंद निर्मळपणे मनात काठोकाठ भरून त्याचा निर्विकल्प चित्ताने आस्वाद घ्यावयास जनमनाची भूमिका हवी तशी अनुकूल नव्हती. त्यामुळे स्वातंत्र्यप्राप्तीचा आनंद व्यक्त करणारी कुसुमाग्रजांची ती गीते व १९४७ पूर्वी प्रसिद्ध झालेल्या पण 'किनाऱ्या'त समाविष्ट असलेल्या 'आला किनारा', 'सैनिक', 'अजिंक्य निर्धार', 'माता', 'नेताजी', 'सुभाष', अशा कविता पूर्णांशाने झेलल्याच गेल्या नाहीत. विशाखेला सामाजिक मनोभूमिका अनुकूल ठरली परंतु किनाऱ्याबाबत मात्र तसे घडू शकले नाही. स्वातंत्र्यानंतरच्या बदललेल्या परिस्थितीतील नव्यानेच दिसू लागलेल्या विविध प्रश्नांनी विचलित झालेल्या जनमानसाशी किनाऱ्यातली राजकीय-सामाजिक कविता आशयदृष्ट्या संवाद साधू शकली नाही. दुसरे असे की, विशाखेतील यशस्वी कवितांचे एक प्रकारचे अनुकरणच किनाऱ्यातील काही कवितांत घडलेले दिसते. कोलंबसाचे गर्वगीत आणि मातीचा पुत्र; गर्जा जयजयकार आणि अजिंक्य निर्धार या कविता एकत्र वाचल्या की या अनुकरणाची कल्पना येते. विषय, रचनापद्धती, कल्पनाविलास, शैली, भावना यांची जी वैशिष्ट्ये विशाखेत आढळतात त्यांचा एक साचा तयार होऊन कवितानिर्मिती होत आहे

आणि परिणामी तिचे अवधान व पृथगात्मता मात्र कमी होत आहे असे किनाऱ्या-तली कविता वाचताना आढळून येते. अशा अनेक कारणांमुळे ही कविता अग्नी, तेज, प्रकाश आदींनी युक्त असली तरी ती तिच्या आंतरिक तेजात उणावल्याने स्वत:चा फारसा प्रभाव पाडू शकली नाही.

वर उल्लेखिलेल्या कवितांहून विषयदृष्ट्या वेगळ्या असलेल्या कविता ‘ किनारा ’ त आहेत. परंतु त्यांत विशाखेच्या मानाने कवीने काही वेगळी उंची गाठली आहे असे आढळत नाही. तथापि ‘ विराट वड ’, ‘ उत्तररात्री ’, ‘ निळा पक्षी ’, ‘ देणगी ’, ‘ ताजमहाल ’, ‘ जीर्ण देवळापुढे ’, ‘ येशिल का आज दुपारी ’ या कवितांनी यशाच्या उतरत्या आलेखाला थोडेसे उचलून धरण्यास साह्य केले आहे यात शंका नाही.

‘ किनारा ’ संग्रहाबाबत अशी परिस्थिती असली तरी एका गोष्टीचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे आणि तो करताना किनाऱ्याच्याही मागे जाऊन एक धागा जोडून घ्यावयास हवा. कुसुमाग्रजांची कविता बव्हंशी बहिर्मुख, सामूहिक भावनांचा आविष्कार करणारी, भावकवितेला दूरची अशी असली तरी तिला अपवाद ठरणारा अंतर्मुखतेचा बारीकसा झरा अधूनमधून आपले अस्तित्व दाखवून गेलेला आहे. विशाखेतील ‘ स्वप्नाची समाप्ती ’, ‘ माळाचे मनोगत ’ या कवितांत कुसुमा-ग्रजांच्या मनाची आर्त भावस्थिती प्रकटलेली दिसते. ‘स्वप्नाची समाप्ती’मधील निसर्ग-वर्णनातून पहाटेच्या वातावरणाचा प्रत्यय येतानाच ‘ स्नेहहीन ज्योतीपरी मंद होई शुक्रतारा ’, ‘ स्वप्नासम एक एक तारा विरे आकाशात ’, ‘ प्राजक्ताच्या पावलाशी पडे दूर पुष्प–रास ’... अशा ओळींतून संपत आलेला स्नेह, विरणारी स्वप्ने, ढळणारे सौंदर्य यांनी व्यथित झालेल्या मनाची भावावस्था सूचित होते. ‘ गोदाकाठचा संधिकाल ’ या कवितेतल्या सुंदर निसर्गचित्रांतूनही कवीच्या मनाची कातरता प्रकटत जाते. अशी आत्मपरता किनाऱ्यात थोड्या अधिक प्रमाणात आलेली दिसते. मात्र आत्मपरता आली असली तरी यातल्या काही कविता त्यांतील अनुभव-बीजांवरच लक्ष खिळवून त्यांचा विकास न घडवल्याने फसलेल्या आहेत. ‘ तारका ’ या कवितेतील पहिल्या कडव्यात—

तुझिया तांबूस तेजाची ज्योत
देखता आकाशी निरभ्र नील
जननांतरीचे अंतरी गूढ
सौहृद उमले सुगंधशील

असे मनात खोलातून नाजुकतेने उमलत येणारे नाते हळुवारपणे प्रतीत होऊ लागते. हेच नाते मनातून अधिक विकासत यावयास हवे होते, म्हणजे त्यातूनच या कवितेला पूर्णता आली असती. परंतु पहिल्या चार ओळींनंतर कविमन त्या अनुभवाची खोली सोडून पृष्ठभागावरच येते आणि त्यामुळे—

अपार अंतर जोडून तुझे
प्रकाशकिरण धरतीवरी
येतात शोधत हृदय माझें
घरांत येणाऱ्या पाखरापरी

अशा अगोदर जुळलेल्या नात्याचाच पुनरुल्लेखाने विस्तार करीत नंतरच्या ओळी येतात. पाखराच्या कल्पनेतून पुढे 'ते किरण माझ्या श्रमलेल्या मनासाठी पिसांची शेज रचतात' असा विस्तार होतो व कविता संपवताना

स्नेहाचे रहस्य आपुल्या असें
निद्रिस्त जगास ठाऊक नाही
सस्मित होऊन आकाश मात्र
मीलन आपुलें पाहत राही !

अशी आवराआवर करणारे कडवे येते आणि मूळ अनुभवाला न्याय मिळालेला नाही हे ध्यानात येते. 'का येतेस' 'मीलन' आदी कवितांतही अशीच फसगत झालेली दिसते.

या तुलनेने 'येशिल का आज दुपारी ?' 'देणगी' या कविता निःसंशय सरस ठरणाऱ्या आहेत. 'देणगी' मध्ये मिटलेल्या वृत्ती अलौकिक संगीतमय स्पर्शाने प्रसन्न होत मनात दाटणाऱ्या आनंदाचे दर्शन आहे. त्या स्पर्शाने मनात घडलेल्या परिवर्तनाची जाणीव कडव्याकडव्यातून 'उमलें राजीव चांदण्यात !', 'हृदयी उजळ काही भासे', 'अंतरीचे गूढ उकलले धागे' अशी सातत्याने पण वेगवेगळ्या प्रकारे येत 'जीवनच सारें मुखरित झाले। अणूरेणू न्हाले संगीतांत !' अशा व्यापक अवस्थेस जाऊन पोहोचते. सावली, झाकळ, अंधार यांच्या पार्श्वभूमीवर चांदणे सौम्यपणे जाणवत राहते. धुके व संगीताचे स्वर त्यात मिसळतात आणि या स्वप्नरंगी वातावरणातून आनंदाने आर्द्र होत जाणारी मनोवस्था साकार होत जाते. या कवितेत 'आकाशाची फुले', 'पाखराच्या परी गीत आलापीत' व 'आणि आज पुन्हा' या ओळींनी सुरू होणारी तीन कडवी नसती तर कविता अधिक बांधीव झाली असती.

याच कवितेप्रमाणे ‘ येशिल का आज दुपारीं ? ’ ही कविताही उल्लेखनीय आहे. केवळ अंधारातच येऊन भेटणाऱ्या प्रियकराला ( ? ) ‘ भर दिवसां माझ्या द्वारीं । येशिल का आज दुपारीं ? ’ असा जो सवाल टाकला आहे त्यामागे ‘ केवळ अंधारातच आपण भेटतो ’ या जाणिवेतून निर्माण झालेल्या खोल खंतीचा ताण आहे.

पसरतो सुन्या मार्गांत
अजगरापरी एकान्त
लाजून सांदिकोनांत
सावल्या फिरत संसारीं

अशा अंधाराच्या वर्णनातून तिच्या दडपलेल्या व खंतावलेल्या मनाच्या अवस्था दर्शविल्या जातात. अंधारातून नाहत, पाय न वाजवता, अंधारातून सरपटत येणाऱ्या त्या प्रियकराचा चेहेरा नाही दिसला तरी त्याच्या कृतीतून त्याचे मन दिसते. त्या अंधाराने होणारा तिचा कोंडमारा ‘ शरमेंत कोंदली प्रीती—शंकेंत भावना सारी ’ ‘ भाविकता जाऊन विलया—भीतींची हो रहदारी ’ ‘ साकळून जीवन राहे—साचतसे डोह विखारी ! ’ या ओळींतून जाणवत राहतो. तिच्या कोंडमाऱ्यातून अंधारात कोंडलेल्या जीवनाची सूक्ष्म जाणीव मनात तरळून जाते व अर्थदृष्ट्या कविता खोल होत जाते.

किनाऱ्याकडून मराठी मातीकडे वळले की कुसुमाग्रजांच्या मनात संक्रमण घडू लागले आहे व त्यांची कविता स्वतःकडे अधिकच वळत आहे हे ध्यानात येते. त्यांच्यातला कोलंबस आता ‘ माझ्या साम्राज्यांत आतां । मीच भूप मीच प्रजा । माझ्या देवळांत झालों । मीच देव मीच पूजा । ’ असे म्हणणारा कलंदर झालेला दिसतो. या मानसिक संक्रमणामुळे कवितेत विषयदृष्ट्या वेगवेगळे अनुभव येऊं लागले आहेत ( सरस्वतीच्या नौका, कलंदर, दान, मातीचे गायन, बंधन इ. ) आणि प्रेमानुभवातही विविधता आलेली आहे. कल्पनापुष्पित शैलीच्या पकडीतून ही कविता अजून पुरती मोकळी झालेली नसली आणि पूर्वी हाताळलेल्या विषयांच्या संस्कारातून मुक्त झालेली नसली तरी तिच्या शैलीत व कवितांच्या मांडणीत ध्यानात यावा असा बदल घडू लागलेला आहे. या संग्रहातली बरीच रचना अक्षरछंदात झालेली आहे व आवश्यक तेथे मुक्त रचनेचा व मुक्तच्छंदाचाही अंगीकार तिने केलेला आहे. ‘पहाटपक्षी’, ‘गोपी’ अशी दीर्घ रचनाही केलेली आढळून येते. या संग्रहातल्या काही कविता मनावर त्यांचा ठसा ठेवून जातात.

माझ्या मातीचें गायन
तुझ्या आकाश श्रुतींनीं
जरा कानोसा देऊन
कधी ऐकशील का रे ?

ही 'मातीचे गायन' मधली पृथ्वीच्या प्रेमासारखीच उत्कट आर्जवी व्याकुळता मनाला स्पर्शून जाते. 'स्मरण' मधल्या एकेका ओळीतून त्या रसरशीत–जळजळीत मीलनाचे क्षण जिवंत होतात आणि 'आठवते का ?' अशा ओळीओळींत गुंफलेल्या त्याच्या प्रश्नातून तो क्षण न् क्षण त्यांतील धगीसह सांभाळीत राहिलेल्या त्याच्या मनाची—मातीलाही अतूटपणे बिलगून राहिलेल्या आकाशाच्या आठवणीची—कल्पना येते.

दोन विश्वें सांधणारी जाळणारी तेजोरेषा
आठवते का ?
उधाणून आल्या काही निराकार अभिलाषा
आठवते का ?
अंतरींच्या मौनाचेही निनादले प्रतिध्वनी
आठवते का ?
निमिषांच्या पंखावर निथळली संजीवनी
आठवते का ?

संकोचाचे दडपण जरा बाजूस सारून प्रेमासंबधी कुसुमाग्रज कसा मोकळा आविष्कार करू लागले आहेत व त्यांच्या जाणवण्यातही कसा फरक पडू लागला आहे याची थोडीशी कल्पना या ओळींवरून येऊ शकेल. 'बंधन' या कवितेत तर कुसुमाग्रजांना अनुभव–त्यांच्या एकूण कवितांची ठेवण लक्षात घेता–अगदी वेगळ्या प्रकारे दिसलेला आहे. ही कविता नवकवितेशीच त्यांचे नाते जोडते. पर्जन्यकाळातल्या दिवसाच्या वर्णनाने या कवितेला प्रारंभ होतो तेव्हाची उषा—

यौवनमत्त उषा
नवविधवेप्रमाणें अंगावर सावली पेहरून
केव्हातरी येते
क्षितिजाच्या भिंतीवर क्षणभर डोकें टेकून
जड पावलांनी निघून जाते
गूढ विषण्ण रहस्यासारखी !

या उषेच्या पेहेरावातून, गूढ–विषण्ण हालचालीतून विमनस्कता दर्शविणारी व इतर अनेक भावच्छटांनी युक्त अशी एक मनोवस्था साकार केली जाते. याच पद्धतीने धुराळलेल्या हातांनी राखेतले आसन्नमरण निखारे शोधणारी अशी दुपार व भ्रमिष्ट नजरेची अशी संध्याकाळ व्यक्तिरूपांत चितारून त्यांद्वारे त्या मरणोन्मुख दिवसाचे चित्र रेखाटले जाते. हे चित्र कवीच्या मनाचेच असते. जिण्याशी असलेले नाते विस्कटून तुटत असताना फक्त ‘ तिची ’ आठवण, गतात हरपलेला तिचा स्पर्श त्याला जीवनाशी बांधून ठेवीत आहे. या एका वळणात तिच्या आठवणीची शक्ती या कवितेत जाणवून जाते. अनेक अर्थवलये मनात निर्माण करून जाण्याची ताकद या कवितेत आहे.

मराठी मातीतल्या कवितांत संक्रमण घडताना दिसत असले तरी त्यातील इतर अनेक कवितांचा विचार करता या संक्रमणाला परिपूर्णता मात्र अजून आलेली नाही असे दिसते. आविष्कार ‘ मी ’ च्या भाषेत होत असला तरी तो अनुभवासंबंधी विधाने करून व्यक्त होताना दिसतो. स्वतःतल्या व्यापकतेचा घडलेला साक्षात्कार सांगताना ‘ दूरतेला आली आतां माझ्यापाशीं जवळीक। धरतीच्या मातीमधें स्वर्गाशीं हो सोयरीक ’ अशा ओळी कलंदरमध्ये येतात. येथे ‘ जवळीक ’ ‘ सोयरीक ’ इत्यादी नाती अनुभवरूपात प्रकटत नाहीत तर त्या नात्यांसंबंधीची माहिती देणारी विधाने कवितेत येतात. ही विधाने जीवनासंबंधी जाणवलेले नवे सत्य, नवा विचार यांचे बळ घेऊन येतात असेही होत नाही. शेवटी, चांगल्या कल्पनाजडित भाषेतले, भावनेचा सूर लावून केलेले निवेदन एवढेच स्वरूप त्यांना उरते. ( पाहा : वीज, कलंदर, प्रवासी, अभिसारिका इ. )

मराठी मातीत सामान्यतः अध्यात्माशी ज्यांची जवळीक जुळते असे शब्द, कल्पना, संकेत भरपूर प्रमाणात आढळून येतात. सरस्वतीच्या नौकांचा प्रवास सांगताना ‘ अपाराचे द्वार खुले होते, ’ खगाचे गायन ऐकून ‘ नास्तिकता निखळून पडते व हृदयात पूजन निनादते ’, ‘कलंदरमध्ये’ ‘माझ्या आत्मतेस नाही। आतां अहंतेचा पार। झालें अनंताचें घर। त्याला जीवनाचें दार ’ या शब्दांत स्वतःतील व्यापकतेची जाणीव सांगितली जाते. प्रेमकवितांत भक्तिभावाचा उल्लेख साक्षेपाने येतो. श्रद्धा, पार्थिवाच्या पलीकडे, कैवल्य, मुक्ती असे शब्द त्यांच्याशी निगडित असलेल्या पारंपरिक अध्यात्मपर अर्थाची आठवण करून देत कवितांत येतात. त्याचबरोबर काही कवितांचे अर्थही काहीसे कूट राहातात. या परिस्थितीमुळे कविता वाचताना लगोलग मनात प्रश्न निर्माण होतात की या संदर्भात येणाऱ्या कवितांतील

अनुभवाचे स्वरूप आध्यात्मिक आहे काय ? नसल्यास हे शब्द या कवितांत का येतात ?

मराठी मातीतल्या 'घरमालक', 'गुराखी' या कविता–अखेरीस ज्यांचा संबंध देवाशी जुळवता येईल अशा–कल्पनाचमत्कृतीवर आधारलेल्या आहेत तेव्हा त्यांचा वरील संबंधात विचार करण्याचे कारण नाही. 'कलंदर', 'दान', 'मातीचे गायन' यांचा संबंध अध्यात्मपर अनुभवाशी व अज्ञात शक्तीशी केलेल्या हितगुजाशी जोडता येईल. कवीच्या मनाचा एक विशेष या कवितांतून कळला तरी तांबे यांच्याप्रमाणे कुसुमाग्रजांचे व विशेषतः त्यांच्या काव्याचे ते एक ठळक वैशिष्ट्य ठरावे अशी भर या कविता त्यांच्या काव्यात घालीत नाहीत.

कुसुमाग्रजांच्या मनाला भव्यतेचे जे वेड आहे त्यातून 'असीम अनंतादी' शब्द जसे येतात तसेच काही भव्याचे वर्णन करताना 'अपारादी' शब्द या कवितांत आलेले आहेत आणि श्रद्धा, भक्ती, कैवल्य असे शब्द काही वृत्तिविशेष व भावच्छटा व्यक्तविण्यासाठी आलेले आहेत असा उलगडा त्या कविता बारकाईने वाचताना होतो. यांतल्या 'धीर', 'बंदिवान', 'अभिसारिका' या कविता अर्थाच्या दृष्टीने काहीशा मोघमच ठेवल्या गेलेल्या आहेत. जिवाशिवाचे प्रेम चितारणाऱ्या कवितांनी मराठी वाचकाच्या मनावर जे संस्कार करून ठेवले आहेत त्यामुळे या कविता वाचताना मन आध्यात्मिक वळणाने वाटचाल करून येते यात शंका नाही. परंतु या कवितांतील अर्थाची संदिग्धता अनुभवाचेच रूप गूढ वा गुंतागुंतीचे असल्यामुळे आलेली आहे असा प्रकार येथे नाही. ही संदिग्धता वाचकाला चकवीत ठेवणाऱ्या संदिग्ध मांडणीतून निर्माण झालेली आहे. कवितेत अनुभवाचा एक कंद सर्वांगांनी पोसत जावा व अनेक अर्थवलयांतून त्याचे एककंदत्व जाणवत राहावे. परंतु जेव्हा असे न होता, 'या प्रेमकविता, आध्यात्मिक कविता की अन्य काही ?' अशा दोन वा अनेक अर्थांत कविता वाचकाला चाळवीत–खेळवीत ठेवतात तेव्हा त्या शुद्ध कलाहेतूपासून ढळतात आणि त्या अनेक अर्थांचे कल सांभाळताना त्या कवितांतील अनुभवाचे विशिष्टत्व नाहीसे होऊन त्या सामान्य स्वरूपाच्या व काहीशा चमत्कृतिमय झालेल्या असतात. काहीसा हाच प्रकार 'धीर', 'अभिसारिकादी' कवितांबाबत घडलेला आहे.

आध्यात्मिक वळणाच्या कवितांसंबंधी सुचणारा एक विचार असा की मराठीत जिवाशिवाच्या कवितांची एक संकेतबद्ध चाकोरीच निर्माण झालेली आहे. 'परपुरुषाचें सुख भोगे तरी । उतरोनि करीं घ्यावें सीस' हे ध्यानात धरून काही नवे

जीवन अनुभवून व्यक्तविले गेले तरच अशा प्रकारच्या कवितांना वेगळे सामर्थ्य प्राप्त होईल; एरव्ही नाही.

मराठी मातीतल्या 'दीप लावतो', 'गाडीवाला', 'परंतु', 'आराधना', 'छाया', 'संवाद', 'बांधकाम' यांपैकी काही कविता गोष्टीरूप बनून, काही निवेदनात्मक व कृत्रिम बनून कलादृष्ट्या फसलेल्या आहेत. आणखी असे की कुसुमाग्रजांच्या शैलीत प्रश्नार्थक रचना बरीच आढळून येते. उदा. 'कोठे चाललीस अशी पाय वाजवीत चाळ ?' (अभिसारिका), 'कुठल्या मुलखामधून येसी कुठल्या मुलखा जासी' (वारा), तुझें नितळ नाजूक गीत आलें हें कुठून ?' (तुझे गीत), 'या अफाट कुरणावरीं फिरे हा कोण गुराखी तरी ? (गुराखी). कल्पनाविलासात रमण्याचा कुसुमाग्रजांच्या मनाचा जो एक विशेष आहे त्यातूनच हे प्रश्न निर्माण होतात असे वाटते. प्रश्न विचारून पुढील वर्णनासाठी अवकाश निर्माण करून घेतला जातो व कल्पनांनी तो अवकाश भरून काढला जातो. याशिवाय, 'की काय' असे उत्प्रेक्षाजनक शब्द कवितांच्या तपशिलात येत असतातच व त्यांतून अनेक कल्पना अवतीर्ण होत असतात. ही प्रश्नात्मक शैली कवीला विषयाच्या बाह्यागांच्या वर्णनाकडे घेऊन जाणारी ठरते. कुसुमाग्रजांच्या अनेक कवितांना या शैलीने मर्यादा निर्माण केलेल्या आहेत.

मराठी माती वाचून संपवताना, 'बंधन', 'स्मरण', 'मातीचे' 'गायन', 'पहाट-पक्षी, 'गोपी' आदी कवितांची आठवण मनात राहून जाते. या संग्रहात कवीच्या मनात जे संक्रमण घडत गेले त्या संक्रमणातूनच स्वगतमधल्या चांगल्या कवितांसाठी कवीची वेगळी मनोभूमिका तयार होत गेलेली दिसते. तिचे स्वरूप बघण्यापूर्वी आतापर्यंतच्या विवेचनाला जोडूनच कुसुमाग्रजांच्या निसर्गपर कवितांचे स्वरूप थोडक्यात बघता येईल.

निसर्गसौंदर्याविषयी कुसुमाग्रजांच्या मनाला असलेले आकर्षण त्यांच्या कवितेच्या अगदी प्रारंभापासून दिसून येते. प्रकाशालाच त्यांनी प्रभू मानले आणि 'यज्ञांत शुद्ध ही धरा करा' हे आवाहन त्यांनी त्या प्रभाकरालाच केले. बालकवींप्रमाणे 'सुखमय मंगल प्रेमाचे गीत' (विशाखा-नदीकिनारी) त्यांना निसर्गातूनच आढळले. 'निसर्गातली अनाद्यन्त सौंदर्याची दौलत जेव्हा नीरस आणि असुंदर वाटू लागेल तेव्हा या संसारातील सगळीच कविता संपून जाईल' असेही त्यांनी किनाऱ्यातील 'नवे-जुने' या कवितेत म्हटले आहे. निसर्गातून सत्यशिवसौंदर्य प्रतीत होत असल्यामुळेच कुसुमाग्रजांच्या कवितेत त्याला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. त्यातल्या सौंदर्याचे त्यांना विशेष आकर्षण असल्यामुळे त्यांनी निसर्गातील विविध

अवस्थांवर व सूर्य चंद्र, तारका, मेघ, वारा, पक्षी, यांच्यासंबंधी पुन्हा पुन्हा कविता तर लिहिल्याच परंतु अभिव्यक्तीचे माध्यम म्हणून, पार्श्वभूमी म्हणून निसर्ग सातत्याने त्यांच्या कवितांत आलेला आहे आणि त्यांच्या कविता त्या निसर्गसौंदर्याने उत्फुल्ल झालेल्या आहेत. त्यांच्या कवितेत प्रेम 'पृथ्वीचे प्रेमगीत' होऊन येते, त्यांची खंत 'माळाच्या मनोगतांतून' प्रकटते आणि त्यांची उध्वस्त, विमनस्क मनोवस्था 'बंधन' मधल्या एखाद्या दिवसांतून साकार होत जाते. त्यांच्या प्रवासी मनाचे पक्ष्यांशी व आभाळाशी तर फार जिव्हाळ्याचे नाते जुळलेले आहे. कवितांतून विविधरंगी, विविधविलासी निसर्ग साग्रसंगीत स्वरूपात प्रकटत असल्यामुळे कुसुमाग्रजांची कविता चित्रासारखी डोळ्यांना दिसत राहाते.

हे निसर्गचित्रण अनेक वेगवेगळ्या प्रकारांनी आलेले आहे. मूळ दृश्यातून नेमकी एक रेखीव आकृती तिच्या रंगरूपादी छटांसह चितारताना त्यात कवीची कल्पनाशक्ती विविध रंग, अर्थ भरीत जाते आणि त्यांतून एक देखणे दृश्य डोळ्यांसमोर हालचाल करू लागते—(उषःकाल, पालखी). येथे नयनरम्य असे सौंदर्य कोणालातरी दाखवावे अशी कवीच्या मनाची लगबग झालेली असते आणि त्यातून साहजिकपणेच वर्णनावर भर पडलेला असतो. कवीच्या मनात दाटलेला विस्मय, कौतुक, उल्हास, आनंद यांमुळे या दृश्यांना टवटवीतपणा आलेला असतो. ही दृश्ये कुसुमाग्रज काहीशी अंतरावरूनच बघत असतात. काही कवितांत कुसुमाग्रजांची भूमिका भक्तिभावाने स्तोत्र-स्तवन गाण्याची, आवाहन करण्याची, कृतज्ञता व्यक्त करण्याची असते. या कवितांत कवीची वृत्ती काहीशी अंतर्मुख होऊन निसर्गाशी भावसंवाद साधीत असते, यामुळे निसर्गाचे वर्णन करीत असतानाच——

या माझ्या हृदयावर देवा,
पवित्र अपुले पाउल ठेवा
अद्यापी अंधार रात्रिचा रेंगाळत अंतीं.

अशी भाविकतेने करुणा भाकणारी भावशीलता या कवितांत प्रकटते. डोळ्यांपुढे असलेल्या विषयाचे दृश्य-सौंदर्य कवीला एवढा अनिवार मोह घालीत असते की त्याच्या वर्णनासाठी कल्पनांमागून कल्पना येथेही येत असतात. कुठे त्याच्या मनातले कुतूहल 'पहाटपक्ष्याला' प्रश्नांमागून प्रश्न विचारीत राहते व त्यातूनही अनेक कल्पना अवतरतात. परंतु त्या विषयाशी स्वतःचा संबंध जोडून लिहिण्याची वृत्ती येथे असल्याने पहाटपक्षी व उषास्तवन यांसारख्या कवितांत कवीच्या भावनेचा सूर

अवस्थांवर व सूर्य चंद्र, तारका, मेघ, वारा, पक्षी, यांच्यासंबंधी पुन्हा पुन्हा कविता तर लिहिल्याच परंतु (अभिव्यक्तीचे माध्यम म्हणून, पार्श्वभूमी म्हणून निसर्ग सातत्याने त्यांच्या कवितांत आलेला आहे आणि त्यांच्या कविता त्या निसर्गसौंदर्याने उत्फुल्ल झालेल्या आहेत) त्यांच्या कवितेत प्रेम 'पृथ्वीचे प्रेमगीत' होऊन येते, त्यांची खंत 'माळाच्या मनोगतांतून' प्रकटते आणि त्यांची उध्वस्त, विमनस्क मनोवस्था 'बंधन' मधल्या एखाद्या दिवसांतून साकार होत जाते. त्यांच्या प्रवासी मनाचे पक्ष्यांशी व आभाळाशी तर फार जिव्हाळ्याचे नाते जुळलेले आहे. कवितांतून विविधरंगी, विविधविलासी निसर्ग साग्रसंगीत स्वरूपात प्रकटत असल्यामुळे कुसुमाग्रजांची कविता चित्रासारखी डोळ्यांना दिसत राहाते.

हे निसर्गचित्रण अनेक वेगवेगळ्या प्रकारांनी आलेले आहे. मूळ दृश्यातून नेमकी एक रेखीव आकृती तिच्या रंगरूपादी छटांसह चितारताना त्यात कवीची कल्पनाशक्ती विविध रंग, अर्थ भरीत जाते आणि त्यांतून एक देखणे दृश्य डोळ्यांसमोर हालचाल करू लागते—(उषःकाल, पालखी). येथे नयनरम्य असे सौंदर्य कोणालातरी दाखवावे अशी कवीच्या मनाची लगबग झालेली असते आणि त्यातून साहजिकपणेच वर्णनावर भर पडलेला असतो. कवीच्या मनात दाटलेला विस्मय, कौतुक, उल्हास, आनंद यांमुळे या दृश्यांना टवटवीतपणा आलेला असतो. ही दृश्ये कुसुमाग्रज काहीशी अंतरावरूनच बघत असतात. काही कवितांत कुसुमाग्रजांची भूमिका भक्तिभावाने स्तोत्र-स्तवन गाण्याची, आवाहन करण्याची, कृतज्ञता व्यक्त करण्याची असते. या कवितांत कवीची वृत्ती काहीशी अंतर्मुख होऊन निसर्गाशी भावसंवाद साधीत असते, यामुळे निसर्गाचे वर्णन करीत असतानाच——

या माझ्या हृदयावर देवा,  
पवित्र अपुले पाउल ठेवा  
अद्यापी अंधार रात्रिचा रेंगाळत अंतीं.

अशी भाविकतेने करुणा भाकणारी भावशीलता या कवितांत प्रकटते. डोळ्यांपुढे असलेल्या विषयाचे दृश्य-सौंदर्य कवीला एवढा अनिवार मोह घालीत असते की त्याच्या वर्णनासाठी कल्पनांमागून कल्पना येथेही येत असतात. कुठे त्याच्या मनातले कुतूहल 'पहाटपक्ष्याला' प्रश्नांमागून प्रश्न विचारीत राहते व त्यातूनही अनेक कल्पना अवतरतात. परंतु त्या विषयाशी स्वतःचा संबंध जोडून लिहिण्याची वृत्ती येथे असल्याने पहाटपक्षी व उषास्तवन यांसारख्या कवितांत कवीच्या भावनेचा सूर

व काही ठिकाणी त्याची चिंतनशीलताही प्रकटलेली दिसते. ' निळा पक्षी ' ' निळ्या गडावर ' या कवितांतही त्या विषयांशी कुसुमाग्रजांचा भावसंवाद असाच जुळलेला दिसतो.

वर वर्णन केलेल्या नात्यांहून काही कवितांत कुसुमाग्रजांचे निसर्गाशी अधिक जवळचे नाते असते. उदा० 'गोदाकाठचा संधिकाल' चितारताना ते वर्णनच प्रतिमा होऊ लागते आणि कुसुमाग्रजांची मनःस्थिती त्यातून सूचकपणे प्रकटत जाते. कुसुमाग्रजांच्या काव्यदृष्टीत फरक पडत गेला तसे निसर्गदृश्याचे चित्र उभे करण्याची त्यांची पद्धतीही बदलली आहे हे स्वगतमधले उन्हाळ्याचे रेखाटन ( माध्यान्ह ) पाहताना आढळून येते. येथे उन्हाळ्याचे व्यक्तिरूप सर्व लक्ष त्या ' अक्राळविक्राळ, उवड्या नागड्या उन्हाळ्यावरच ' खिळवून साकार केले जाते. स्वगतमधल्या ' आश्वासन ', ' पुनव ', ' पणती ' या कविता तर संपूर्ण निसर्गमय असूनही त्या निसर्गकविता उरत नाहीत. निसर्गातून कवीला भावानुभव जाणवत जातो किंवा भावानुभव निसर्गातून साकार होतो अशा प्रकारचे अभेदत्व व निसर्ग यांना आलेले आहे.

स्वगत हा कुसुमाग्रजांच्या कवितेच्या विकासाचा एक महत्त्वाचा टप्पा ठरतो. कलादृष्ट्या सामान्य ठरणाऱ्या कविताही या संग्रहात आहेत. परंतु यातल्या सुमारे वीस एक कविता अशा आहेत की ज्या कुसुमाग्रजांच्या एकंदर कवितांत वेगळेपणाने व त्यांच्यातील आंतरिक सामर्थ्याने उठून दिसतील. मराठी मातीत संक्रमणावस्थेत असलेली कुसुमाग्रजांची कविता आधुनिक नवकवितेने निर्माण केलेली ताकद नीटपणे आत्मसात करून स्वगतमध्ये भावकविता म्हणून निश्चित आकारास आलेली आहे. स्वगत हे संग्रहाचे शीर्षकच या परिवर्तनाची साक्ष देणारे म्हणून अन्वर्थक आहे.

या संग्रहातील पहिल्याच कवितेत, ' पापणीच्या केसात अडकलेल्या या थेंबाकडे तिऱ्हाईतपणे पाहू नका ' अशी ओळ येते. पापणीत असा अडकलेला अश्रू कुसुमाग्रजांना पूर्वी दिसलेला नव्हता. तसेच इतर कवितांत येणारे, उदासी मितभाषीण, राखी चेहेरा, अव्यभिचारी एकान्त, अशब्द झाडे, म्हातारे जळ, भीषण, शेवाळलेली नजर, स्वरहीन संथ मेघमाला, गंधप्रकाशाचा स्वर, शोधीत स्वतःसाठी एखादे नाव, प्रकाशाचे अंधुक थेंब, शांतीतील अन्वय असे अनेक शब्द कुसुमाग्रजांना कसे वेगळे जाणवू लागले आहे याची साक्ष देतात. आता ' कायमचा ' व ' जबाबदारी ' हे शब्दही सुंदर म्हणून कवितेत येतात. कारण सौंदर्याचा अर्थच कवीला आता अगदी वेगळ्या स्वरूपात प्रतीत झाला आहे. हे शब्द विशाखेत येणेच शक्य नव्हते, कारण त्यावेळच्या सौंदर्यदृष्टीचे आदर्शच वेगळे होते.

आता अंतर्मुखतेमुळे स्वत:संबंधी कवीला जागरूकता आलेली आहे आणि 'स्व' वरती कवीचे लक्ष केंद्रित झालेले आहे. त्यातला एक भाग वैचारिक चिंतनाच्या पातळीवरून व्यक्त झालेला आहे, आणि त्यात आपण नक्की कसे आहोत, आपणांस जीवनात हवे आहे तरी काय ? अशा मूलगामी प्रश्नांपर्यंत कवी येऊन पोहोचलेला दिसतो. (अनोळखी, मला हवा तो, मवाली, नाटक, जाणीव). या जीवनात आपल्या अखंड चाललेल्या भ्रमंतीचे सार काय ? यातून कोणते श्रेय आपल्या हाती आले ? तर 'या गतींतच आहे त्या श्रेयाचें संपादन; या प्रवासांतच आहे प्रवासाची अंतिम सांगता' हा निष्कर्षच कवीने स्वीकारलेला आहे. असे आहे म्हणूनच काव्यदृष्ट्याही या वाटचालीतले त्याचे स्वारस्य संपलेले नाही.

अशा शोधक वृत्तीने स्वत:कडे पाहिल्यामुळे अनेक खोल, अमूर्त, अबोध जाणिवांच्या आस्तित्वाचे आकलन कवीला होत आहे व त्याला कलारूप मिळून कुसुमाग्रजांची चांगली भावकविता निर्माण होत आहे. कवीच्या मनाचे दार अडवून बसलेली आस्तिकता त्याला मलिन वस्त्रे परिधान केलेल्या, गहन काळोखात गुरफटलेल्या एकतारीवर एकच एक गीत गाणारी 'जोगीण' होऊन जाणवते. सखीच्या सान्निध्याची सुखद, सुंदर जाणीव 'आज कार्तिकी पुनवेवरती श्वेतकमल तव समीपतेचें फुललें आहे' अशी नाजुकपणे प्रतीत होते. 'स्पर्श', 'सांची', 'माता' या कवितांतील स्पर्श, अव्यभिचारी एकान्त, भय या संबंधीच्या जाणिवा एक भावानुभव म्हणून कवीला आकलन होतात. काही खोल जाणिवांचे स्वरूप कवीचे कवीलाही अबोध राहत आहे; पण येथे ही अबोधत्वाची जाणीवही महत्त्वाची ठरते, कारण तेच त्या अनुभवाचे रूप असते व ते तसे व्यक्त होण्यातच त्याचे विशिष्टत्व असते. 'निराकार' या कवितेतले दु:ख

'या दु:खाला नाहीं आकार
नाहीं रंग नाहीं नांव
तें आहे माझें
पण मी ओळखत नाहीं त्याला

असे अबोध राहणारे आहे.

मला माहीत आहे इतकेंच—
तुझा रुपेरी रथ दूर जात असतां
या क्षितिजावर जो तरंगत होता
निळा पांढरा मेघ

त्या मेघांतच जन्म झाला
या निराकार दुःखाचा
आणि त्या मेघाप्रमाणेंच —
ते फिरते आहे आकाशाच्या पोकळींत
शोधीत स्वतःसाठीं
एखादें नांव, एखादी रेषा,
एखादी आकृती. '

या आविष्कारातून जे निनावी ' दुःख ' आकार घेते .त्यातच त्याचे विशिष्टत्व आहे

कवीला आता जे जाणवत आहे ते कल्पनाविलासात्मक, कल्पनारंजित स्वरूपाचे नाही. नुसत्या कल्पनाविलासाने झगमगाट, चमत्कार निर्माण होतो पण त्याबरोबर अनुभवात पोकळपणाही निर्माण होत असतो. येथे तो नाहीसा झाल्याने जाणिवांचे त्यांच्या चोख स्वरूपात कवीला आकलन होत आहे व जाणिवांच्या घनतेने कविता भरत चाललेली आहे आणि कवितांत कलात्मक गांभीर्य आणि आत्मप्रत्ययाचे बळ आलेले आहे.

कुसुमाग्रजांच्या पूर्वीच्या अनेक कवितांच्या घाटांना घाटांचा एक साचा म्हणून, कवितेविरहितही स्वतंत्र अस्तित्व होते. ती परिस्थिती स्वगतमध्ये राहिलेली नाही. आता अनुभवान्तर्गत घाटालाच अस्तित्व येते आहे व त्यामुळे अनुभवानुसार त्यात विविधताही अपरिहार्यपणेच येते आहे. आत्मानुभव हेच साध्य ठरल्याने तो कवीच्या कलात्मक मनाला जाणवत जाईल तसतसा त्या अनुभवाची आंतरिक लय धरून शब्द-प्रतिमांमधून आकारतो आहे. ' मौन ' या कवितेत—

' शब्द—जीवनाची अपत्यें—
मृत्यूपर्यंत पोहोचत नाहींत
म्हणून तुझ्या समाधीवर
मी वाहात आहे
माझें मौन '

या प्रारंभीच्या ओळींत शब्द जीवनाची अपत्ये असल्यामुळे मृत्यूपर्यंत पोहोचत नाहीत म्हणूनच जीवनाचा मृत्यूशी भावसंवाद घडू शकत नाही ही खोल जाणीव व्यक्त होते. पण त्या मृत्यूपर्यंत पोहोचता यावे ही खोल आंतरिक ओढ तर कवीच्या मनात तीव्रतेने दाटलेली आहे. ती ओढ घेऊन ते मौन—

‘ मृत्युसारखेच अथांग
अस्पष्ट अनाकार,
सारें आकाश व्यापून
अज्ञानाच्या प्रदेशाकडे
प्रवाहत जाणाऱ्या
स्वरहीन संथ मेघमालेचें
मौन. ’

असे साकार होत जाते.

‘स्वगत ’मध्ये कलादृष्ट्या सामान्य ठरणाऱ्या, ‘अनोळखी’, ‘यमुना’, ‘स्वधर्म’, ‘रस्ते’, ‘छंद’, ‘बंडखोर’, ‘कैलासलेण्यात’, ‘सीमेवर’, पाणी, यंत्र’ अशा कविताही आहेत. निवेदन करणे, एकच कल्पना पिंजणे, भाष्य करणे असे अनेक दोष अशा काही कवितांत आहेत. त्यांतल्या काही पराकाष्ठेच्या कृत्रिम व नकली वाटतात. परंतु त्या बाजूस सारून इतर चांगल्या कवितांकडे पाहिले की कुसुमाग्रजांच्या कवितेने निश्चित नवे वळण घेतले आहे या विषयी शंका राहात नाही. मागे उल्लेखिलेल्या ‘पणती’, ‘माध्यान्ह’, ‘आश्वासन’, ‘पुनव’, अशा निसर्गचित्रे रेखाटता रेखाटता त्यातून सुंदर भावानुभव प्रकट करणाऱ्या, कविता वाचल्या तरी कुसुमाग्रजांच्या कवितेने धारण केलेले नवे रूप प्रत्ययास येईल. स्वगत वाचताना कुसुमाग्रजांतला कलावंत त्याच्या खऱ्या आवाजात बोलत आहे असे प्रकर्षाने जाणवले.

‘ स्वगत ’ नंतरच्या ‘ हिमरेषा ’ ह्या संग्रहात कुसुमाग्रजांच्या वृत्तीचे व शैलीचे एक अगदी वेगळेच दर्शन घडते आहे म्हणून तो लक्षात राहील असे वाटते. या संग्रहात दिसणारे कुसुमाग्रज अतिशय मिस्किल व खोचक आहेत. पिटात बसून जीवनाचे नाटक पाहणाऱ्या समाजाची त्यांनी खरपूस चेष्टा केलेली आहे. प्रेमविषयाशी संबंधित असलेल्या ( ‘ नाटक ’ , ‘ अतर्क्य ’ , ‘ विलंदर ’ , ‘ एका टक्केवाल्याचे मत ’ ) कविताही खोचकपणाने लिहिलेल्या आहेत. यांतील बऱ्याच कवितांत नाट्य-छटात्मक पद्धतीचा ढंग उपयोगात आणलेला आहे. कवितांतली नायक-व्यक्ती वाचक संभाषणात सामीलच आहे असे गृहीत धरून त्याच्याशी अगदी खुल्या घरगुती आवाजात हसत-खेळत अघळपघळ गप्पा मारीत आहे, हास्याविनोद करीत आहे असे जाणवते. परंतु या गंमतीदार बोलण्यात चतुराईने एक धागा असा गुंफला जातो की वाटते त्यापेक्षा ही व्यक्ती काहीतरी खोल बोलत आहे, हसत हसत आपल्या उणीवांवर बोट ठेवीत आहे हे ध्यानात येते. ‘ सोंगे ’ ही कविता उदाहरणादाखल घेऊन थोड्या विस्ताराने

तिचा परामर्श घेतला की कुसुमाग्रजांच्या शैलीची कल्पना येईल. माणसे अनेक मुखवटे धारण करून वागतात, प्रसंगानुरूप पगडी फिरवितात ही गोष्ट सामान्यतः टीकास्पद आहे. परंतु सोंगावाचून जगणे अशक्य आहे असा पवित्रा घेऊन कुसुमाग्रज विचारतात, 'तुम्हीच सांगा, सोंगावाचुन शक्य कसें हें आहे जीवन ?' यात वाचकालाच या प्रश्नाचा न्यायनिवाडा करण्यासाठी आवाहन केलेले असले तरी 'तुम्हीच सांगा' यात 'तुम्ही यात वाकबगार आहात म्हणून विचारतो अशी बारीक खोच आहे. 'जगणें म्हणजे चतुरपणानें सोंगाचें करणें संपादन' या ओळीत अधिकारी ठामवाणीने सत्य सांगावे तशी जगण्याची सूत्रबद्ध व्याख्या दिली जाते. बुद्धीला हे सूत्र पटत नसूनही, 'हे खोटे नाही' हा कडवट घोट गुपचूप गिळावा लागतो. 'संस्कृति सारी उभी आपुली सोंगावरती'' अशी एक गोड गैरसमजाची धुंदी उतरवणारी जबरदस्त कोपरखळी देऊन नंतर जणू काही तात्त्विक दिलासा देण्यासाठी 'सोंगपणांतच संसाराची आहे महती' असे सूत्र पुन्हा प्रकटते आणि नंतर 'सोंग-तत्त्व निपटून काढतां उजाड होइल हें रंगायन' अशी पुन्हा खोचक ओळ येते. हे विधान मान्य करावे तर आपण सोंगाडे आहोत हे मान्य करावे लागते, नाही म्हणावे तर ते वस्तुस्थितीस सोडून आहे हे आपले आपण जाणीतच असतो. हसत-खेळवीत ठेवणाऱ्या विनोदात लपलेली उपरोधाची सूक्ष्म धार न कळत नेमका वेध घेऊन जाते.

या शैलीत बोलताना टोमणा देण्यासाठी किंवा लगोलग येणारा दुसरा विचार व्यक्त करण्यासाठी 'पांढरपेशा श्रद्धा अमुच्या (थिएटरातिल बनावटीच्या) विचलित होती' किंवा 'मीच एकदां उठलों आणिक (बरीच वर्षें होउनि गेलीं) स्वतःच केली बंद येथलीं सगळीं दारें' असे धावत्या रचनेच्या मध्येच कंस घातले जातात. 'ईश्वर नाही म्हणतां, ? माझें मतही अगदी तसेंच आहे' असे बोलण्याचे ढंग तर 'चित्रें,' 'मार्जिन,' 'शुभकामना,' 'एका टक्केवाल्याचे मत' या कवितांत विविध प्रकारांनी योजले आहेत आणि भाषाही 'माय कुणाची व्यालि' वगैरे, 'पण तें नाही प्रेम वगैरे' अशी फार बदलून गेलेली आहे.

थोड्याफार फरकाने याच शैलीचा वापर 'हिमरेषा'तल्या बहुतेक कविता लिहिताना केलेला आढळतो. वैचारिक प्रतिपादन, चतुराईने केलेले वक्तृत्वपूर्ण संभाषण, गंमतीदार युक्तिवाद, चमत्कृती यांनीच या कवितांना रंगत येत असल्यामुळे या कवितांचे आवाहन प्राधान्याने वाचकाच्या बुद्धीला होत राहाते व श्रोत्याच्या भूमिकेतला वाचक त्रयस्थपणे ऐकत व विचार करीत राहतो. कवितेतला अनुभवच

आपण जगत आहोत असे सामरस्य वाचकांच्या मनात निर्माण होण्याचा प्रश्नच या कवितांबाबत निर्माण होत नाही. कारण या कविता भावकविता या जातीच्या व दर्जाच्या नाहीत. ही त्यांची एक मर्यादा आहे. परंतु कुसुमाग्रजांना समाजजीवनातील उणीवांचा, विसंगतींचा, विशेषतः टिनोपॉल-संस्कृतीचा व थिएटरातील बनावटीच्या श्रद्धांचा जो उपहास करावयाचा आहे, किंवा संसारातील विषमतेचे जे दर्शन घडवावयाचे आहे, त्यासाठी ही खेळकर, उपरोधपूर्ण शैली अतिशय प्रभावी ठरलेली आहे. ' हिमरेषा ' हा संग्रह या विशेषांमुळे त्यांच्या इतर संग्रहांहून वेगळा व म्हणून लक्षात राहील असा आहे.

कुसुमाग्रजांच्या राष्ट्रप्रेमाचा ओघ ' हिमरेषा 'पर्यंत अखंडितपणे वाहात आलेला आहे हे चिनी आक्रमणाच्या संदर्भात त्यांनी लिहिलेली, वीरवृत्तीला चेतावणी देणारी ' आवाहन ', ' निर्धार ', ' रक्त तुझे हे ', ' क्रोध ' आदी गीते आणि बेचाळीसच्या क्रांतीतले ' चार कोळसेवाले ', तसेच विवेकानंद, पंडित नेहरू यांवरील कविता वाचताना कळून येते. परंतु कुसुमाग्रजांनी अशा विषयांवर वेळोवेळीं अनेक कविता लिहिलेल्या असल्यामुळे व बव्हंशी त्याच धाटणीने या कविता व गीते लिहिली गेली असल्यामुळे या कवितांनी त्यांच्या काव्यवैशिष्ट्यांत नवी भर पडलेली नाही. मात्र, एरव्ही समूहाचे प्रतिनिधी बनून किंवा समूहाच्या आवाजात आवाज मिसळून गाणारे कुसुमाग्रज किंचित बाजूला सरून समाजाकडे जरा वेगळ्या नजरेने पाहतात, एकीकडे त्याचा पोषाखीपणा, व दुसरीकडे वरवर सामान्य वाटणारा पण प्राणार्पण करीत आकाशाचे छत तोलून धरणारा सैनिक या दोघांमधला विरोध जेव्हा विदारकपणे दर्शवितात तेव्हा, ' सैनिक ', ' खाकी ' या कविता त्यांच्या ठराविक समरगीतांहून व राष्ट्रीय कवितांतून वेगळेपणाने व प्रभावाने उठून दिसतात. सामान्यतः राष्ट्रीय कवितांतले वीर मरणाची तमा न बाळगणारे असतात, ते प्रथमपासून शेवटपर्यंत धीरोदात्त दर्शविले जातात; परंतु एरव्हीचा सामान्य माणूस कर्तव्यनिष्ठेने मोठा होताना दिसतो तेव्हा ती कविता कशी हृदयस्पर्शी बनते हे ' सैनिक ' व ' खाकी ' या कवितांवरून दिसून येईल.

' कैफ ', ' तो पक्षी ', ' अतर्क्य ', ' वेसूर ', व स्तोत्र–पद्धतीने लिहिलेले ' उपास्तवन ' या, या संग्रहातील आणखी काही उल्लेखनीय कविता आहेत.

कुसुमाग्रजांच्या सामाजिक कवितेत व्यक्त झालेल्या वैचारिक भूमिकेविषयी, आशयाविषयी बरेच लिहिले जात असते. परंतु त्यांच्या कवितांतील सर्व प्रकारच्या आशयाचे स्वरूप एका वेगळ्या दृष्टीने थोडक्यात पाहाण्यासारखे आहे. कुसुमाग्रजांचे

प्रेम, परमेश्वर, समाज, जीवन अशा वेगवेगळ्या विषयांसंबंधीचे विचार जीवनलहरीपासून व्यक्त होत आलेले आहेत. परंतु त्या सर्वांतून एक सुसूत्र विचारप्रणाली हाती लागावी असे त्या विचारांचे एकमेकाशी खोलवर नाते जुळत नाही. परंतु त्यांतील काही वेचक विचारांतून कुसुमाग्रजांच्या व्यक्तित्वाची कल्पना येऊ शकेल. सामाजिक जीवनात ‘ तव आंतर अग्नी क्षणभर तरि फुलवावा ’ किंवा कर्मयोगी, आशा फलाची ना त्यास...अंतरीचें तेज उपसावें द्यावें, उजाडे तों पथा, हीच एक आस ’ ( एकाकी हो जागे—किनारा) अशी कर्मयोग्याच्या वृत्तीतून कार्य करीत राहण्याची त्यांची भूमिका दिसते. समुदायाच्या दुःखाविषयी आशावादी वृत्तीने ते झुंझाराची भूमिका घेतात व मानव्याच्या प्रतिष्ठेसाठी झगडतात. पण ते प्रेमानुभवाकडे वळले की त्यांच्या कवितेत निराशेचा भाव अनेक वेळा व्यक्त होतो. अनेक प्रेमकवितांतून खंत, निराशा, कडवटपणा प्रकर्षानें व्यक्त होतात. अनुभवाच्या विविधतेतून सुखद प्रेमानुभूतींचे सुंदर दर्शन घडविणाऱ्या काही कविता त्यांच्या संग्रहांत आढळत असूनही सामाजिक जीवनातली जिद्द आणि प्रखर आशावाद आणि प्रेमानुभूतीतून प्रकट झालेले कडवट निराशेने भरलेले मन ही परस्परविरोधाने जाणवत राहातात. स्वप्नांची माला ओघळून गेल्यावर साऱ्या जीवनाचे अर्थच त्यांना बदललेले दिसले. प्रीती अनेकदा त्यांच्या डोळ्यांसमोर ध्येयरूपाने उभी राहिली. ‘ न जाणें न नेणें कुठें चाललें मी ’ अशीच मनाची वाटचाल तिच्या बाबतीत चालत राहिलेली दिसते. ‘ ध्येय, प्रेम, आशा यांची होतसे का कधी पूर्ती । वेड्यापरि पूजितों या आम्ही भंगणाऱ्या मूर्ती । ’ असा मानवी जीवनाच्या अपूर्णत्वाची समज स्वीकारून निष्कर्षही त्यांनी काढलेला दिसतो. चिंतनात्मक भूमिकेवरून प्रीतीचा अर्थ शोधताना तर—

‘ कोठें शाश्वत या अशाश्वत जगीं, ज्या अंतरीं ही उदे ।
तेंही नश्वर, वाहते अनुदिनीं शून्याकडे जीवन ’

( ‘ प्रीतीसाठी प्रीती ’ —किनारा )

असे हताश, आणि ‘ प्रीत पतंगाची ’ ( किनारा ) मध्ये

‘ प्रीत पतंगाची ’ —मी ऐकत
निरर्थ तडफड पण बघतां ती
गमे तयाच्या मूर्खपणाला
नसे तुलाही मानवजगतीं ।

असे प्रेमासंबंधी व त्याबरोबर मानव जगतासंबंधीही खिन्न उपहासात्मक उद्‌गार काढले आहेत. ' मराठी माती ' पासून त्यांच्या काही प्रेमपर कविता प्रेम आणि अध्यात्म यांच्या सीमांवर रेंगाळू लागलेल्या ( पण जरा चकवू लागलेल्या ) दिसतात. परमेश्वराविषयी विचार करतानाही कुसुमाग्रजांच्या विचारांची उलटसुलट भ्रमंती चालू राहाते. तो आहे असे कधी त्यांना वाटते, तर तो नाही असेही कधी जाणवते. स्वतःच्या मनाचा शोध घेताना,

' असें हजारासंगें आहे
जडलेले माझें नातें
असेंच आहे आणि तरीही
अनोळखी मी सदाच राही
दूर हजारापासुनि आहे
विजनामधि माझें घरटें
मीपण भरलें जयांत माझें
जे आहे माझ्यापुरतें '

( ' अनोळखी ' : स्वगत )

असे ते म्हणतात. असे समाजजीवनात व स्वतःमध्ये रत असलेले दोघेजण दोन ध्रुवांचे अंतर ठेवून एकाच घरात राहतात. ( ' आम्ही दोघे ' : मराठी माती ) आणि तरीही स्वतःच्या ठायी रत असलेल्या त्याला काय हवे याचा झडझडून शोध घेताना,

' मला हवा तो
हाहि नव्हे, तोहि नव्हे–
म्हणुनि साजणी मी अविवाहित
दिव्य सुखा त्या सदैव वंचित
कुंवारपण मम गात बैसलें–
हाहि नव्हे, तोहि नव्हे, '

( ' मला हवा तो–' स्वगत )

असे ' नेति, नेति ' च्या भाषेत बोलत राहावे लागते. असे जर आहे तर आपण तरी त्यांच्या ' श्रेयस 'चे रूप कशासाठी पक्के करायचे ? अजून त्याच्या शोधार्थ कवीचा प्रवास चालूच आहे. ' पांथस्थ ', ' यात्रिक ', ' मुशाफिर ', ' यात्रा ' ' रसयात्रा ', ' सुवर्णयात्रा ' या कल्पना त्यांच्या कवितेत अनेक ठिकाणी आलेल्या असून माझे श्रेयस गतीत आहे असेही त्यांनी म्हटले आहे. ते श्रेयस म्हणजे मृगजळ

असे प्रेमासंबंधी व त्याबरोबर मानव जगतासंबंधीही खिन्न उपहासात्मक उद्गार काढले आहेत. ‘ मराठी माती ’ पासून त्यांच्या काही प्रेमपर कविता प्रेम आणि अध्यात्म यांच्या सीमांवर रेंगाळू लागलेल्या ( पण जरा चकवू लागलेल्या ) दिसतात. परमेश्वराविषयी विचार करतानाही कुसुमाग्रजांच्या विचारांची उलटसुलट भ्रमंती चालू राहाते. तो आहे असे कधी त्यांना वाटते, तर तो नाही असेही कधी जाणवते. स्वतःच्या मनाचा शोध घेताना,

‘ असें हजारासंगें आहे
जडलेले माझें नातें
असेंच आहे आणि तरीही
अनोळखी मी सदाच राही
दूर हजारापासुनि आहे
विजनामधि माझें घरटें
मीपण भरलें जयांत माझें
जे आहे माझ्यापुरतें ’

( ‘ अनोळखी ’ : स्वगत )

असे ते म्हणतात. असे समाजजीवनात व स्वतःमध्ये रत असलेले दोघेजण दोन ध्रुवांचे अंतर ठेवून एकाच घरात राहतात. ( ‘ आम्ही दोघे ’ : मराठी माती ) आणि तरीही स्वतःच्या ठायी रत असलेल्या त्याला काय हवे याचा झडझडून शोध घेताना,

‘ मला हवा तो
हाहि नव्हे, तोहि नव्हे—
म्हणुनि साजणी मी अविवाहित
दिव्य सुखा त्या सदैव वंचित
कुंवारपण मम गात बैसलें—
हाहि नव्हे, तोहि नव्हे, ’

( ‘ मला हवा तो—’ स्वगत )

असे ‘ नेति, नेति ’ च्या भाषेत बोलत राहावे लागते. असे जर आहे तर आपण तरी त्यांच्या ‘ श्रेयस ’चे रूप कशासाठी पक्के करायचे ? अजून त्याच्या शोधार्थ कवीचा प्रवास चालूच आहे. ‘ पांथस्थ ’, ‘ यात्रिक ’, ‘ मुशाफिर ’, ‘ यात्रा ’ ‘ रसयात्रा ’, ‘ सुवर्णयात्रा ’ या कल्पना त्यांच्या कवितेत अनेक ठिकाणी आलेल्या असून माझे श्रेयस गतीत आहे असेही त्यांनी म्हटले आहे. ते श्रेयस म्हणजे मृगजळ

असेल, पण ते आपल्याला प्रगतिपथावर ठेवत आहे याचे समाधान कविमनाला वाट राहाते. 'प्रवासात असण्यातच प्रवासाची अंतिम सांगता आहे' असे या रसयात्रीला आवर्जून सांगावयाचे आहे. मराठी कवितेत कुसुमाग्रजांची ही जीवनदृष्टी वेगळीच ठरावी अशी आहे.

या वृत्तीनेच त्यांचा जीवनाचा प्रवास अखंड चालू आहे. या वृत्तीचा त्यांच्या कवितेवर सूक्ष्म रीतीने परिणाम झालेला दिसतो. त्यांचे मन अनावर गतीने प्रत्यक्ष व कल्पनोद्भव विश्वात अखंड संचार करीत असते; कधी नाविक बनून गलबतातून तर कधी पक्षी बनून पंखांवरून. त्यांचा परमेश्वरसुद्धा ' तो मुक्त प्रवासी फिरत सदोदित राही ' ( ' पाऊलचिन्हे '—किनारा ) असा प्रवासी आहे. ' फेरीवाला ' या प्रतीकात्मक कवितेतला फेरीवाला, ' वामनगतिने हा सौदागर । वाट चालतो अधीर आतुर ' असा प्रवासीच आहे. त्यांना बालकवी ' अमर विहंगम ' आणि ' नीलसागरावरचा चतुर खलाशी ' ( विशाखा ) असे भासले. सुभाषचंद्रांना उद्देशून लिहिताना, ' सुवर्ण गरुडा, पसरुनि अपुल्या पंखांच्या ज्वाला ' अशी ओळ आली. महात्माजींच्या आत्म्याच्या प्रवासाचे, ' ती नाव चंदनी चाले स्वर्गाकडे—फडफडत केशरी ज्वालांची वर शिडे ' असे वर्णन त्यांनी केले आहे. अनेक वेळा त्यांच्या कवितेत नौका आणि पक्षी यांचे शिडे आणि पंख असणारे रूप एकत्र होते आणि पंखांची शिडे होतात आणि शिडांचे पंख होतात. बऱ्याच ठिकाणी पाखराचे वर्णन ' विलासतारू ' ( ' निळा पक्षी '—किनारा ) असे नौकेच्या रूपात येते. या शिडात आणि पंखांत ज्वाला मिसळतात व ज्वालांची शिडें तयार होतात. कधी देवदूताला किरणांचा पिसारा फुटतो, कधी शुक्रताऱ्याला, कधी अंधाराला. कधी जग पक्षासारखे पंख मिटते, कधी सात वीर खगांसारखे जळतात, कधी कुणीतरी ती पाखरासारखी येते, आणि कधी कवीस पक्ष्यासारखी पिंजऱ्यात गुंतवून ठेवते. ' धूक निराशेचे हे बसले मनिं घर करुनी ' या ' जीवनलहरी 'तील ओळीपासून ' हिमरेषा'तल्या ' तो पक्षी ' पर्यंत या कल्पना सर्वत्र दाटलेल्या आहेत. ' चालतों मी सारखा हा चालण्याला अंत नाहीं...चालण्याचें श्रेय आहे अन्य धर्माचार नाहीं ' असे म्हणणाऱ्या, अखंड गतिमान असणाऱ्या वेगवेड्या मनोधर्मातूनच या कल्पनांची निर्मिती झालेली आहे. अखंड गतिमानतेत रमणाऱ्या या मनाने हा प्रवास अतिशय रसिकतेने त्याचा आस्वाद घेत केलेला आहे. म्हणूनच काव्यदृष्ट्या तो मोलाचा ठरलेला आहे. येथून पुढचा प्रवासही यशदायी व्हावा यासाठी या रसयात्रीला उद्देशून म्हणावेसे वाटते, ' शुभास्ते पंथानः सन्तु ! '

**शंकर वि. वैद्य**

# दूर मनोऱ्यात

वादळला हा जीवनसागर–अवसेची रात
पाण्यावर गडबडा लोळतो रुसलेला वात

भांबावुनि अभ्रांच्या गर्दित गुदमरल्या तारा
सूडाने तडतडा फाडतो उभे शीड वारा

पिंजुनिया आयाळ गर्जती लाटा भवताली
प्रचण्ड भिंगापरि फुटते जळ आदळुनी खाली

प्रवासास गल्बते आपुली अशा काळराती
वावटळीतिल पिसाप्रमाणे हेलावत जाती.

परन्तु अन्धारात चकाके बघा बन्दरात
स्तम्भावरचा प्रकाश हिरवा तेजस्वी शान्त !

किरणांचा उघडून पिसारा देवदूत कोणी
काळोखावर खोदित बसला तेजाची लेणी

उज्ज्वल त्याची पहा प्रभावळ दूर मनोऱ्यात
अन् लावा हृदयात सख्यांनो, आशेची वात !

मराठी ग्रंथ संग्रह
दा. क्र. २०५०
मुंबई शाखा (स्थळ

# हिमलाट

हिमलाट पहाटे पहा जगावर आली !

मुखि पिळून मद्यास्तव द्राक्षांचे घोस
पाडीत मळे मोत्यांचे चरणी ओस
उद्दाम धावते करित दुभङ्ग धरेस
करकरा पाखरे रगडी दाताखाली
हिमलाट पहाटे पहा जगावर आली !

श्रीमन्त महाली तिथे हिला ना थारा
मखमाली दुलया देती मधुर उबारा
डोकावुन पळते कापत हीच थरारा
हो काय दरारा कनकाचा भयशाली
हिमलाट पहाटे पहा जगावर आली !

पाहून परन्तू कुठे कुडाची खोपी
कंगाल कांबळी टाकुन गेले झोपी
शेकडो कवाडे ! वाट जावया सोपी
कडकडून पडते तेथे लाव भुकेली
हिमलाट पहाटे पहा जगावर आली !

ज्योतीतुनि धावत या तेजःकण सारे
या यज्ञातिल अन् सरणातील निखारे
रे ढाळ नभा, तव ते ज्वालामय तारे
पेटवु द्या वणवा कणाकणात मशाली
हिमलाट पहाटे पहा जगावर आली !

# स्वप्नाची समाप्ती

स्नेहहीन ज्योतीपरी
मंद होई शुक्रतारा
काळ्या मेघखंडास त्या
किनारती निळ्या धारा।

स्वप्नासम एक एक
तारा विरे आकाशात
विरे रात्र कणकण
प्रकाशाच्या सागरात.

काढ सखे, गळ्यातील
तुझे चांदण्याचे हात
क्षितिजाच्या पलिकडे
उभे दिवसाचे दूत.

रातपाखरांचा आर्त
नाद नच कानी पडे
संपवुनी भावगीत
झोपलेले रातकिडे.

पहाटचे गार वारे
चोरट्याने जगावर
येती, पाय वाजतात
वाळलेल्या पानांवर.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

शांति आणि विषण्णता
   दाटलेली दिशांतुन
गजबज गर्जवील
   जग घटकेने दोन !

जमू लागलेले दव
   गवताच्या पातीवर
भासते भू तारकांच्या
   आसवांनी ओलसर.

काढ सखे, गळ्यातील
   तुझे चांदण्याचे हात
क्षितिजाच्या पलिकडे
   उभे दिवसाचे दूत

प्राजक्ताच्या पावलाशी
   पडे दूर पुष्प–रास
वाऱ्यावर वाहती हे
   त्याचे दाटलेले श्वास.

ध्येय, प्रेम, आशा यांची
   होतसे का कधी पूर्ती
वेड्यापरी पूजतो या
   आम्ही भंगणाऱ्या मूर्ती

खळ्यामध्ये बांधलेले
   बैल होवोनिया जागे
गळ्यातील घुंगुरांचा
   नाद कानी येऊ लागे.

आकृतींना दूरच्या त्या
येउ लागे रूप–रङ्ग
हालचाल कुजबूज
होऊ लागे जागोजाग.

काढ सखे, गळ्यातील
तुझे चांदण्याचे हात
क्षितिजाच्या पलिकडे
उभे दिवसाचे दूत.

होते म्हणू वेड एक
एक रात्र पाहिलेले
होते म्हणू स्वप्न एक
एक रात्र राहिलेले.

प्रकाशाच्या पावलांची
चाहूल ये कानावर
ध्वज त्याचे कनकाचे
लागतील गडावर.

ओततील आग जगी
दूत त्याचे लक्षावधी
उजेडात दिसू वेडे
आणि ठरू अपराधी.

# अ हि–न कु ल

ओतीत विखारी वातावरणी आग
हा वळसे घालित आला मन्थर नाग,
   मधुनीच उभारी फणा, करी फूत्कार
ये ज्वालामुखिला काय अचानक जाग !

कधि लवचिक पाते खड्गाचे लवलवते,
कधि वज्र धरेवर गगनातुन कडकडते,
   कधि गर्भरेशमी पोत मधे जरतार,
प्रमदेचे मादक वस्त्र जणू सळसळते.

मार्गावर याच्या लवत तृणाची पाती
पर्णांवर सुमने मोडुनि माना पडती
   थरथरती झुडुपे हादरती नववेली
जग गुलाम सारे या सम्राटापुढती.

चालला पुढे तो–काय ऐट ! आनंद !
अग्नीचा ओघळ ओहळतो जणु मंद,
   टाकली यमाने कट्यार वा कनकाची
चालली बळींचा वेध घेत ही धुंद.

वा ताण्डव करता सोम प्राशुनी काली—
रक्तात नाहली, शिरमुंडावळ भाली,
   थयथया नाचता नरड्यांवर प्रेतांच्या,
हे कंकण निखळुनि पडले भूवर खाली.

चालला पुढे तो लचकत मुरडत मान,
अवतरे मूर्तिमान् मल्हारातिल तान
चांचल्य विजेचे दर्याचे गांभीर्य
चालला मृत्युचा मानकरीच महान !

हां थांब–कुणाची जाळिमधें चाहूल
अंगावर–कणापरि नयन कुणाचे लाल,
आरक्त ओठ ते ध्वजा जणू रक्ताच्या,
रे नकूल आला ! आला देख, नकूल !

थबकलाच जागी सर्प घालुनी वळसा,
रिपु समोर येता सोडुनि अन् आडोसा,
भूमीस मारुनी मागे तीव्र तडाखा,
घे फणा उभारुन मरणाचा कानोसा.

पडलीच उडी ! की तडितेचा आघात
उल्केपरि तळपत कण्यात घुसले दात,
विळख्यावर विळखे कसून चढवी सर्प
फुंफाट करी अन् पिशापरी त्वेषात !

रण काय भयानक–लोळे आग जळात
आदळती, वळती, आवळती क्रोधात,
जणु जिंकायासी गगनाचे स्वामित्व
आषाढघनाशी झुंजे वादळवात !

क्षणि धुळीत गेली वहात ती विषधार
शतखंडित झाले ते गर्वोन्नत ऊर
विच्छिन्न तनूतुनि उपसुनि काढुनि दात
वाऱ्यापरि गेला नकुल वनातुनि दूर.

राठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलक्रम

संग्राम सरे, रक्ताचे ओघळ जाती,
आनंदे न्हाती त्यात तृणाची पाती,
पिंजून कापसापरी पडे तो नाग,
ते खंड गिळाया जमले कीटक भोतीं

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
नों. दि:

# कि ना ऱ्या व र

पुढे पसरला अथांग दरिया
   सखे, किनाऱ्यावरती आपण
कोर शशीची शुभ्र बिलोरी
   टाकी निज किरणांची रापण !

चित्रासम निःशब्द गमे जग
   प्रकाश–काळोखाचा संगम
क्वचित भंगते गाढ शान्तता
   जाता झापुन रात्र-विहंगम !

दूर तमातुन दिसती अंधुक
   नगरातिल त्या ज्योती तेवत
संसारातिल समूर्त दुःखे
   बसलेली वा जागत, जाळत !

क्षितिजावर दीपांकित तारू
   चाले पश्चिम दिशेस धूसर
ज्योतींचा जणु जथा निघे हा
   शोधाया मावळला भास्कर !

हळुहळु खळबळ करीत लाटा
   येउनि पुळणीवर ओसरती
जणू जगाची जीवन–स्वप्ने
   स्फुरती, फुलती, फुटती, विरती !

होय किनाऱ्यावरती अपुले
आज सखे, हे मङ्गल मीलन
जीवित दर्यापरी, नसे ते—
केवळ सुंदर केवळ भीषण !

ग्रंथ संग्रहालय. ठाणे. स्थळप्र
दि:
नों: दि:

# मातीचीं दर्पोक्ती

घनधार मृगाचा प्राशुनिया पर्जन्य
त्या तृषार्त भूवर आले नव चैतन्य,
उन्माद चढे, तो दर्प दर्वळे भोती
थरथरा कापली वर दर्भाची पाती
ते सुस्त धूलिकण गाउ लागले गीत
कोलाहल घुमला चहूंकडे रानात–

अभिमानी मानव! आम्हांला अवमानी
बेहोष पाउले पडती अमुच्यावरुनी
त्या मत्त पदांना नच जाणीव अजूनी
की मार्ग शेवटी सर्व मातिला मिळती
मातीवर चढणे एक नवा थर अंती!

प्रासाद भिडू द्या गगनाला गर्वात
डोलु द्या पताका सत्तेच्या उन्मत्त
दौलती उठू द्या प्राशुनि दुर्बळ रक्त
कोसळेल इमला समूळ एका राती
मातीवर चढणे एक नवा थर अंती!

दर्पणी पाहु द्या रमणि रूप दर्पात
वा बाहू स्फुरु द्या बलशाली समरात
पांडित्य मांडु द्या शब्दांचा आकांत
ते रूप, बुद्धि ती, शक्ति, आमुची भरती,
मातीवर चढणे एक नवा थर अंती!

कित्येक शिकंदर जग जिंकुनिया गेले
कित्येक वाल्मिकी अखेर इकडे आले
कित्येक मनू अन् मुनी धुळीने गिळले
स्मृतितीलहि त्यांच्या ओळी अंधुक होती
मातीवर चढणे एक नवा थर अंती !

पाहून हासु ये तुमचे ताजमहाल
अन् गर्व किती तो ! काल काय जिंकाल ?
शेकडो ताजही जिथे शोभले काल
ती प्रचंड नगरे आज आमुच्या पोटी
मातीवर चढणे एक नवा थर अंती !

धनवंत असू द्या, असु द्या दीन भिकारी
कुणि संत असू द्या वा पापी व्यभिचारी
इकडेच वाहते सर्वांची रहदारी
हो भस्म चितेवर सारी नीति-अनीती
मातीवर चढणे एक नवा थर अंती !

मरणोत्तर वाटे होइल आशापूर्ती
स्वर्गीय मंदिरे घ्यायाला विश्रांती
लाभेल प्रभूची वा प्रमदांची प्रीती
त्या व्याकुल मतिला इथेच अंतिम शांती
मातीवर चढणे एक नवा थर अंती !

ही क्षुद्र बाहुली कोण करी निर्माण ?
वेताल नाचवी, सूत्रधार हा कोण ?
मातीतच अंती त्याचेही निर्वाण ?
स्वामित्व जगाचे अखेर अमुच्या हाती
मातीवर चढणे एक नवा चर अंती !

ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
वि: ........
नों दि: ......

# गोदाकाठचा संधिकाल

गर्द वनी वा गिरीकंदरी
लपलेला दिनि तम, गरुडापरि
पंख आपुले विशाल पसरुन ये विश्वावरती

पश्चिम-वारा वाहे झुळझुळ
कंपित होउनि हेलावे जळ
दूर तरूंच्या काळ्या छाया हळुहळु थरथरती.

जीर्ण वडाच्या पारंब्यांतुनि
पंखांची क्षण फडफड करुनी
शब्द न करता रातपाखरे नदीकडे उडती.

कपारीत अन् दूर कुठोनी
सांदीमध्ये लपुनी बसुनी
अखंड काढी रातकिडा स्वर ते कानी पडती.

वळणाच्या वाटेवर चाले,
आतुर अंतर कातर डोळे,
झपझप पाउल टाकित कोणी खेड्यातिल युवती.

निळसर काळे वरती अंबर,
धूसर धूराच्या रेषा वर
पलिकडच्या घन राईमधुनी चढुनी मावळती.

अभ्रखंड तो अचल पांढरा
पडे पारवा झडुनि पिसारा
तेजहीन अन् दोन चांदण्या डोकावुनि बघती.

परि शुक्राचा सतेज तारा
पसरित गगनी प्रकाश–धारा
वीरापरि आत्मार्पण करण्या आलेला पुढती.

आणिक इकडे क्षितिजावरती
विडंबण्या शुक्राची दीप्ती
शहरामधल्या क्षीण दिव्यांच्या मिणमिणती ज्योती.

वाडा पडका नदीतटावर
भग्न आपुल्या प्रतिबिंबावर
गंगेमधल्या, खिन्नपणाने लावितसे दृष्टी.

देउळ ते अन् भग्न, हटाने
ध्येयनिष्ठ जणु जनाप्रमाणे
पडले तरिही जपुनी ठेवी हृदयातिल मूर्ती.

पाचोळ्यावर का ही सळसळ
कसली डोहावरती खळबळ
पाउल वाजे रजनीचे का येताना जगती ?

# स्मृती

नवलाख तळपती दीप विजेचे येथ
उतरली तारकादळे जणू नगरात
परि स्मरते आणिक करते व्याकुल केव्हा
त्या माजघरातिल मंद दिव्याची वात !

वाऱ्यावर येथिल रातराणि ही धुंद
टाकता उसासे, चरणचाल हो मन्द
परि स्मरतो आणिक करतो व्याकुल केव्हा
त्या परसामधला एकच तो निशिगन्ध !

हेलावे भवती सागर येथ अफाट
तीरावर श्रीमान् इमारतींचा थाट
परि स्मरतो आणिक करतो व्याकुल केव्हा
तो नदीकिनारा आणि भंगला घाट !

बेहोष चढे जलशांना येथिल रंग
रुणझुणता नूपुर जीव बने निःसंग
परि स्मरतो आणिक करतो व्याकुल केव्हा
तू आर्त मला जो ऐकविलास अभंग !

लावण्यवतींचा लालस येथ निवास
मदिरेत माणकापरी तरारे फेस
परि स्मरती आणिक करती व्याकुल केव्हा
ते उदास डोळे, त्यांतिल करुण-विलास !

## आगगाडी व जमीन

नको ग ! नको ग !
आक्रंदे जमीन
पायाशी लोळत
विनवी नमून—

धावसी मजेत
वेगात वरून
आणिक खाली मी
चालले चुरून !

छातीत पाडसी
कितीक खिंडारे
कितीक ढाळसी
वरून निखारे !

नको ग नको ग
आक्रंदे जमीन
जाळीत जाऊ तू
बेहोष होऊन.

ढगांत धुराचा
फवारा सोडून
गर्जत गाडी ती
बोलली माजून—

दुर्बल ! अशीच
खुशाल ओरड
जगावे जगात
कशाला भेकड !

पोलादी टाचा या
छातीत रोवून
अशीच चेंदत
धावेन ! धावेन !

चला रे चक्रांनो,
फिरत गरारा
गर्जत पुकारा
आपुला दरारा !

शीळ अन् कर्कश
गर्वात फुंकून
पोटात जळते
इंधन घालून—

शिरली घाटात
अफाट वेगात
मैलांचे अन्तर
घोटात गिळीत !

उद्दाम गाडीचे
ऐकून वचन
क्रोधात इकडे
थरारे जमीन

ठाणे ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ............ दि: ...
क्रमांक ..................... नों

" दुर्बळ भेकड ! '
त्वेषाने पुकारी
घुमले पहाड
घुमल्या कपारी !

हवेत पेटला
सूडाचा धुमारा
कोसळे दरीत
धुळाचा डोलारा !

उठला क्षणार्ध
भयाण आक्रोश
हादरे जंगल
कापले आकाश

उलटी पालटी
होऊन गाडी ती
हजार शकले
पडली खालती !

# क्रांतीचा जयजयकार

[ अन्नत्याग करून मृत्यूच्या दारात पाऊल टाकताना
राजबंद्यांच्या ओठावर
असलेच गाणे स्फुरले नसेल काय ? ]

गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार
अन् वज्रांचे छातीवरती घ्या झेलून प्रहार !
खळखळु द्या या अदय शृंखला हातापायांत
पोलादाची काय तमा मरणाच्या दारात ?
सर्पांनो उद्दाम, आवळा कसूनिया पाश
पिचेल मनगट परी उरातिल अभंग आवेश
तडिताघाते कोसळेल का तारांचा संभार
कधीही तारांचा संभार
गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार !

क्रुद्ध भूक पोटात घालु द्या खुशाल थैमान
कुरतडु द्या आतडी करू द्या रक्ताचे पान
संहारक काली, तुज देती बळीच आह्वान
बलशाली मरणाहुन आहे अमुचा अभिमान
मृत्युंजय आम्ही ! अम्हांला कसले कारागार !
अहो हे कसले कारागार !
गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार !

पदोपदी पसरूनि निखारे आपुल्याच हाती
होउनिया बेहोष धावलो ध्येयपथावरती
कधि न थांबलो विश्रांतीस्तव, पाहिले न मागे
बांधु न शकले प्रीतीचे वा कीर्तीचे धागे
एकच तारा समोर आणिक पायतळी अंगार
होता पायतळी अंगार
गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार !

श्वासांनो, जा वायूसंगे ओलांडुनि भिंत
अन् आईला कळवा अमुच्या हृदयातिल खंत
सांगा वेडी तुझी मुले ही या अंधारात
बद्ध करांनी अखेरचा तुज करिती प्रणिपात
तुझ्या मुक्तिचे एकच होते वेड परी अनिवार
तयांना वेड परी अनिवार
गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार !

नाचविता ध्वज तुझा गुंतले शृंखलेत हात
तुझ्या यशाचे पवाड गाता गळयात ये तात
चरणांचे तव पूजन केले म्हणुनि गुन्हेगार
देता जीवन-अर्घ्य तुला ठरलो वेडेपीर
देशिल ना पण तुझ्या कुशीचा वेड्यांना आधार
आई, वेड्यांना आधार
गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार !

कशास आई, भिजविसि डोळे, उजळ तुझे भाल
रात्रीच्या गर्भात उद्याचा असे उषःकाल
सरणावरती आज आमुची पेटताच प्रेते
उठतिल त्या ज्वालांतुन भावी क्रांतीचे नेते
लोहदण्ड तव पायांमधले खळाखळा तुटणार
        आई, खळाखळा तुटणार
गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार !

आता कर ओंकारा, तांडव गिळावया घास
नाचत गर्जत टाक बळीच्या गळ्यावरी फास
रक्तमांस लुटण्यास गिधाडे येंउ देत क्रूर
पहा मोकळे केले आता त्यासाठी ऊर
शरिरांचा कर सुखेनैव या सुखेनैव संहार
        मरणा, सुखेनैब संहार

गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम .................... दि: ..................
क्रमांक ........................ नोंद दि: ..............

रक्ताचे नच ओघळ सुकले अजुनि क्रुसावरचे
विरले ना ध्वनि तुझ्या प्रेषिता, अजुनी शब्दांचे
मंगल तव गीतांचा होतो मंदिरात घोष—
" प्रेम, शांति अन् क्षमा यांमधे वसतो परमेश ! "

आणि इथे हे तुझ्या पताका ज्यांच्या हातांत
निःशस्त्रांच्या रक्तामांसामधे नाहतात
मर्दांच्या बंदुका उडाल्या मुलाबायकांत
जगजेत्यांच्या पराक्रमाची स्फूर्तिप्रद रीत !

पाचोळ्यापरि पडली पाहुन प्रेतांची रास
नयन झाकले असशिल देवा, तू अपुले खास;
असेल ही वा सैतानाची प्रभूवरी मात
एक जखम अन् नवीन येशू , तुझ्या काळजात !

# जा जरा पूर्वेकडे

[ चीन–जपानी युद्धात चाललेले राक्षसी
अत्याचार या कवितेत अभिप्रेत आहेत. ]

जा जरा पूर्वेकडे !

वाळवण्टी कोरता का एक श्वानाचे मढे ?
जा गिधाडांनो, पुढे
जेथ युद्धाची धुमाळी गंज प्रेतांचा पडे,
जा जरा पूर्वेकडे !

आणि रक्ताच्या नद्या हो वाहती धारोष्णशा
भागवा तेथे तृषा,
ढीग साराया शवांचा तेथ लागे फावडे,
जा जरा पूर्वेकडे !

गात गीते जाउ द्या हो थोर तांडा आपुला,
देव आहे तोषला
वर्षता त्याचा दयाब्धी राहता का कोरडे ?
जा जरा पूर्वेकडे !

तेथ देखा आग वेगाने विमाने वर्षती,
थोर शास्त्रांची गती
धूळ आणि अग्नि यांच्या दौलती चोहीकडे
जा जरा पूर्वेकडे !

खड्ग लावूनी उराला बायकांना ओढती,
आणि दारी ओढती,
भोगती बाजार-हाटी मांस आणि कातडे
जा जरा पूर्वेकडे !

आर्त धावा आइचा ऐकून धावे अर्भक
ना जुमानी बंदुक
आणि लोंबे संगिनीला छान छोटे आतडे
जा जरा पूर्वेकडे !

हा दयेने ईश्वराच्या काळ आहे चालता,
व्यर्थ येथे राबता,
व्यर्थ तेथे शोणिताचे वाहुनी जाती सडे
जा जरा पूर्वेकडे !

आणि येताना पवाडे संस्कृतीचे गा जरा,
डोलु द्या सारी धरा,
मेघमालेतून आम्हा शांततेचे द्या धडे
जा जरा पूर्वेकडे !

दोघांत आजला
अफाट अन्तर
जुळून पाकळ्या
उडाल्या नंतर—

जीवनावाचून
जळला अंकुर
प्रश्नही राहिला
राहिले उत्तर !

संग्रामी आजला
शोधतो जीवित
उरीचे ओघळ
दाबून उरात—

उठती भोवती
धुळीचे पर्वत
अखण्ड फिरते
वरून कर्वत !

वादळी रणात
करणे कोठून
नाजूक भावांचे
लालनपालन—

तरीही केधवा
पडता पथारी
थडगी दुभंग
होतात अंतरी—

आठवे तुझ्या ते
प्रीतीचे मोहळ
आणि हो बिछाना
आगीचा ओहळ !

# मू र्ति भं ज क

जगाचा गल्बला
जगात सोडून
प्रेमाची मृणाल—
बंधने तोडून—

होता तो श्रमिष्ट
भ्रमत एकला
नादात अगम्य
टाकीत पावला

वर्तले नवल
डोंगर—कपारी
गवसे प्रतिमा
संगमरवरी !

हर्षांचा उन्माद
झाला त्या वेड्याला
घेऊन मूर्ति ती
बेहोष चालला,

आढळे पुढती
पहाड उभार
वेड्याच्या मनात
काही ये विचार

थांबवी आपुला
निरर्थ प्रवास
दिवसामागून
उलटे दिवस —

आणिक अखेरी
राबून अखण्ड
वेड्याने खोदले
मंदिर प्रचंड

चढवी कळस
घडवी आसन,
जाहली मंदिरी
मूर्त ती स्थापन !

नंतर सुरू हो
वेड्याचे पूजन
घुमते कड्यात
नर्तन गायन

रान अन् भोतीचे
स्फुंदते सकाळी
ठेवी हा वेलींना
ना फूल, ना कळी !

विचारी आश्चर्ये
तृणाला ओहळ
कोण हा हिरावी
रोजला ओंजळ

परन्तु मूर्त ती
बोलेना, हालेना
वेड्याचे कौतुक
काहीही करीना !

सरले गायन
सरले नर्तन
चालले अखेरी
भीषण क्रंदन

पडून तिच्या त्या
सुन्दर पायाशी
ओरडे रडे तो
उपाशी तापाशी !

खुळाच ! कळे न
पाषाणापासून
अपेक्षा कशाची
उपेक्षेवाचून !

वैतागे, संतापे,
अखेरी क्रोधाने
मूर्तीच्या ठिकऱ्या
केल्या त्या भक्ताने !

रित्या त्या मंदिरी
आता तो दाराशी
बसतो शोधत
काहीसे आकाशी

वाटेचे प्रवासी
मंदिरी येतात
आणिक शिल्पाची
थोरवी गातात.

पाहून परंतू
मोकळा गाभारा
पाषाणखंडांचा
भातला पसारा—

त्वेषाने बोलती
जाताना रसिक
असेल चांडाळ
हा मूर्तिभंजक !

... ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम.................. वि: ............
क्रमांक ........................ नोंद दि ..........

# को लं ब सा चे ग र्व गी त

हजार जिव्हा तुझ्या गर्जु दे प्रतिध्वनीने त्या
समुद्रा, डळमळु दे तारे !
विराट वादळं हेलकावु दे पर्वत पाण्याचे
ढळू दे दिशाकोन सारे !

ताम्रसुरा प्राशूनि मातु दे दैत्य नभामधले
दडू द्या पाताळी सविता
आणि तयांची ही अधिराणी दुभंग धरणीला
कराया पाजळु दे पलिता !

की स्वर्गातुन कोसळलेला, सूड—समाधान
मिळाया प्रमत्त सैतान
जमवुनि मेळा वेताळांचा या दर्यावरती
करी हे तांडव थैमान !

पदच्युता, तव भीषण नर्तन असेच चालू दे
फुटू दे नभ माथ्यावरती
आणि तुटू दे अखंड उल्का वर्षावत अग्नी
नाविका ना कुठली भीती !

'सहकाऱ्यांनो, का ही खंती जन्म खलाशांचा
झुंजण्या अखंड संग्राम
नक्षत्रापरि असीम नीलामधे संचरावे
दिशांचे आम्हांला धाम !

काय सागरी तारु लोटलें परताया मागे
असे का हा अपुला बाणा
त्याहुन घेऊ जळी समाधी सुखे, कशासाठी
जपावे पराभूत प्राणा !......

कोटयवधी जगतात जिवाणू जगती अन् मरती
जशी ती गवताची पाती,
नाविक आम्ही परंतु फिरतो सात नभांखाली
निर्मितो नव क्षितिजे पुढती !

मार्ग आमुचा रोधू शकती ना धन, ना दारा
घराची वा वितभर कारा
मानवतेचे निशाण मिरवू महासागरात
जिंकुनी खंड खंड सारा !

चला उभारा शुभ्र शिडे ती गर्वाने वरती
कथा या खुळ्या सागराला
" अनंत अमुची ध्येयासक्ती अनंत अन् आशा
किनारा तुला पामराला ! "

... ग्रंथ संग्रहालय. ठाणे.
नोंद ............ दि:
अ. क्र. ........................ नोंद दि:

## पृथ्वीचे प्रेमगीत

युगामागुनी चालली रे युगे ही
करावी किती भास्करा वंचना
किती काळ कक्षेत धावू तुझ्या मी
कितीदा करू प्रीतिची याचना !

नव्हाळीतले ना उमाळे, उसासे
न ती आग अंगात आता उरे
विझोनी अता यौवनाच्या मशाली
उरी राहिले काजळी कोपरे !

परी अंतरी प्रीतिची ज्योत जागे
अविश्रांत राहील अन् जागती;
न जाणे न नेणे कुठे चालले मी
कळे तू पुढे आणि मी मागुती !

दिमाखात तारे नटोनी थटोनी
शिरी टाकिती दिव्य उल्का-फुले
परंतू तुझ्या मूर्तिवाचून देवा,
मला वाटते विश्व अंधारले !

तुवा सांडलेले कुठे अंतराळात
वेचूनिया दिव्य तेजःकण
मला मोहवाया बघे हा सुधांशू
तपाचार स्वीकारुनी दारुण.

पिसारा प्रभेचा उभारून दारी
पहाटे उभा शुक्र हा प्रेमळ
करी याचना प्रीतिची लाजुनी लाल—
होऊनिया लाजरा मंगळ.

निराशेत संन्यस्त होऊन बैसे
ऋषींच्या कुळी उत्तरेला ध्रुव
पिसाटापरी केस पिंजारुनी हा
करी धूमकेतू कधी आर्जव !

परी भव्य ते तेज पाहून पूजून
घेऊ गळ्याशी कसे काजवे
नको क्षुद्र शृंगार तो दुर्बळांचा
तुझी दूरता त्याहुनी साहवे !

तळी जागणारा निखारा उफाळून
येतो कधी आठवाने वर
शहारून येते कधी अंग, तुझ्या—
स्मृतीने उले अन् सले अन्तर !

गमे की तुझ्या रुद्र रूपात जावे
मिळोनी गळा घालुनीया गळा
तुझ्या लाल ओठांतली आग प्यावी
मिठीने तुझ्या तीव्र व्हाव्या कळा !

अमर्याद मित्रा, तुझी थोरवी अन्
मला ज्ञात मी एक धूलीकण
अलंकारण्याला परी पाय तूझे
धुळीचेच आहे मला भूषण !

## सा त

[ शिवाजीचा सेनापती प्रतापराव गुर्जर याचा एके ठिकाणी पराभव होऊन तो पळाला. शिवाजीला ही वार्ता समजताच रागाच्या भरात त्याने सेनापतीला एक निर्भर्त्सनात्मक पत्र लिहिले. ते वाचून आलेल्या उद्वेगाच्या आवेशात प्रतापरावाने सात सरदारांसह थेट शत्रूच्या छावणीत प्रवेश केला. या वेड्या प्रयत्नामध्ये ते सातही वीर प्राणास मुकले. कवितेची सुरवात शिवाजीच्या पत्रापासून आहे. ]

वेडात मराठे वीर दौडले सात !
"श्रुति धन्य जाहल्या श्रवुनि आपुली वार्ता
रण सोडुनि सेनासागर अमुचे पळता
अबलाहि घरोघर खऱ्या लाजतिल आता
भर दिवसा आम्हा दिसू लागली रात"
वेडात मराठे वीर दौडले सात !

ते कठोर अक्षर एक एक त्यातील
जाळीत चालले कणखर ताठर दील
"माघारी वळणे नाहि मराठी शील
विसरला महाशय काय लाविता जात ?"
वेडात मराठे वीर दौडले सात !

वर भिवई चढली दात दावती ओठ
छातीवर तुटली पटबंदाची गाठ
डोळ्यांत उठे काहूर ओलवे काठ
म्यानातुन उसळे तरवारीची पात
वेडात मराठे वीर दौडले सात !

"जरि काल दाविली प्रभु, गनिमांना पाठ
जरि काल विसरलो जरा मराठी जात
हा असा धावतो आज अरी-शिबिरांत
तव मानकरी हा घेउनि शीर करात"
वेडात मराठे वीर दौडले सात !

ते फिरता बाजुस डोळे किंचित ओले
सरदार सहा सरसावुनि उठले शेले
रिकिबीत टाकले पाय, झेलले भाले
उसळले धुळीचे मेघ सात निमिषात
वेडात मराठे वीर दौडले सात !

आश्चर्यमुग्ध टाकून मागुती सेना
अपमान बुजविण्या सात अर्पुनी माना
छावणीत शिरले थेट, भेट गनिमांना
कोसळल्या उल्का जळत सात दर्यांत
वेडात मराठे वीर दौडले सात !

खालून आग, वर आग, आग बाजूंनी,
समशेर उसळली सहस्र क्रूर इमानी,
गर्दीत लोपले सात जीव ते मानी
खग सात जळाले अभिमानी वणव्यात
वेडात मराठे वीर दौडले सात !

दगडावर दिसतिल अजुनि तेथल्या टाचा
ओढ्यात तरंगे अजुनि रंग रक्ताचा
क्षितिजावर उठतो अजुनि मेघ मातीचा
अद्याप विराणी कुणि वाऱ्यावर गात
वेडात मराठे वीर दौडले सात !

आवर पद हे मत्त प्रवासी,—
पहा जरा परतून प्रवासी, पहा जरा परतून्

घेत सुगंधाचा मागोसा
अलीपरी आलास विलासा
आणि फुलोरा लुटून जासी नव वेलीवरतून्
प्रवासी, पहा जरा परतून्

कलेकलेने चान्द खरोनी
आवस आली माझ्या गगनी
तोच उदेले दोन सुधाकर सुन्दर नयनांतून्
प्रवासी, पहा जरा परतून्

आणि चान्दणे सवे घेउनी
दुणावुनी तम जासी निघुनी
कशी साहु रे धुन्द रात ही बाहेरुन आतून्
प्रवासी, पहा जरा परतून्

क्षणभर येउन क्षणभर राहुन
क्षणभर हासुन क्षणभर पाहुन
क्षणात जासी चार युगांचा घाव उरी घालून्
प्रवासी, पहा जरा परतून्

वाळवंटि तू एक पदाती
ना कुणि सोबत ना साङ्गाती
पायतळी पेटेल आग उद्दाम शिरावर ऊन्
प्रवासी, पहा जरा परतून्

परत पाखरा, खन्त कशाला
घालिन तनुची तुला दुशाला
उन्नत माझे ऊर उशाला घोष तुझा ज्यातून्
प्रवासी, पहा जरा परतून्

जाणारच का–सुखात जा तर
बाग मोहरो तव वाटेवर
माग घेत तव चंद्र पुनेचा येवो गगनातून्
प्रवासी, पहा जरा परतून्

शेवटले जा पान मिटू दे
सुखेनैव यापुढे तुटू दे--
हृदयाचे रेशीम पदी तव बसलेले गुंतून्
प्रवासी, पहा जरा परतून्.

# उषःकाल

झाला उषःकाल राणी !

हिमबिंदू बिलगुनी फुलांना पानांना बसती
हलती हळु वाऱ्यावरती
जोजवती जणु नवथर बाला ही बाळे चिमणी
झाला उषःकाल राणी !

निळवन्तीच्या फुलू लागल्या कळया कुंपणावरी
येउनि रात्रीच्या प्रहरी
परत जायचे विसरुनि गेल्या वनदेवी कोणी
झाला उषःकाल राणी !

माणिकमोत्यांची पायाशी घालुनि बरसात
बसे संन्यस्त पारिजात
वाहु लागला सुगंध वारा तो वातावरणी
झाला उषःकाल राणी !

वनराईतुनि उठू लागली करीत किलबिल ती
पाखरे, अन् गगनी जाती
सोन्याच्या दर्यात गल्बते जणु गोजिरवाणी
झाला उषःकाल राणी !

इन्द्रनील ओटीत घेउनी शिंपित भवताली
आली निर्झरिणी, आली
खळाळते खडकावर हंसापरी शुभ्र पाणी
झाला उषःकाल राणी !

किनारती कनकाच्या धारा उदयगिरीवरती
जगावर अभिनव ये कांती
समूर्त झाली महाकवींची काय दिव्य वाणी
झाला उषःकाल राणी !

स्वप्नांचा वा खजिना घेउनि लगबगिने रात्र
गेली, चुकोनिया मात्र
उषास्वप्न हे उरले मागे–तुजसाठी रमणी
झाला उषःकाल राणी !

ग्रंथ संग्रहालय. ठाणे.
अनुक्रम ........ दि: ........
क्रमांक ........ नोंद दि: ........

घट तेजाचे भवती ओतित
असंख्य रवि–राजाचे प्रेषित
महाद्वार पूर्वेचे खोलुन क्षितिजावर येती !

चराचरांचे घेउन जीवन
करात, उदयाद्रीवर मागुन
टाकित पद गंभीर येतसे परमेश्वरमूर्ती.

आणि प्रभूचे आरुण, मंगल
पडता क्षितिजावरती पाउल
अग्निरसाच्या उठू लागल्या लाटा भूवरती.

देवाचा कर जाता स्पर्शुन
मेघखंडही दुभंग होउन
ज्योती उज्ज्वल निघुनी आतुन गगना आक्रमती.

करण्या सम्राटांचे स्वागत
नटलेली भू, नटले पर्वत
फुलांतही शृंगारुन बसली नाजुक हिमवंती.

या माझ्या हृदयावर देवा,
पवित्र अपुले पाउल ठेवा
अद्यापी अंधार रात्रिचा रेंगाळत अंती.

राहिल चरणांची हृदयी खुण
उरतिल अंतरि तेजाचे कण,
रात्रीमागुन रात्र येउ द्या कसली मग खंती !

# सैगल

भर मार्गांत कधी ऐकता तव मंजुळ गान
अडखळुनी जागी थांबतो क्षणभर बेभान
शब्दाशब्दाच्या घटातुन ओसंडे भाव
पारिजातकाच्या फुलांचा कोमल वर्षाव !

मंद लयीमधली आर्तता अन् मोहक झार
तप्त कांचनाची जणू तू खेचतोस तार !
प्रशान्त ओहळते स्वरांतिल सुंदर मार्दव हे
गहन भावनांची गमे ही जान्हवीच वाहे !

घालविल्या रात्री आठवे, त्या गोदाकाठी
घाटावर माथे टेकता विश्रांतीसाठी,
काळोखातुनि ये दुरोनी दिव्य तुझा नाद
जीर्ण देवळांच्या तटावर घुमवित पडसाद !

हृदयातील रणे जाहली क्षणामधे शान्त
आणि विस्मृतीच्या नाहली चांदण्यात रात
अशीच संगीते आळवी तुझी कलावन्ता,
घडिभर जागव रे आमुची अशीच मानवता !

# देवाच्या दारी

नाम तुझे गाती गाती थोरसान
दारी तुझ्या दीन दान घेती

चिखलात येता मूल माखोनिया
प्रेमे न्हाऊ तया घालतोसी

किंवा ज्याचा प्राण भुके कासाविस
त्याला दोन घास भरविसी

आणि येता कोणी पांगळा वा खुळा
त्यालाहि तू लळा लावितोसी

केव्हाचा रे उभा मीहि तुझ्या दारी
उशीर का परी आज असा ?

तूच भक्तासाठी सोसलीस झीज
आणि आता नीज कशी आली ?

किंवा दारी तुझ्या आलो रित्या करी
म्हणोनिया दूरी राहिलास !

अपेक्षिसी देवा काय नजराणा
कारण तू राणा जगताचा

पावलात तुझ्या गुंतलेले मन
काय अन्य धन माझ्यापाशी ?

उधळित आज भक्तीचीच फुले
डोळे तुझे ओले करीन मी !

तूच पाठविले हाटात या मला
नाही कोणी दिला वाटाड्याही

वाटा कितीतरी — तूच निर्मिल्यासे
बालमन कसे — चुकेल ना ?

तूच दिले माझ्या — डोईवरी ओझे
पंकी पाय माझे — रुतविले

तूच जागोजाग — मांडलेसी खेळ
राहिला न वेळ — ध्यानी माझ्या

आणि आता होता — वेळ परताया
का रे देवराया — कोपसी तू ?

२

कोण्या वैभवात — होऊनिया लीन
विसरसी दीन — लेकरांना ?

म्हणतात तुझ्या — दयेला न अन्त
पुकारती सन्त — थोरी तुझी

चिमण्यांच्या घरा — लावसी मशाल
केवढी विशाल — दया तुझी !

जळातले जीव — तापल्या दुपारी
वाळवंटावरी — ओढसी तू

पाहसी तू शांत — त्यांची तगमग
कोणाचा हा राग — कोणावरी ?

कोण गुन्हेगार — क्षमावन्त देवा
क्षमेचा अन ठेवा — कोणासाठी ?

तुझ्या महिम्याची     प्रचंड पुराणे
गमती तराणे     अर्थहीन !

तुझी पाषाणाने     पहिलीच मूर्ती
घडविली, मति     थोर त्याची !

आणि आता त्याच     मूर्ति पुजवून
वेडे विडम्बन     करतात !

असो, भलेबुरे     बदलीसे वाचा
काय मानायाचा     त्याचा राग

निखाऱ्यात बद्ध     असताना पाय
अपेक्षिसी काय     संकीर्तन !

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम क्रमांक

२

आणि आज मन     शंकित हे होई
आहेस की नाही     मुळात तू

भित्या भावनेला     शोधायासी धीर
पाषाणास थोर     मीच केले

दुर्बलता माझी     दडवाया गेलो
अधिक जाहलो     दुर्बल मी

टाकूनिया शस्त्र     सोडूनिया रण
वाचवाया प्राण     येथे आलो

भीरुतेत माझ्या     तुझे संगोपन
मीच केले मन     रंजवाया

परततो आता रणात माघारा
सैनिका निवारा समरात

माझ्या जीवनाचा मीच शिलेदार
व्यर्थ हा पुकार तुझ्या दारी

आहेस की नाही आज नसे चिंता
दोहींमधे आता भेद नुरे !

# टिळकांच्या पुतळ्याजवळ

पुळणीत टेकले माथे श्रांत अधीर,
दर्यावर होता वाहत मन्द समीर,
काजळले होते गगनाचे कंगोरे,
कल्लोळत अन्तरि काहि तरी काहूर !

उद्दाम निराशा करि तांडव हृदयात,
घोंगावे वादळ जेवी जीर्ण गडात,
सांदीत बसूनी रातकिड्यांची सेना
निज अक्रोशाने निनादवी घन रात.

तो वळले डोळे नकळत बाजुस वरती,
दृष्टीत डोंगरापरी भरे ती मूर्ती,
क्षण एक आतला शांत गल्बला झाला
ओसरता वारा जशी स्थिरावी ज्योती.

ती कणखर मूर्ती धीट मराठी थाट
आदळतो जीवर अजून पश्चिम-वात,
ती अजिंक्य छाती ताठर अन् रणशील
जी पाहुनि सागर थबके, परते आत.

कङ्गाल खोपटी कोळ्यांची पायाशी
वर असीम गगनी नक्षत्रांच्या राशी,
तम-लांछित सागर पसरे या बाजूस,
उन्मत्त गोपुरे दूर टेकडीपाशी.

ते होते जीवित—हाती धरुनि हताश
खळखळती ज्यांवर दृढ पोलादी पाश
ध्वज चढवायाची एक अदम्य मनीषा
ते होते जीवित—अन् हा जीवितभास !

कण क्षुद्र घेउनी सुखदु:खांचे हाती,
धापावत आम्ही जीवनमार्गावरती,
पर्णापरि वाऱ्यावरती हलतो, डुलतो
जो धुळीत लाभे अखेरची विश्रांती.

हे जीवन कसले, ही मरणांची माला,
मासोळी झटते तोडायास गळाला,
दर्यावर वाहे दुभंगलेली नाव
क्षण खाली वरती, क्षणात आणि तळाला!

दूरस्थ कुणी दे तुझ्या करी ही कविता
वाहते जिच्यातुनि त्याची जीवन–सरिता
   खळखळे, अडखळे, सुके, कधी फेसाळे
परि अखंड शोधे वाट समुद्राकरिता !

खडकाळ प्रान्त तो ही जेथून निघाली
पथ शोधित आली रानातून अकेली,
   नच रम्य राउळे, कलापूर्ण वा घाट
तीरावर तुरळक परि अंकुरती वेली !

नव पर्णांच्या या विरल माण्डवाखाली
होईल सावली कुणा, कुणास कहाली,
   तोषेल कुणी, शापील कुणी दुर्वास,
"या जळोत समिधा–भव्य हवी वृक्षाली !"

समिधाच सख्या या, त्यांत कसा ओलावा,
कोठून फुलापरि वा मकरन्द मिळावा ?
   जात्याच रुक्ष या, एकच त्या आकांक्षा,
तव आंतर अग्नी क्षणभर तरि फुलवावा !

# कि ना रा

आला किनारा !

निनादे नभी नाविकांनो इशारा
आला किनारा !

उद्दाम दर्यामधे वादळी
जहाजे शिडावून ही घातली
जुमानीत ना पामरांचा हकारा
आला किनारा !

सरायास संग्राम आला अता
तपांची समोरी उभी सांगता
युगांच्या श्रमांचा दिसे हा निवारा
आला किनारा !

प्रकाशे दिव्यांची पहा माळ ती
शलाका निळ्यालाल हिंदोलती
तमाला जणू अग्निचा ये फुलोरा
आला किनारा !

जयांनी दले येथ हाकारली
क्षणासाठि या जीवने जाळली
सुखेनैव स्वीकारुनी शूल-कारा
आला किनारा !

तयांच्या स्मृती गौरवे वन्दुनी
उभे अंतिच्या संगरा राहुनी
किनाऱ्यास झेंडे जयाचे उभारा
आला किनारा !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १८५५१
संदर्भ शाखा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ........ दि: ........
क्रमांक ........ नोंद दि: ........

# व र्षा ग म न

सजल श्याम घन गर्जत आले बरसत आज तुषार्
आता जीवनमय संसार् !

नाचवीत तळहाती ज्वाला
वणव्यांच्या कमरेस मेखला—
बांधुनिया हा ग्रीष्म कृतांतापरी करी संचार् !

चार दिशांच्या भव्य कटाही
दिनरात्रींची तडकत लाही
भकास वाळूरणाप्रमाणे पसरे दीर्घ दुपार् !

लोपुन गेले वसंतवैभव
सुगंध विरले नुरले मार्दव
मंजुळ कोकिलकूजन सरले होत सुने सहकार् !

आज सरे पण दहनसत्र ते
कुशीत घ्याया दग्ध जगाते
फुलवित हृदयी तेज पातले जीवनदूत उदार् !

जळक्या पिवळ्या माळावरती
पुलकित गंधित झाली माती
बिजे तृणाची गर्भामधुनी देत नवा हुंकार् !

डोह कपारीमधील काळे
शेवाळ्यातुनि उचलुनि डोळे
बघत केधवा येइल वाहत धावत जीवनधार् !

रित्या नद्या सुकलेले निर्झर
भकास राने उदास डोंगर
कृतज्ञतेने बघती श्रवती मेघांचे ललकार !

# विराट वड

गावाच्या सीमेस नदीच्या तीरा
पारंब्या-फांद्यांचा घालून डेरा—
विषण्ण दृष्टीने देखत नभा
विराट वड हा राहिला उभा.
काळाची असंख्य पाखरे आली
जीवन-कणिका टिपून गेली
अनेक पिढ्यांची यात्रा विशाल
तयाच्या पुढून गेलेली पैल
काळाशी झुंजून राहिला जेता
विजय परी तो जाचतो आता.
राक्षसी खोडास सहस्र तडे
पाचोळा अमाप पायाशी पडे
आलेली देहाला पाषाणकळा
देवत्व जाऊन उरली शिळा.
नवीन पालवी क्वचित कोठे
जुनाट पानाचा देठ न तुटे
फोडून दरड मुळे ती काही
शोधती ओलावा नदीच्या डोही.
पर्णांच्या गुहात अंधार माजे
उषेचा किरण आत न धजे

लोंबती मोहळे     भयाण काळी
कोळ्यांची धूसर     लागली जाळी
गिधाड घुबडे     धरून शिरी
कोकीळ पूर्वींचे     स्मरतो उरी.
भोवती तयाच्या     तरंगे भीती
सावली प्रवासी     त्याची न घेती
निर्दय अफवा     विळखा घाली
रात्रीचा समंध     बसतो खाली
गावची बालके     राहून दूरी
भयार्त डोळ्यांनी     पाहती वरी.
लोटून काळास     ठाकला धीट
आजला त्याचीच     पाहतो वाट
कर्वत कुऱ्हाड     वाजता रानी
आशाळ भावाने     ऐकतो ध्वनी
परंतु हत्यारे     क्षुद्र ती हाय
अशा या पहाडा-     पुढती काय ?
समर्थ आता ती     एकली वीज
देण्यास याजला     विश्रांति नीज
म्हणून तयाची     उदास आशा
शोधते नभात     रुपेरी रेषा।

# मायदेशचा वारा

झेपतो, बिलगतो, फिरतो भवति भरारा
हा काय माझिया मायदेशचा वारा !

द्राक्षांचे बहरत बाग मनोहर जेथे
त्या सुनीत वेली रांग पऱ्यांची गमते
लेऊन उभ्या जणु हिरव्या नव वसनाते
कटिकण्ठावरती वरती मौक्तिकहारा
हा काय माझिया मायदेशचा वारा !

ते नागवेलिचे माण्डव शीतल शान्त
विश्रान्तिच जेथे झालेली विश्रांत
विहिरीवर नादे सुरेल जीवनगीत
काळीत वाहती सन्थ रुपेरी धारा
हा काय माझिया मायदेशचा वारा !

उठतात धुराच्या रुखावळीतुन रेषा
स्वप्नापरि सुन्दर, आक्रमती अवकाशा
लाजत्या नदीवर डोलत हिरव्या आशा
त्या अमल जगातिल आणिसि येथ निवारा
हा काय माझिया मायदेशचा वारा !

रसरसते जेथे कनकरसात प्रभात
चांदण्यात उमले निशिगन्धापरि रात
जात्यावर घुमतो मंजुळ जेथ निशान्त
रसतुषार तेथिल वाहसि काय उदारा
हा काय माझिया मायदेशचा वारा !

की याच दिशेला असेल देखत कोणी
नेत्रातुनि शिंपत सुनेपणावर पाणी
त्या हृदयामधली करुण रसातें विराणी
तव लहरींवरती लहरत मात्र समीरा,
हा काय माझिया मायदेशचा वारा !

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्र
अनुक्रम ................ दि: ................
[illegible] ................ नों दि: ................

# उत्तर रात्री

निःशब्द शांतता – विश्वचि अवघे शांत !
दशदिशांत काठोकाठ दाटली रात
जग विराट पक्षापरी मिटोनी पंख
कुहरात निशेच्या पडले श्रांत निवांत !

अंधार भरे, अंधार उरे क्षितिजात
रंगाकृति विरल्या चराचरांच्या त्यांत
त्या गहन अभावावरी तरंगत तारे
जणु कबरीवरती कुसुमांची बरसात !

रण भीषण सरले, विरले विजयी घोष
आक्रोशुन पडले कंठ बळींचे शोष
आशांची शकले कवळुनिया हृदयाशी
हतभाग जाहले स्वप्नामधि बेहोष !

निद्रिस्त जगातुन फिरतो मंद समीर
घोंगावत घाली गस्त मधून गभीर
वा स्मशानभूवर भ्रमे एकला कोणी
मरणाचे इंधन सारित वेडा पीर !

ती सुवर्णयात्रा खंडित घडिभर झाली
बाजारपथांच्या झाल्या रिक्त पखाली
श्रम बिलगुन पडले कुशीत विश्रांतीच्या
मालवल्या ज्योती उंच विलास महाली !

हो वसुंधरा ही विगलित आणि मलूल,
आकाशफुलांचे पाहत स्वप्न विशाल
निद्रांकित झाली, प्रकाशवस्त्र गळाले
थबकून उशाशी उभा राहिला काल !

जमतील उद्या त्या पुनरपि जीवन-कणिका
गगनात शांत या भरतिल कर्कश हाका
या सुन्या पथावर पडतिल चरण असंख्य
पेटवतिल वणवा भूवर सूर्य-शलाका !

का अजून जीवा, जागसि जळसि अकेला
शुक्राचा तारा तळपत देख उदेला
विझवून दिवे हे दाहक हृदयामधले
विश्रांत सख्या हो, ओसरते ही वेला !

मराठा ग्रंथ ...
अनुक्रम ........................ दि: ..................
क्रमांक ........................ नोंद दि ..................

# ीतीसाठी प्रीती

प्रीतीसाठिच प्रीति घोष घुमतो, प्रीती चिरंजीविनी
आहे तीत उदात्तता म्हणत ते ती ईश्वरी भावना

वीणा छेडित गात संतत तिचे दिव्यत्व वागीश्वरी
होतो मुग्धच मी, परंतु मज ती थोरीव ना जाणवे.

माझ्या प्रीतित दिव्यता न असली ती मानवी सर्वथा
आहे ती तुझियावरी नि रमते ती वर्तमानामधे

कोठे शाश्वत या अशाश्वत जगी, ज्या अंतरी ही उदे
तेही नश्वर, वाहते अनुदिनी शून्याकडे जीवन।

विश्वाचीहि फुले गळून पडती आकाशगंगेमधे
प्रीतीलाच कसा चिरंतनपणा जी जन्मली नश्वरी ?

आहे एकचि सत्य, तेहि तुजला व्हावे दिलासा न का ?
चाले जो क्षण त्यावरी विहरते गे नाममुद्रा तुझी !

जाणाऱ्या घटकेत जीवित भरे, अज्ञात आहे उद्या
व्हावे दुःखित का तिची प्रणयिनी, मांडूनिया कुंडली ?

# नि ळा प क्षी

उष:कालचे प्रकाशमंडल येता प्राचीवर
निळे पाखरू त्यातुन कोणी अवतरले सुन्दर

फुलराणीचे विलासतारू निळी उभारुनि शिडे
सोनेरी दरियातुन आले--आले माझ्याकडे !

पालवलेल्या मृदुल पाकळ्या पंखांच्या मिटवुन
झाले ज्यांवर दिसे उषेच्या किरणांचे सिंचन--

स्वप्न निळे ते बसे अंगणी हिरव्या वेलीवरी
आकाशाचा आशीर्वादच आला माझ्या घरी !

फुलवुनि अपुला दिव्य पिसारा नाच पदांचा करी
नवरत्नांचा झुलतो पंखा गमे लतेच्या शिरी !

बरसु लागली गीते मंजुळ कोमल कंठातुन
स्वरलहरींनी वेढुन गेले सारे मम जीवन

जिवाभोवती वितरुनि माझ्या घडीभरी लाघव
हन्त, नभी ते निघून गेले मखमाली मार्दव !

उदासवाणे नेत्र शोधती जे कोठेही नसे
गलित पाकळ्यांतुनी जुळावे पुन्हा पुष्प ते कसे ?

निळ्या अनंता मिळून गेला माझा पक्षी निळा
रखरखती भवताली आता माध्यान्हीच्या झळा !

वर पूर्ण चंद्रमा पसरी मायाजाल
वसुधेच्या वदनी लहरे हास्य सलील
ते समूर्त होउन तीरावर यमुनेच्या
हिमशुभ्र उभा हा संगमरवर विशाल !

कुणि देवदूत वा फुलवुनि पंख फुलांचे
तीरावर बसला मोजित कण शतकांचे
दे सुवर्णपूजक जनतेला सन्देश
'धन एकच आहे जगती अमर कलेचे !'

की कालिंदीवर करण्याला जलकेली
कुणि यक्षलोकिची रूपगर्विता आली
त्या नितळ दर्पणी विवस्त्र होउनि पाही
निज लावण्याची उसासलेली वेली !

वा काव्य मनोहर, हो रचनेत बहार
यमकांपरि गमती भव्य समान मिनार
वर विहग कल्पना कलानंद बेहोष
तळि समाधिस्थ हो पण कारुण्य अपार !

पुनवेच्या अथवा सुधाशयावर शान्त
हो विहार करुनी राजहंस विश्रान्त !
चंद्रिका – मधूने भरे घरेचा पेला
हा तरंग मोत्यापरी तरारे त्यात !

जे घुमले स्फुरले असंख्यशा हृदयात
प्रीतीचे उज्ज्वल उन्मादक संगीत
मधुगीताची त्या ही मंजूळ लकेर
चालली युगातुन एका अन्य युगात !

की ब्रह्मांडाच्या अथांग या कासारी
ग्रहनक्षत्रांची फुलली कमळे सारी
या भूपद्माच्या एक पाकळीवरती
हा थेंब दवाचा विलसे विमल रुपेरी !

हा अमर मानवी प्रतिभेचा शृंगार
तो उन्मन होता अथवा रचनाकार
स्वप्नात पाहिला इंद्रमहाल, उठोनी
या धवल शिलेतुन करी स्वप्न साकार !

की असत्य केवळ प्रणयाचे प्राचीन
खोटीच देवता, मंदिर मात्र महान
वर उदात्ततेचे हे स्वर्गीय मनोरे
दडलेली खाली देहलालसा हीन !

कामान्ध शहाचे सजवायास पलंग
अपराध एकला ज्यांचा स्त्रीत्व अपंग
ओढल्या किती त्या रमणी राणिवशात
तो असे अनात्मा, नाही मदन अनंग !

शत अनामिकांचे त्या हे कबरस्तान
त्या अबल आसवांचे हे करुण निधान
मखमली उशीपरि अवघे जीवितकार्य
हो मृदुल मंचकावर ज्यांचे बलिदान !

# उ षा स्व प्न

सखे, मृगजलात मी कमलिनीपरी नाहले,
प्रकाशकिरणात या नवल हन्त ते संपले,
जगा गमत मित्र तो रवि मलाच हो वंचक
उदास मरुभूपरी दिसत हा रिता मंचक !

तुझे चरण लागता उगवतीस नारायणा,
सुवर्णलहरींवरी विहग जात तारांगणा
परी मजसि शाप तो, हृदयपाखरू बापडे
विपक्ष घरट्यामधे विकल होउनीया पडे !

द्युतीत तव नाहुनी कनकवर्ण होई धरा,
मलाच तिमिरात का बुडविसी प्रकाशेश्वरा ?
मनोगत लतेवरी सुमनरूप साकारले,
मनोगत मदीय रे परि तवागमी भंगले !

सखे, अननुभूतशी उदित हो मनी भावना,
उगाच रुधिरातुनी लहरु लागली चेतना
उशीवरति टेकता शिर निशी उगा वाटले
चहूकडुनि वर्षती तनुवरी सुगंधी फुले—

उगाच गमले कुठे मधुर तार झंकारते,
स्वरांवरि सकंप त्या हृदय आत हिंदोलते,
गमे कुणि तरी कुठे कुजबुजे मला बोलवी,
कुणी श्वसन रोधुनी दुरुनिया करा पालवी !

क्षणी विहरू लागले अतल यक्षदेशांतरी
प्रफुल्ल कमलापरी पुनव जेथ नीलाम्बरी,
प्रसन्न गगनात त्या तरल भव्य मेघावर,
मनोहर दिसे मला सुरधनूपरी मन्दिर !

तिथे मदनरूप तो प्रिय सुहास होता उभा,
विशाल नयनी फुले अभय यौवनाची प्रभा !
तयास बघता सखे, वळत नेत्र पायांकडे
अशान्त हृदयात हो, नव अबोध भीती जडे !

करी स्मित सरे पुढे धरुनिया कराने मला,
म्हणे मजसि आर्जवे 'अमर मंदिरी या चला'
समीरलहरींवरी पतित पर्ण जाते जसे
तशीच सखयास मी अनुसरे, कळे ना कसे !

महाल—निथळे तिथे अणुक्षणूंतुनी चांदणे
सुरेशभुवनीहि ना विभव रम्य ते नांदणे
'कुठे असत मी' असे वदत चित्त भांबावुन,
धरूनि करपाशि तो म्हणत 'हे प्रिये यौवन !'

कवेत मज वेढुनी, फिरवुनी करा कुंतली,
मदान्ध नयनांतुनी नयनि वारुणी ओतली !
मुलायम जलापरी, परिमलार्त वायूपरी
सुवर्णमय मंचका बघुनिया थरारे उरी !

फुलांमधिल रम्यता, विधुकरातली चारुता,
सुधेमधिल माधुरी, मधुमधील बेहोषता,
अजाण मम जीवनावर उधाणला संगम,
लतेसि पहिला जसा करित धुंद पुष्पागम !

सखे, कथु कसे पुढे हळुच ओढली मेखला
नको म्हणत मी तरी लव दया न त्या ये खला
गळून विनयापरी वसन गे पडे रेशमी
तशीच सरूनी पुढे विजविला सखे, दीप मी—

सखे, विजविला दिवा–विजविलेच सारे दिवे
भये मजसि जाग ये, सकल लोपली वैभवे
कुठे न अनिरुद्ध तो प्रणय ते कुठे मंदिर ?
कठोर पडला कळे किरण मात्र नेत्रावर !

# जीर्ण देवळापुढे

उदास अंधारात एकली
  जळत असे ज्योती
जीर्ण देवळापुढे नदीवर
  या पारावरती.

घिरट्या घाली अवखळ वारा
  बावरुनी जाय
फडफडवी चिमकुले पाखरू
  सोनेरी काय !

भयकर एकान्तात देत ना
  साद तिला कोणी
ऐकत राही, तळी चिऱ्यांशी
  कुजबुजते पाणी.

मराठी ग्रंथ संग्रहालय,

शिशाप्रमाणे दाटुन पडली
  सभोवती रात्र
डोहावरती बिंबशलाका
  थरथरती मात्र.

अबल अन्तरातील रोधुनी
  भीती आशंका
उधळित राही काळोखावर
  तेजाच्या कणिका.

तेज तेहि पण अंधुक अपुरे
 इवलीशी वात
उघडुनि जबडा प्रकाश गिळते
 भयाण ती रात !

तशीच तडफड करीत राही
 तेवत ती ज्योती
उजळ पायऱ्या करी, जरी ना
 मंदिर वा मूर्ती !

## स मा धा न

क्रोधाने केधवा
हेलावता मन
यातच सांत्वन
लाभो मज :

खुजांचा मेळावा
मूर्खांची मिरास
अभिधान यास
जगत हे !

ऐशाच्या सांगाती
व्हावे विनोदन
कासया दहन
अंतराचे ?

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांक
अनुक्रम ........ दि: ........
वर्ग ........ नों: दि: ........

वारुळाशी उभे
राहूनी बघावे
कीटकांचे थवे
लीला त्यांच्या

अफाट विस्तार
अहंतेचा होता
सर्वत्र क्षुद्रता
(खरीखोटी !)

धूराचा विशाल
स्तंभ उंचावत
होई गगनात
मेघरूप !

माझ्या आत्मतेची
कणिका ही तैशी
वाढत तत्वाशी
एक व्हावी

माझ्यातच राहे
विश्वाची राणीव
होता ही जाणीव
काय केवा ?

बाहुल्यांच्या जगी
जाता गलीव्हरं
केवळ ये भर
विनोदासी !

# पाऊल चिन्हे

मी एक रात्रि त्या नक्षत्रांना पुसले
परमेश्वर नाहीं घोकत मन मम बसले
परि तुम्ही चिरंतन विश्वातील प्रवासी
का चरण केधवा तुम्हांस त्याचे दिसले !

स्मित करुन म्हणाल्या मला चांदण्या काही,
तो मुक्त प्रवासी फिरत सदोदित राही
उठतात तमावर त्याची पाउल चिन्हे-
त्यांनाच पुससि तू, आहे की तो नाही !

# फेरीवाला

आला हा ललकारित आला
आला फेरीवाला
दुनियेच्या पेठेत पुकारित
बहुविध मालमसाला !
आला आला फेरीवाला !

वेष यतीचा अंगावरती
मुद्रेवरती अथांग प्रीती
नयनांमधली उदारता ती
अशेष जगता दे आमंत्रण—
या संकोच कशाला ?
आला आला फेरीवाला !

वामनगतिने हा सौदागर
वाट चालतो अधीर आतुर
या देशातुन त्या देशावर
टाकित पाउल अपक्षतेने
संधी दे सकलांला
आला आला फेरीवाला !

करी पुकारा दारी थांबुन :
या सुजनांनो, सोन्याचा दिन
अमोल माझा माल, नको धन
रक्तमांस हे स्वस्त चालले
खुशाल या लुटण्याला !
आला आला फेरीवाला !

हा घट देखा, यातिल शोणित
मेले तरि अद्याप उधाणत
उमद्या युवकांचे हो जीवित
रणांगणावर पिळून त्याचा
घट ताजा हा भरला !
आला आला फेरीवाला !

कुपीत या भरले जल कोमल
अगणित अबलांच्या नेत्रांतिल
मौज बघा, द्या नुसती चाहुल
थरथरती हे थेंब भयाने
स्वभाव अजुनी उरला !
आला आला फेरीवाला !

मंजुषेत या राख मनोहर
उदात्त सोज्ज्वळ नैतिक नागर !
आग बरसता सुखी घरांवर
मिठ्या मारुनी गळ्यात जळले
त्यांचा मिश्रित काला
आला आला फेरीवाला !

सहज बोट राखेतुन सारा
गृहसौख्याचा गोड उबारा
गुंतुन राहे आत बिचारा !
अदग्ध आशाचे काळे कण
लागति अजुनि कराला !
आला आला फेरीवाला !

जुनवट अथवा प्रौढ नको का ?
ही घ्या दुसरी संदुक देखा
बाळजिवांच्या ललाटरेखा
फुलण्यापूर्वी फुटलेल्या, हा—
मिळतो माल कुणाला ?
आला आला फेरीवाला

ही बरणी ? हिजमधे संस्कृती
मुरलेली शतकाशतकांती
काहीही घ्या तयासंगती
पसा भरुन घ्या मोफत, असली
कुठे किफायत बोला ?
आला आला फेरीवाला !

दुनियेच्या पेठेत पुकारित
अपुला मालमसाला !
आला आला फेरीवाला !

सरस्वतीच्या नौका या
युगयात्रेस निघाल्या
शुभ्र शिडांच्या पाकळ्या
महाशून्यात फुलल्या.

करी हर्षाची लावणी
मंद सुगंध समीर
लाल तेजाने कोंदले
निळे नभाचे मंदिर.

रत्नाकरात हेलावे
हिऱ्यामाणकांचे पाणी
गाई वत्सल किनारा
आशीर्वचनांची गाणी.

चार दिशांच्या देवता
उभ्या देहलीवरती
हाती मेघांची तबके
त्यांत ज्योतींची आरती.

अशा सोहळ्यात झाले
खुले अपाराचे द्वार
तिन्ही काळांचा रंगला
धुंद झपूर्झा समोर.

नौका चालल्या चालल्या
दूर बंदरापासून
जीवापासून जाहलें
आता वेगळे जीवन.

हीन मलीन नश्वर
सारे किनाऱ्यास गळे
दिव्य प्रतिभेची ज्योत
युगायुगात पाजळे.

माझ्या साम्राज्यात आता
मीच भूप मीच प्रजा
माझ्या देवळात झालो
मीच देव मीच पूजा.

माझ्या मनात शलाका
विश्वगर्भ आकाशाची
माझ्या प्रज्ञेतुनि उदे
भागीरथी प्रकाशाची.

दूरतेला आली आता
माझ्यापाशी जवळीक
धरतीच्या मातीमधे
स्वर्गाशी हो सोयरीक.

नीतिरीतीची देहली
गेले ओलांडून मन
मुक्ततेत झाले साऱ्या
शृंखलांचे विसर्जन.

माझ्या आत्मतेस नाही
आता अहंतेचा पार
झाले अनंताचे घर
त्याला जीवनाचे दार.

# पालखी

पहाटच्या तिमिरात दूरवर कुठल्या देवालयी
घंटा निनादते आहे
त्या स्वरलहरींच्या स्कंधावर लाल पालखी ही
कुणाची हेलावत राहे !

मम नगराच्या वेशीवरती रत्नदिव्यांच्या या
अचानक झगमगल्या माला
काळोखावर कनकफुलांचे उलगडले गालिचे
पथावर किनारल्या ज्वाला.

नीरवतेच्या गहन धुक्यातुनि रुणझुणल्या तारा
स्वरांकुर क्षितिजाला फुटले
धवलनील फुलवूनि पिसारा व्योमनदीच्या तटी
नाचती नक्षत्रांची दले.

अशा वैभवामधून मिरवित दिव्य पालखी ती
येतसे माझ्या दारावरी
किनखापी पडद्यातुनि प्रकटे स्वर्गशलाकेपरी
सकंकण हात कुणाचा तरी !

## प हा ट प क्षी

गाढ शांतता बसली होती धरतीला वेढुनी
होते विसावले जीवन

पहाटचा अंधार दाटला, सहज जागता तुझे
आले कानावर कूजन

तिमिराच्या कुहरातुन गमला सोनेरी ओहळ
स्वरांचा धरतीवर वाहत

मुखरित होउनि गगन गात वा रिझवाया अंतर
झाली पहाट रोमांचित,

की नीरवतेच्या विषण्ण वेलीवर
हा अवचित फुटला वासंतिक मोहर
त्या गीतपरागी रुमझुमले अंबर

सरोवरावर संथ वाहता रात्री मंदानिल
उमटे नाजुक आंदोलन

निजलेल्या कमळांच्या भवती थरथरती वर्तुळे
पाखरा, तसे तुझे गायन !

युगपुरुषांची विशाल प्रज्ञा जी रात्री जागते
जळते, दीप जगा दाविते

कलाप्रभूंची सुपर्ण प्रतिभा जड संसारातुनी
धागे दीप्तीचे ओविते

तीच काय साकार होउनी अथांग नीलामधे
विहरते नक्षत्रांच्या कुली

सात मुनींसह हितगुज करते, व्याधासह धावते
नाहते व्योमनदीच्या जली

भग्नाश होउनी वा जीवनसंगरी
मखमली घनांच्या निळ्या बिछान्यावरी
विश्रांत व्हावया जाई घटकाभरी!

आद्य ऋषींच्या हृदयामधली वा महदाकांक्षा
शोधण्या विश्वाचे कारण

एकान्तातुन करित चालली सामगीतगायन
जडाचे ओलांडुनि कुंपण!

नभार्णवातिल दिव्य नाविका, कुठल्या देशाकडे
स्वरमय प्रवास तव चालला

कुठले बंदर किरणशलाका पसरुनि हिरव्या निळ्या
बाहते अनंतातुनी तुला

पैलथडीला क्षितिजाच्या वा यक्षांचे नंदन
तयाच्या काय किनाऱ्याकडे

इंद्रधनूच्या उंच कमानी वेशीवरती जिथे
जेथे कल्पफुलांचे सडे

रसरसून जेथे पुनवेपरि यौवन
निःशंक विलसते वृद्धत्वावाचुन
हो सदैव जेथे नवतेचे सिंचन

कविकुलगुरुची विहग कल्पना जेथे मेघासह
गेली धनेश्वराच्या पुरी

चंद्रकिरण का वेचुन केले तेथे घरटे तुवा
कोठल्या अशोक वृक्षावरी ?

श्रमित दलित जे त्यांच्या निद्रित नयनांपुढती सख्या
चितारुनि सोन्याची द्वारका

विद्ध मनांना कुरवाळुनिया असंख्य शेजेवरी
दावुनी आशेच्या तारका

शिणून भागुन उदारहृदयी स्वप्नांची मालिका
नभातुनि माघारी चालली

सोबत करसी का स्नेहाची, कृतज्ञतेने तया
अर्पिसी मंजुळ गीतांजली !

एकाकी शय्येवरी कुणी कामिनी
वैरीण जाहली निद्रेविण यामिनी
पापण्या पहाटे शिणलेल्या मिटवुनी

उषास्वप्न ते असेल परतत त्याच जमावातुनी
करूनी प्रणयाची पूर्तता

करी तयाला साथ उदारा असुच्या जगतामधे
राहे स्वप्नातच रम्यता !

पूर्वरात्रि वा क्षितिजावरती चंदेरी पुष्पक
घनाचे घेउनि ये हिमकर

वसुंधरेचा प्रियकर, बाहू पसरुनिया शीतल
धरिले तिजला हृदयावर

स्तनापरी हो उन्नत पर्वत स्पर्शाने पुलकित
सुखाच्या लहरी देहातुन

अधरासम ती रसमय सरिता, होइ चंद्रिकामय
घेता चंद्राने चुंबन

उन्माद प्रीतिचा घटकाभर दावुनी
तो निघून गेला निर्दय गगनातुनी
विरहाच्या तिमिरी गुदमरली मेदिनी

दूत तिचा तू प्रवास करसी क्षितिजाच्या खालती
शोधण्या चंद्राचे मंदिर

त्यास कथाया अवमानित त्या हृदयाची वेदना
गुंफण्या ओघळलेला सर !

अथवा काळोखात बुडाले अशेष अमुचे जग
जाहले निद्रेच्या अंकित

तूच राहसी जागृत करसी गगनांतुन पाहरा
राखण्या पृथ्वीचे संचित

पहाट होता पूर्वदिशेचे सळसळले अंतर
लागली मात्र तुला चाहुल

उजळित अवघे त्रिभुवन येइल तेजाची जान्हवी
पावन होइल उदयाचल

लखलखती द्वारे क्षितिजाची खोलुनी
तो प्रकाशदाता बसेल सिंहासनी
दुमदुमतिल जगती पुन्हा जीवनध्वनी

चराचरांना पुन्हा हरपल्या मिळतिल रंगाकृती
येइल सौन्दर्या जागृती

तिमिरामधुनी करावयाला स्वागत जासी पुढे
गात त्या तेजाची आरती !

•

वसुंधरेचा प्रियकर, बाहू पसरुनिया शीतल
धरिले तिजला हृदयावर

स्तनापरी हो उन्नत पर्वत स्पर्शाने पुलकित
सुखाच्या लहरी देहातुन

अधरासम ती रसमय सरिता, होइ चंद्रिकामय
घेता चंद्राने चुंबन

उन्माद प्रीतिचा घटकाभर दावुनी
तो निघून गेला निर्दय गगनातुनी
विरहाच्या तिमिरी गुदमरली मेदिनी

दूत तिचा तू प्रवास करसी क्षितिजाच्या खालती
शोधण्या चंद्राचे मंदिर

त्यास कथाया अवमानित त्या हृदयाची वेदना
गुंफण्या ओघळलेला सर !

अथवा काळोखात बुडाले अशेष अमुचे जग
जाहले निद्रेच्या अंकित

तूच राहसी जागृत करसी गगनांतुन पाहरा
राखण्या पृथ्वीचे संचित

पहाट होता पूर्वदिशेचे सळसळले अंतर
लागली मात्र तुला चाहुल

उजळित अवघे त्रिभुवन येइल तेजाची जान्हवी
पावन होइल उदयाचल

लखलखती द्वारे क्षितिजाची खोलुनी
तो प्रकाशदाता बसेल सिंहासनी
दुमदुमतिल जगती पुन्हा जीवनध्वनी

चराचरांना पुन्हा हरपल्या मिळतिल रंगाकृती
येइल सौन्दर्या जागृती

तिमिरामधुनी करावयाला स्वागत जासी पुढे
गात त्या तेजाची आरती !

# रे परत पाखरा

रे परत पाखरा परत, पातला संधिकाल भूवरी
तिमिरजाल पसरण्या सिद्ध हो क्षितिजावर शर्वरी !

त्या दिनकमळाची शेवटची पाकळी
कोमेजुनि पडली मावळतीच्या तळी
खिल्लार परतले किरणांचे गोकुळी
धुमसत येती कृष्ण सावल्या मूक भुजंगापरी !

तेजासह गेले वाहुनि कोलाहल
मौनाची उरली उदासता श्यामल
आकृती निखळती अवघ्या सृष्टीतिल
रंग विरुनिया, गहन उलगडे काळोखाची दरी !

तू रसिक मुशाफिर, रसरंगी न्हाउनी
गति हाच मानला धर्म सदा जीवनी
ना पंख थबकले कुठल्याही बंधनी
देव तुझा नित तुवा पाहिला नीलाच्या मंदिरी !

त्या सदय तरूंचा जीव तुझ्यावर जडे
तुजसाठी भरले मधुर रसाचे घडे
सावलीत हिरव्या दहन उन्हाचे अडे
किती लतांच्या सेविलीस तू कुसुमांतिल माधुरी !

वेचल्या उषेच्या केशरकणिका तुवा
लुटलास घनातिल कधि मोत्यांचा रवा
जलतरंग टिपसी सरोवरी केधवा
सुवर्णरेषा कधी स्वरांच्या चितारसी अंबरी !

तव जीवित म्हणजे रसयात्रा ही एक
हो दिनादिनांचा भूतावरि अभिषेक
अदृश्य उद्याचा कुणी वाचणे लेख
सफलतेत जा आज यात्रिका, विसावण्या कोटरी !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळा
अनुक्रम ........................ वि: ..................
क्रमांक ........................ नों दि· ..................

# बंधन

पर्जन्यकालातील एखादा दिवस
उगवतो असा –
अंधारप्रकाशाच्या सीमारेषा
सृष्टीला दिसत नाहीत
आकाशाला गवसत नाहीत.
सोनेरी कुंतलाची, भरजरी अंचलाची
आरक्त गालाची, तेजोमय भालाची
यौवनमत्त उषा
नवविधवेप्रमाणे अंगावर सावली पेहरून
केव्हा तरी येते
क्षितिजाच्या भिंतीवर क्षणभर डोके टेकून
जड पावलांनी निघून जाते
गूढ विषण्ण रहस्यासारखी !

तीच गत दुपारची –
तिच्या विझलेल्या धुनीतील राखोडा
पसरतो साऱ्या अवकाशात
आणि धुराळलेल्या हाताने ती बसते शोधीत
त्या राखेतील आसन्नमरण निखारे !

संध्यासुद्धा –
अस्ताचलाच्या उंबऱ्यावर लाजत नाही
शुक्राचे नक्षत्र वेणीमध्ये माळत नाही
काळयाजांभळया श्रमिष्ट नजरेने
बघत राहते येणाऱ्या रात्रीकडे.

सारा दिवस जातो असा
रखडत थबकत मरगळत,
पिसे गळलेला, पंख तुटलेला
दीन दुबळा पक्षी !

शिसवी पोलादी रंगाचे अवजड मेघ
सुस्तावून
पडलेले असतात अवघ्या आभाळात
घायाळ झालेल्या हत्तीसारखे
निद्रेच्या तीरावरील स्वप्नासारखे
ना जगणारे, ना मरणारे !

असा मरणोन्मुख दिवस
उगवला आहे आज
काळोखाचा द्रव झिरपत आहे
सहस्र धारांनी साऱ्या सृष्टीवर
माझ्या मनावर.
मला जीवनाशी बांधून ठेवीत आहे
फक्त —
गतात हरपलेला तुझा स्पर्श
तुझी आठवण.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम........................ दि: ......................
क्रमांक ........................ नों: दि: ..................

# तुझे गीत

तुझे नितळ नाजूक
गीत आले हे कुठून
परीप्रमाणे कोणत्या
फुलामधून उठून

तुझ्या अक्षरपाकळ्या
दवमालेत भिजल्या
सांध्यघनाच्या कणिका
कानामात्रेत थिजल्या

कुठे पुनवचांदणे
दऱ्याखोऱ्यात खेळले
त्याच्या फेनाचे तुषार
तुझ्या शब्दांत माळले !

कुठे वेलींच्या जाळीत
जळ उन्हात हालते
त्याच्या लीलांचे लालित्य
तुझ्या ओळीत वाहते !

तुझ्या गीताच्या पंखांना
सात रंगांचे सिंचन
आली ओलेती पक्षीण
इंद्रधनुष्याखालून !

तुझ्या गीतांच्या संगती
आला श्रावण समोर
माझ्या वैशाख-चैत्रात
झाले हिरवे काहूर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रमांक ........................ दि: ..............
क्रमांक ........................ नोंद दि: ..........

## नाही

काही बोलायाचे आहे
पण बोलणार नाही
देवळाच्या दारामध्ये
भक्ति तोलणार नाही.

माझ्या अंतरात गंध
कल्पकुसुमांचा दाटे
पण पाकळी तयाची
कधी फुलणार नाही.

नक्षत्रांच्या गावातले
मला गवसले गुज
परी अक्षरांचा संग
त्याला मिळणार नाही.

मेघ जांभळा एकला
राहे नभाच्या कडेला
त्याचे रहस्य कोणाला
कधी कळणार नाही.

दूर बंदरात उभे
एक गलबत रुपेरी
त्याचा कोश किनाऱ्यास
कधी लाभणार नाही.

तुझ्या कृपाकटाक्षाने
झालो वणव्याचा धनी
त्याच्या निखाऱ्यात कधी
तुला जाळणार नाही.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्र. ........................ दि: ....................
क्रमांक ........................ नों: दि: ....................

# शिलारूप मी

भक्तिभावना भावशील तव हृदयी ओथंबुन
मंदिरात तू येशी माझ्या करावया पूजन.

ललित तुझे लावण्य पाहता गमले गगनातुनी
पंख प्रभेचे पसरुन उतरे व्याधाची चांदणी.

प्रसन्नता वदनावर मंगल करात नीरांजन
अमल भावना त्या ज्योतीसह उजळे नेत्रांतुन.

नयनदले ती मिटली क्षणभर — ढगामधे चांदणे
रुमझुमुनी क्षण वक्षावरती स्थिर झाली कंकणे.

दिव्य मूर्तिवर तव लखलखले मंदिरातले दिवे
देव जाहला भक्त तेधवा देवपणा मालवे !

शिलारूप मी उरलो, झाले देउळ बंदीघर
परत केधवा येशिल, जळते — शिळेमधे अंतर!

ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
........ वि: ........
क्रमांक ........ नोंद दि ........



प्रीति ना आपुली
फुलांची कळ्यांची
कोमलपणाची
निथळे तिच्यात असह्य वेदना
अखंड रणाची !

प्रीति ना आपुली
दवाच्या थेंबाची
पर्णांत रंगली
विजेचा लोळ तो गर्जत जळतो
मेघांच्या जंगली !

प्रीति ना आपुली
गीतांची रसाळ
शब्दांची मंजुळ
लाटांचे डोंगर जोडीत फोडीत
तुफान वादळ !

प्रीति ना आपुली
चिऊची काऊची
पंखांची पिसांची
तिच्यात रात्र ती विषण्ण काजळी
अज्ञातवासाची !

प्रीति ना आपुली
संतोष सुखाची
सारंगी विनाची
आहे ती व्यथेची गहन दु:खाची
अथांग मौनाची !

दि:
नों: दि:

# भाव मोहन

तुझ्या पापण्यांच्या आत
        काय साठले दाटले
दोन ओठांच्या दलात
        दव कोणते गोठले !

उपचाराचे बोलणे
        मध्ये तुटून थांबले
क्षण अशब्द रिकामे
        युगाप्रमाणे लांबले.

नेत्र मिळाले नेत्रास
        नीट केलेस कुंतल
जरा कापल्या कराने
        घेसी ओढून अंचल.

गोंधळल्या गालावरी
        स्मित उमले अधुरे
शब्द डोकावती काही
        ओठामधून घाबरे.

उभे संकोचाच्या आड
        त्याची दिसली सावली
लाल रंगत उषेची
        मेघामधे न मावली.

नको सांगूस कधीही
काय सांगायाचे आहे
अशा भाव–मोहनाचा
अंत अक्षरात राहे.

अनुक्रम ............ दि: .. .
क्रमांक ...................... नोंद दि: ...

# स्मरण

तुझ्या माझ्या न उल्का भेट झाली आकाशात
आठवते का ?

कालियाच्या श्वासापरी धुमसत होती रात
आठवते का ?

दोन विश्वे सांधणारी जाळणारी तेजोरेषा
आठवते का ?

उधाणून आल्या काही निराकार अभिलाषा
आठवते का ?

अंतरीच्या मौनाचेहि निनादले प्रतिध्वनी
आठवते का ?

निमिषांच्या पंखावर निथळली संजीवनी
आठवते का ?

चार क्षण प्रवासात चार युगे सामावली
आठवते का ?

अबोधाच्या स्मरणाची दीपमाला उजळली
आठवते का ?

मीलनाच्या किनाऱ्याने वियोगाची चाले नौका
आठवते का ?

संयोगात ऐकू आल्या दुराव्याच्या क्रूर हाका
आठवते का ?

नियतीच्या गतीनेच आलो क्षितिजाच्या तळी
आठवते का ?

घडले ते गेले सारे राहुनिया अंतराळी
आठवते का ?

पृथ्वीवर आता झालो मातीमध्ये माती पण
आठवते का ?

मातीलाहि बिलगली आकाशाची आठवण
आठवते का ?

# मूर्ती

संगमरवरी मूर्तीचे तव
स्नेहल डोळे
त्यात वाचले उगाच काही
गीत निराळे

उगाच गमले अधरावरती
उमले हासू
उगाच वाटे पापणीमधे
लपले आसू

उगाचतेची धग ही माझ्या
मनास दाही
कळले ना की देवळात मी
एकच नाही.

ही शिल्पाची मात्र चातुरी
घडणच असली
आर्त भावना अहंपणाने
माझी फसली.

## मातीचे गायन

माझ्या मातीचे गायन
तुझ्या आकाश-श्रुतींनीं
जरा कानोसा देऊन
कधी ऐकशील का रे ?

माझी धुळीतील चित्रे
तुझ्या प्रकाश नेत्रांनी
जरा पापणी खोलून
कधी पाहशील का रे ?

वर्खं लावून कागदी
माझे नाचते बाहुले
कधी कराया कौतुक
खाली वाकशील का रे ?

माझ्या जहाजाचे पंख
मध्यरात्रीत माखले
तुझ्या किनाऱ्यास दिवा
कधी लावशील का रे ?

माझा रांगडा अंधार
मेघामेघात साचला
तुझ्या उषेच्या ओठांनी
कधी टिपशील का रे ?

# आम्ही दोघे

दा. क्र. १०५४५
ग्रंथ व शाखा (स्थळ

मी आणिक मी आम्ही दोघे
एक घरामधले रहिवासी
दोन गावचे, दोन दिशांचे,
हा रत येथे, हा वनवासी !

हा व्यवहारी रंगुनि जातो
हिशेब करतो रुपये आणे,
नक्षत्रांच्या यात्रेतिल तो
ऐकत राही अबोध गाणे !

मित्रसख्यांचा मेळा जेथे
तेथे त्यांचे विसावते मन,
हा एकाकी, हृदयव्यथेला
नाही त्याच्या कुठले सांत्वन !

नीतिरीतिचा विवेक याला
प्रवाह घाटामधून वाहे,
स्वैर अनागर नागर जगि तो
कसले बंधन तया न साहे !

अलीपरी हा गर्दीमधुनी
विहार करतो रसज्ञ मार्मिक,
शून्य पथी तो चिरंतनाच्या
ओझे घेउनि चाले यात्रिक !

मी आणिक मी आम्ही दोघे
वस्तीसाठी एक परी घर
दोन ध्रुवांचे मीलन येथे
दोन ध्रुवांतिल राखुनि अंतर !

## लाट तेजाची

नव्या जीवनाचा नाद
मला ऐकू येत आहे
लक्ष शून्यातुनि काही
श्रेय आकारत आहे.

क्षितिजाच्या काळोखाला
फुटे सुवर्णाचे पान
आकाशाच्या ओंजळीत
पडे किरणांचे दान.

गेल्या दिवसाने दिली
येत्या दिवसाला हाक
अभावात रुतलेले
हाले चैतन्याचे चाक.

दऱ्याखोऱ्यात रानात
लाट तेजाची वाहते
लोहरसात गर्वाच्या
दीन दारिद्र्य नाहते.

पायतळी पाषाणास
आहे काही म्हणायचे
संपले ते पर्व आता
रडायचे, कण्हायचे.

माती हालते शेतात
पाणी पिऊन मेघांचे
चिखलाच्या नेत्रावर
स्वप्न सोनेरी रेघांचे.

धरतीच्या उदरात
आली कोळशाला जाग
अंग आसुसले त्याचे
व्हाया इंधनाची आग.

गंध प्रकाशाचा स्वर
त्यात झंकारत आहे
लक्ष शून्यातुनि काही
श्रेय आकारत आहे.

हे सारे खरे असेल
अथवा आहेही
पण तरीही—
माझ्या गीताचे ध्रुवपद एकच आहे,
माणसाच्या माथ्यावर
दारिद्र्यासारखा शाप नाही
पृथ्वीच्या पाठीवर
इतके अमंगल, इतके दुःखदायक, इतके भेसूर
दुसरे पाप नाही !
जोपर्यंत माझ्याजवळ गीतासाठी शब्द आहेत,
शब्दासाठी श्वास आहे
तोपर्यंत—
याच ध्रुवपदाचा, याच ध्रुवपदाचा
माझ्या गीताला ध्यास आहे !

हे सारे खरे असेल
अथवा आहेही—
आणि तरीही—
पापणीच्या केसात अडकलेल्या या थेंबाकडे
तिऱ्हाईतपणे पाहू नका
मातीची आसवे मातीला मिळतील
असे म्हणू नका
दगडाच्या डोळ्यावरील हे दव ओलांडून
पुढे जाऊ नका—
कारण—

या रडणाऱ्या मातीच्या गर्भात
धसधसत आहेत
पाची खंड पृथ्वी हलविणारे
शेष-कालियासारखे सहस्रावधि नाग
या दगडांच्या उशीवर माथे ठेवून झोपली आहे
लक्ष दावानलांची आग !
त्या नागांना नाही देश
त्या अग्नीला नाही संस्कृती
नाही देव, नाही धर्म, नाही नीती
त्यांच्याजवळ आहे केवळ
गती !
आंधळी गती !
आपल्या जहरी जिभांनी, जांभळ्या ओठांनी
जीवनातील सारे सौंदर्य पिऊन टाकणारी
राक्षसी गती—
भूमीवर पडलेल्या देवळांच्या अवशेषांवरून
पलंगावर पडलेल्या स्त्रियांच्या स्तनांवरून
उन्मत्तपणे धावणारी
बेहोष गती !
कचकड्यांच्या बाहुल्यांचा
प्लॅस्टिकच्या रंगीत खेळण्यांचा
हा सारा संसार
चरणाखाली चिरडीत जाणारी
निर्दय गती !
ती थांबणार नाही

न्यायाच्या मंदिरापुढे
शांतीच्या स्तंभापुढे
आकाशरसाने भरलेल्या
वाङ्मयाच्या कुंभापुढे !
आणि म्हणून सांगतो
हे सारे खरे असेल
पण तरीही —

# खुलदाबाद

असले गाव
मी कधीच पाहिले नव्हते —
कालसागराच्या किनाऱ्यावर
लहानशी दिवली लावून
जे बसले आहे जागत,
येत्याजात्या पांथस्थाकडे
शेवाळलेल्या नजरेने
आण्या-पैशाचे दान मागत.
असले गाव
मी कधीच पाहिले नव्हते
जीवन जगते आहे येथे
मृत्यूच्या दयेवर,
दृष्टि पडेल तेथे उभे आहे
विशाल विस्कटलेल्या वास्तूचे
उघडे बोडके कलेवर,
इतिहासाचा हिरवा काळा द्रव
येथे पडला आहे थिजून
प्रत्येक शिलेवर !
रस्त्यावर, झाडावर
आणि माणसावरही !
गावाच्या दारावरून
एक नदी वाहते आहे
वटारलेल्या खडकाच्या डोळ्यांनी
सारखी पाहते आहे

मातीने माखलेल्या
वेडसर वेशीकडे
जी उभी आहे केस पिंजारून
ऐतिहासिक आवेशात
जिच्या साकळलेल्या जाणिवेला
पाहता येत नाही
पाठीशी पडलेल्या दगडविटांच्या राशीकडे !

असले विलक्षण गाव
मी कधीच पाहिले नव्हते
उसवलेल्या थडग्यातून बाहेर स्रवणारा काळोख
ओहळतो आहे प्रकाशात
धूळ खाऊन जडावलेले ढग
डोळे मिटून बसले आहेत
आकाशात
वर्तमानकाळाच्या साऱ्या रेषा
अशब्द होऊन शिरत आहेत
भूतकाळाच्या नकाशात.

# तेहि असे –

तुझ्या अधरकपोलावरील उषःकाल
टिपून घ्यावे ओठांनी
तेहि असे –
दुपारच्या राखी आभाळाला फुटावीत
केशरी
किनखापी पिसे
आणि
जावे घटकाभर वितळून
ओल्या सोनेरी सावल्यांत
पृथ्वीवर साचलेले
उन्हाचे शिसे.

अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों: दि: ........

## मौन

शब्द-जीवनाची अपल्ये-
मृत्यूपर्यंत पोहोचत नाहीत
म्हणून तुझ्या समाधीवर
मी वाहात आहे
        माझे मौन.

मृत्यूसारखेच अथांग
अस्पष्ट अनाकार,
सारे आकाश व्यापून
अज्ञानाच्या प्रदेशाकडे
प्रवाहत जाणाऱ्या
स्वरहीन संथ मेघमालेचे
        मौन.

या जमिनीवर
या जमिनीवर असेल तेव्हा
प्रिय माझ्या त्या शककर्त्याचे
पडले पाउल
या भूमीच्या सुगंधसिंचित
धूलिकणांना
या भिंतीवर रुळझुळणाऱ्या
गर्भरेशमी आवरणांना
या मंचातिल रत्नमण्यांच्या
चंचल गर्वोद्धत किरणांना
सह्याद्रीवर अवतरलेल्या
ऊर्जस्वल स्वातंत्र्य उषेची
इथे लागली
पहिली चाहुल.

याच ठिकाणी––
मावळखोऱ्यामधले वादळ
इंद्रसभेवर या आदळले
कृष्णेचे जळ खडकामधले
यमुनेच्या श्रीमंत तटावर
येथे वळले
इथे तमाच्या अधिराज्याला
तेजाचे बळ प्रथमच कळले.

येथ रुजाम्यावरी जरीच्या
असतिल कुजबुजल्या तलवारी
थरथरले शिरताज हिऱ्यांचे
असतिल श्रवुनी ती ललकारी
संगमरवरी चिऱ्यात झाले
असेल स्पंदन
शिवनेरीच्या वनराजाचे
होता दर्शन !

या स्तंभांतुनि असेल घुमली
ती शिववाणी
या दगडांवर असेल थिजले
त्या शब्दांतिल अभिमानाचे
जळते पाणी
मखमाली गाद्यांवर सळसळ
संतापाची असेल उठली
माळ करांतिल या तख्तावर
असेल तुटली
काच बिलोरी ऐश्वर्यांची
पोलादाच्या त्या तुकड्यावर
इथेच फुटली.

# प्रवास सरला –

प्रवास सरला अवकाशातिल
पृथ्वीवरती आलो आपण
धुळीत झाले विलीन आता
अखेर ताऱ्यांचे तारेपण.
यातहि आहे
सांत्वन काही—
भीतिहि आता मावळली ती
निरालंबतेमधे नभाच्या
अगतिकतेने विश्रांतीविन
भ्रमावयाची
भ्रमता भ्रमता पोकळीत त्या
सर्वस्वाची करून ज्वाला
जळावयाची.

ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ........... दि: ..............
क्रमांक ........................ नों: दि: ..............

# निराकार

या दु:खाला नाही आकार
नाही रंग, नाही नाव--
ते आहे माझे
पण मी ओळखत नाही त्याला
आणि नसशील ओळखत तूही
मला माहीत आहे इतकेच--
तुझा रुपेरी रथ दूर जात असता
या क्षितिजावर जो तरंगत होता
निळापांढरा मेघ
त्या मेघातच जन्म झाला
या निराकार दु:खाचा
आणि त्या मेघाप्रमाणेच--
ते फिरते आहे आकाशाच्या पोकळीत
शोधीत स्वत:साठी
एखादे नाव, एखादी रेषा--
एखादी आकृती.

## जोगीण

मला हवी आहे नास्तिकता
पण सहस्र वर्षं
मनाला मिठी घालून बसलेली
ही अस्तिकता होत नाही दूर
माझ्यापासून.
रंगमंचावरील दिव्यांच्या प्रकाशात
व्याधाच्या नक्षत्रासारखी
विविध रंगांत उमलणारी
सुरेल पदन्यास करीत
माझ्या अंतःकरणात प्रवेश करणारी
ती मोहक नृत्यांगना
उभी आहे माझ्या मंदिराच्या दाराशी.
पण मलिन वस्त्रे परिधान करून
गहन काळोखात गुरफटलेली
एकतारीवर एकच एक गीत गाणारी
ही उदासी मितभाषी जोगीण
मान टेकून दरवाजाच्या स्तंभावरती
बसली आहे वाट आडवून
प्रवेशाच्या पायरीवर.

## मला हवा तो—

मला हवा तो हाहि नव्हे
तोहि नव्हे

भूप पथातुनि मिरवित जातो
तपोवनी जो यती राहतो
साधुसंत वा रावरंक वा--
तोहि नव्हे.

धुक्यात गहिऱ्या हलती रेषा
सांध्यघनावर ज्याची भाषा
मध्यरात्रिच्या दिव्यास दिसतो—
तोहि नव्हे.

जो चित्रातुनि हो आकारित
शब्द जयाला देती जीवित
अंकित आश्रित जो प्रतिभेचा
तोहि नव्हे.

कसा असे तो कळले नाही
ध्यान तयाचे करिता ग्वाही
एक मना की तयासारखा—
तोहि नव्हे.

म्हणुनि साजणी मी अविवाहित
दिव्य सुखा त्या सदैव वंचित
कुवारपण मम गात बैसले—
हाहि नव्हे, तोहि नव्हे.

# पुनव

आज कार्तिकी पुनवेवरती
श्वेतकमल तव समीपतेचे
फुलले आहे
कलहंसापरि हास्य रेशमी
संगमरवरी या स्तंभावर
बसले आहे.
अवकाशातिल निळ्या रुपेरी
कळीकळीवर
आर्त तुझ्या दृष्टीतिल पडले
आहे दहिवर.
मंदोत्कट वाऱ्याने लहरत
अशब्द होउनि अवघडलेली
झाडे हलती
त्या पर्णांतुनि तव शब्दांपरि
पराग काही चंद्रफुलांचे
खाली गळती.
तुझेपणाचे रूप दावण्या
दूरपणातुन
आज जाहले विलग चांदणे
चंद्रापासुन.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम.......................... दि: ..........
क्रमांक .......................... नों: दि: ..........

तुफानाच्या मंदिरात
आपण दोघांनी बांधली आहे पूजा
तुफानाच्या उपासकांना
या संसारात आहे सजा
जन्मभर अशांतीची.

तुफानाचा वरदहस्त
माथ्यावरती पडल्यावर
वाट गवसत नाही कधीही
विश्रांतीची.

तृणाच्या हिरव्या लकेरींनी
फुलून येत नाही कधी
आपल्या जीवनाचा किनारा,
जीर्ण वडांतील भुताटकीचा
प्रवाहात पाय टाकून
तीरावर बसला आहे पहारा
—कायमचा.

उलगडत नाही आपल्या अंधारावर
स्निग्ध सोनेरी रेशीम
समईतील किरणांचे,
विक्राळ मेघांच्या द्वंद्वातून
उन्मत्त विजांच्या धारा
उधळतात आपल्या रस्त्यावर
भैरव तराणे
मरणांचे.

वाहात नाही आपल्यासाठी नदी
पहाटच्या पलंगावरील
रतितुष्ट पुरंध्रीसारखी
प्रसन्न नम्र लाघवी.
गर्जत आहेत लक्ष लाटा सागरातील
गरुडाने घायाळ केलेल्या नागिणींसारख्या
उफाळलेल्या
माहुताला मारून
पळत सुटलेल्या हत्तिणींसारख्या
पिसाळलेल्या.
उघडत नाहीत आपल्यासाठी
सुगंधाने निथळलेल्या
—प्रकाशाने उजळलेल्या
आरस्पानी महालांची कवाडे,
पायातील साखळदंड ओढीत
आपण धावतो आहोत दोघे
अखंड
मृत्यूच्या क्षितिजाकडे.

असाच केव्हा थिजून पडतो
संथ घनावर वारा
हारवते नभ हरवे त्यातिल
प्रकाशदायी तारा.
जहाज राही अचल जलावर
प्रवास कुंठित होई
मरणाहुनही कळा भयानक
अशी जिण्याला येई.
गळती रेषा चराचरांच्या
जळते तृण नावाचे
कठोर होई बर्फ मनातिल
कोमल भावद्रवाचे.
भयाण त्या पोकळीत जीवन
सुन्नपणाने भ्रमते
असे नसेच्या सीमेवरती
अगतिकतेने बसते.
अशा अभावी वहात येते
तव हाकेची पणती
प्रकाशात त्या आहे त्याचे
सूत्र पुन्हा ये हाती.

डोहावरील सावल्या थरथरतात
तीरावरील वृक्षांच्या जाळीतून
उषःकालचे सोनेरी किरण
निथळू लागले म्हणजे.

गुहेत धुमसलेला काळोख
भयभीत होतो
एकाकी भयाण पायवाटेवरून
दिव्याचा संथ निश्चल प्रकाश
पुढे येऊ लागला म्हणजे.

जमिनीच्या गर्भामध्ये
दगड होऊन पडलेले माझे मन
भयाने व्याकुळ होत आहे
तुझा जीवनदायी प्रेमस्पर्श
जवळ येत आहे म्हणून.

अज्ञाताच्या गूढ धुक्यात
अस्पष्टपणे तरळणाऱ्या तुझ्या अस्तित्वापर्यंत
कोणाची पावले कधी पोहोचली नाहीत,
माझीहि पोहोचणार नाहीत.
आणि तरीही—
त्या असाध्याकडे जाणाऱ्या मार्गावर
मी जातो आहे पुढे, सारखा पुढे—
गतीने बधिर झालेल्या माझ्या मनाला
आता स्मरण उरले नाही त्या स्थळाचे
ज्याच्याकडे मी जात आहे.
आणि राहिली नाही आवश्यकता
तेथपर्यंत पोहोचण्याचीही.
कारण या गतीतच आहे त्या श्रेयाचे संपादन
या प्रवासातच आहे
प्रवासाची अंतिम सांगता.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्र
अनुक्रम ..................... वि: .....................
क्रमांक ..................... नों दि: .....................

## माध्यान्ह

एका खेड्यातील--

पाहात आहेत सारीजण
भांबावून--
धुळावलेले वृक्ष
इतस्तत: ओघळलेल्या सावल्या
अंगावरती ओढून—
जुनाट इमारतींची उजाड धावी
थरथरणारे म्हातारे हात
छातीवरती रोवून--
दूरस्थ डोंगराच्या पाठीशी लपलेले
वाऱ्याचे सहस्र स्रोत
सशांसारखे डोकावून—
आभाळात जागोजाग लोंबणारे
राखाळ मेघांचे तुकडे
आपले उदास निर्जीव डोळे
विस्फारून--
पाहात आहेत सारीजण भांबावून
काळ्या पिवळ्या अफाट माळावर
हातपाय पसरून पडलेला
अकाळविकाळ
उघडा नागडा उन्हाळा.

# औ रं गा बा द
(एक आठवण)

जीर्ण तटाच्या समीप आहे
खंदक आणि—
तयात आहे खोल तळाशी
हिरवे पाणी
मी डोकावुनि खाली बघता
अरुंद काळ्या घळईमधुनी
थरथरले ते म्हातारे जळ
क्षीण स्वराने
बुरुजाच्या भिंतीला धरुनी
एक कराने
शेवाळ्यामधि हारवलेले
उचलुनि जड काचेरी डोळे
कापत कापत
रुग्णपणाने कण्हत म्हणाले
स्वागत पांथा
स्वागत.

सर्वांची तृषा शमन करणारी ही नदी
स्वत: तृषित आहे अनादि काळापासून
आणि राहणार आहे तशीच
अनंत काळापर्यंत.

ती पिऊन टाकते
तीरावरचे अजस्र कठोर वटवृक्ष
आणि त्यांच्या पायापाशी थरथरणारे
मित्रे नवथर गवतही.

ती प्राशन करते
घाटावरची विशाल दगडी देवालये
आणि त्यांच्या पायऱ्यांवर तेवणाऱ्या
घिटुकल्या सोनेरी ज्योतीही.

अधीर ओठांनी ती सेवन करते
आकाशात भ्रमण करणारी तेजस्वी नक्षत्रे
आणि त्या तेजोगोलांना आश्रय देणारे
गूढ सनातन आकाशही.

ती पिऊन टाकते आधाशीपणाने
संधिकालातील रंगित मेघांच्या मिरवणुकी
आणि उत्तर रात्रीच्या उदरातून गळणारा
भयाण निराकार काळोखही.

एवढेच नव्हे—
तिने पिऊन टाकला आहे
संसारातून अदृश्य झालेला सारा भूतकाल
( आणि मला वाटते )
आमच्या दृष्टीला आज अदृश्य असलेला
सारा भविष्यकालही.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम .................. दि: ..................
.................. नों. दि. ..................

# पा प

गुहेत गेलो मी पापाच्या
आणि भेटलो पापाला
दात शोधला मी जहराचा
दातच नव्हते सापाला.

तिथे सावल्या होत्या केवळ
अनंग होउनि पडलेल्या
चघळित होत्या जीवनकणिका
फटीफटीतुनि दडलेल्या.

काळोखाच्या वारुळात त्या
व्यथाहि दाराशीच अडे
लोंबत होते सळ बर्फांचे
मने गोठुनी चहूंकडे.

निराकारता होती अवघी
नव्हत्या रेषा रंग नुरे
भयाण निर्गुण भुताटकीचे
संज्ञेवाचुनि आत फिरे.

भिंतीवरती मान टाकुनी
पडली होती रुग्ण हवा
तिने पाहिला नव्हता केव्हा
गगनामधला स्नेहदिवा.

उन्मादाचे कुठे न गाणे
होते कण्हणे थकल्याचे
निर्दयतेची नव्हती दलदल
वा आमंत्रण चकव्याचे.

तुटले पाणी नदीतले ते
ओघ वाहता दूर असे
अगतिकता ती होउनि हिरवी
वाट गतीची पाहतसे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थल
अनुक्रम ........................ दि: ..........
क्रमांक ........................ नोंद दि ..........

# ग ती

रात्रीच्या या रस्त्यासाठी
पावलांस येई गती
अस्ताव्यस्त सावल्यांत
सर्व रूपे दिवसाची
मावळती.

अनोळखी वाटेवर
क्षीण दिवे पेंगतात
स्तंभ स्तंभ आक्रमीत
पाय माझे चालतात
चालतात.

क्षीण सरे चालण्याचा
चालीस ये आपापता
रस्ता शिरे पावलांत
तोच धनी चालविता
झाला आता.

रात जागे भोवताली
वाजे अदृश्यात चाळ
अंधाराच्या कपारीला
पेटलेला आहे जाळ
कोठे तरी.

(वाट चाले तंद्रीमध्ये
पुण्याकडे पापाकडे
मीच झालो वाट आता
एक फक्त जाणवते
जाणे पुढे !

## उषा - स्तवन

लक्ष वेळ वधलीस रात्र तू
  या देवी उदयाद्रिवरी
लक्ष वेळ तव रथचक्रांची
  धूळ उधळली दिगंतरी

लक्ष वेळ या कनकशिळेवर
  क्षालन हो तव चरणांचे
मेघमंडलातून पेटले
  दीप हिरण्मय किरणांचे.

दिग्गज दश हे उचलुनि शुंडा
  अर्चन कोटि तुझे करिती
स्पर्श तुझा शिवमंगल व्हाया
  पायतळीं पडली धरती.

अजर अमर हे गगनकन्यके
  अग्नीचे तनुधारण तू
तू शक्तीचे परम शिवालय
  रूपरसाचे कारण तू.

तूच उर्वशी पुरुपाशांतुनि
  स्वर्गी जावया सजलेली
विगलितवसना मुक्तकुंतला
  मेघदवाने भिजलेली.

तूच उमा रणरंजित रुद्रा
भैरव तांडव करणारी
अग्निशूल परजीत लक्ष करि
दैत्यांचे दळ चिरणारी.

सांबजटेतुनि वत्सल गंगा
तू अवतरसी भूवरती
तू सृजनात्मक जाण विधीची
तू विष्णूची प्रेमरती.

तू पहिला उन्मेष द्युतीचा
अनंततेच्या मनी स्फुरे
जीवनधात्री प्रथम कणव तू
जी ईशाच्या हृदयि भरे.

काळाचे बलिवर्द कोटि ते
अंध पिसाट, तमी पळती
सुवर्णवलये फेकुनि, त्यांची
नियमित केलिस तूच गती.

भयाण पहिल्या गहन अभावी
गर्भ जिण्याचे गुदमरले
गगनतटावर उभे राहुनी
माझे माझे तू म्हटले.

प्रसादवच ते दिशात घुमता
परार्ध शून्ये तटतटली
रसरेषांची अगणित नगरे
त्या कवचामधुनी उठली.

विश्वामधले सात रंग हे
जागृत झाले तुझ्यामुळे
तुझ्यामुळे हो जमीन वसुधा
तीर्थरूप हीं होत जळे.

उरि धरिसी तू पर्वत कलिका
मातीचा कण सागरही
तुझ्या दयेच्या अरुणमंदिरी
विषम ऋणाचा सल नाही.

हे महदार्ये हे करुणेश्वरि
हे प्रिय जननी इंद्रप्रिये
अमित मनांच्या मखमालीवर
चरण सदाशिव टाकित ये.

दीप्तीचे ध्वज केशर कांचन
विश्वतटावर रोवित ये
कोटि कोटि या मुकुलदलांवर
जीवन अमृत शिंपित ये.

ज्वालामय रथचक्राखाली
दुर्ग तमाचे फोडित ये
लक्ष युगांचे सुवर्णबंधन
कमलकराने जोडित ये.

आले गेले—
कुणीहि नाही–कुणीहि नाही—
नव्हता पाउस नव्हती आंधी
नव्हते वारे
मीच एकदा उठलो आणिक
(बरीच वर्षें होउनि गेली)
स्वताच केला बंद येथली
सगळी दारे.
होता तितुका प्रकाश येथे
अडकुनि पडला
( इतुक्या दिवसानंतर आता )
पीस पीस त्याचाहि पिसारा
सारा झडला
उजेडातल्या पाय जिण्याचा
उंबरठ्यावर सदैव अडला
काळोखाची द्रवुनि राजणे
त्या मद्याचा कैफ मनावर
कायम चढला.

## तो पक्षी

त्या पक्ष्याने
केले होते मजला वेडे
निळ्या परांच्या सहवासी त्या
झाली होती सुज्ञपणाची
व्यवहाराची लौकिकतेची
बंद कवाडे.

त्या पक्ष्याने
घरात केले होते घरटे
आणित होता
कधी नभाचे तुकडे धूसर,
रुतलेले मेणात ढगांच्या
नक्षत्रांच्या गीतांचे स्वर
अपार्थिवाच्या पसाऱ्यात त्या
विसरुनि गेलो पायाखालिल
जमिनीचे थर.

त्या पक्ष्याने
केले होते मला कलंदर;
अनिकेताची घेउनि दीक्षा भ्रष्ट पथावर
तिमिराच्या घुमटात रिकाम्या
होतो बोलत
पवित्र नव्हते कुठले आसन
कुठले मंदिर
सौंदर्याचे सिद्ध मायने
नव्हते सुंदर.

क्रम ... ग्रंथालय, ठाणे.
नि:
नोंद दि.

त्या पक्ष्याने
केले होते मजला उन्मन;
समीप त्याच्या
जळली शांती जळले शीतल
जळले सांत्वन
संसारातिल भुताटकीच्या गुहा तयाने
मजला दावुन
शत वैरांचे दिले मनाला
माझ्या इंधन.

त्या पक्ष्याच्या
उरात शिरला शर कोणाचा
कळले नाही
असेल माझा—
ही शंका मज जाळित राही,
कुणास ठाउक, एके दिवशी—
निखारलेल्या सुन्न दुपारी—
त्या पक्ष्याच्या पंखपिसांची अभद्र पखरण
धुळीमधे पडलेली मजला
दिसली दारी.

त्या पक्ष्याविन
झालो आता सुज्ञ जरासा
मठ्ठ उशांच्या कोचावरती
रेलुनि घेतो व्यवहाराचा
सदा दिलासा
परंतु केव्हा अदम्चित येता
जाग मनाला

त्या पक्ष्याचा आठव करतो जिवास व्याकुळ
क्षणभर वाटे...
त्या पक्ष्याविण जगण्याचे हे
कवचच केवळ.

क्रमांक ........................ नों: दि ........

# नाटक

नाटक सारे असेल, किंवा—
आहे नाटक याविषयी मज
शंका नाही

काळोखाच्या पायपथाने
आलेल्या मज मुशाफिरावर
जीव वहावा इतुका यास न
कारण काही

आहे नाट्यच, परंतु असल्या
चतुरपणाच्या महिरापीने
असेल मंडित, तर तिकिटाचा
माझ्याजवळी—
हिशेब नाही !

तलम मुलायम पोत प्रीतिचे असते इतुके
कधीहि मजला कळले नव्हते
जाड्याभरड्या किंतानांच्या हटात केवळ
सदैव अमुचे सौदे होते.
काव्यकथांतुनि सुरस मनोहर स्तवन वाचले
चेष्टा गमली ती प्रतिभेची
सपंख घोडे, सुवर्ण वाडे, उडते मंचक
यातच गणना होती त्याची.
इंद्रधनुष्ये नित्य पाहतो, पुलकित होतो,
क्षितिजावरती चढुनी का पण—
उपसुनि त्यांतिल रंगित रेशिम मागावरती
वसन तयाचे विणतो आपण ?
असेच काही दुरुनि पाहणे, वा वा म्हणणे,
पिटात जागा अपुली राखुन
अलौकिकाच्या दिव्यात दुसरे, अपुले व्हावे
प्रेक्षागारी व्यतीत जीवन.
तेच सुरक्षित तेच समंजस ते सालसपण
बिकट वाट वहिवाट नसावी
अतर्क्य नियती ! अशी मुलाखत आकाशाशी
पंखावाचुन भाळि असावी !

........................ दि: ........
........................ नोट दि ....

ईश्वर नाही म्हणता ? माझे—
मतही अगदी तसेच आहे
ऐकलेत ना परवा भाषण
सांगितले मी—
या विश्वाच्या विविध दर्शनी
जड तत्त्वाचा अंध कायदा
भरून राहे.

हेही म्हटले, जिथे न जाते
प्रज्ञा तेथे कशास घ्यावा
शोध वगैरे
म्हणून म्हणतो ईश्वर नाही
या मुद्द्यावर तुमचे अमुचे
जमते सारे.

हो हो आपण म्हणता तेही
नाही खोटे
रोज प्रार्थना मीही करतो
हात जोडल्याविना जिवाला
बरे न वाटे
देव नसे पण शक्ति असे ती
जिचे नियंत्रण जगतावरती
तिचे कराया स्तवन जरासे
अडचण कोठे ?
नाही—अगदी तसेहि नाही—
मानवमन ना निराकारता
कधी साहते

आणि अखेरी आहे-नाही
तिथेच असते.
अचेतनाला करी सचेतन
शून्याला दे अर्थाचे धन
मन अपुल्या नजरेने जीवन
सदा पाहते—
म्हणून माझ्या डोळ्यापुढती
किरीटधारी रूप प्रभूचे
(मंदिरांतले तजबिरीतले)
उभे राहते.
असो तसे पण—(मार्जिन सोडा)
ईश्वर नाही या प्रश्नावर—
अपुले जमते.

ग्रंथांक .............. दि: ..............
क्रमांक .............. नों. दि ..............

# सैनिक

सैनिक म्हणजे नाटकातला
समरधुरंधर आम्हा दिसतो
लीलेने भवपाश तोडुनी
जो गनिमांच्या फळीत घुसतो,
पीळ मिशीला भरून म्हणतो-या या सारे
माय कुणाची व्यालि-वगैरे,
उडवुनि चटणी शत शत्रूंची
(पिटाकडे पाहून जरासा)
गाली हसतो !

आणि रेलवेमधे जेधवा
विटकी खाकी पेहरणारे
तुटक्या द्रोणातील वड्यांचे दही पिणारे
दोहे अथवा अभंग ओवी गुणगुणणारे
असे शिपाई सहज भेटती
देत जांभया त्रस्त स्वराने
आम्हा म्हणती--
भली नोकरी कारकुनाची
पगार घ्यावा मेजावरती
दिवस रजेचे किती तयाला
नाही गणती
हा फौजेचा कठीण पेशा
शिस्तीचे वरवंटे माथा सदैव फिरती
मुलांमाणसांमधून लागे दूर जावया
आणिक हे म्हणताना डोळे
किंचित् भिजती.

वीररूप हे असले पाहुन
पांढरपेशा श्रद्धा अमुच्या
(थिएटरातिल बनावटीच्या)
विचलित होती
व्यथित होउनी परस्परांना आम्ही पुसतो
काय शिपाई असेच असती !

होय, शिपाई असेच असती,
परंतु आम्हां उमजत नाही
ते हे–
नाटकातल्या त्या शूराला
नसते तेथे मरावयाचे
असते केवळ टाळीसाठी
वीरत्वाने स्फुरावयाचे
पायदिवे विझल्यावर आणिक
घरी जाउनी दुलईमध्यें
शिरावयाचे !

रेलवेतला सैनिक पण हा–
करांत त्याच्या दहीवड्याचा द्रोण असू द्या
स्वरांत त्याच्या तक्रारीचा भाव दिसू द्या
मुले माणसे–म्हणता त्याचे नेत्र भिजू द्या
जेव्हा अपुली (टिनोपॉलची)
मुलकी दुनिया सोडुनि जातो
रणगाडे-तोफा-तंबूंच्या जगात अपुली
जागा घेतो
गळून पडती सर्व जांभया
तक्रारीचा स्वरही विरतो

दूरस्थांतिल आप्तजनांचा
आठव तेथे विघ्न न करतो,
मळकट कवचे (रेलवेतलीं) फुटून पडती
आणि सनातन पुरुषार्थाचा
सोलिव गाभा युद्धतळावर उभा राहतो.

तोच रेलवेतला शिपाई
अग्नीचे घन लोळ भोवती बरसत असता
अविचल दृष्टी समोर बांधुन
गोळे भरतो,
खंदकातल्या भाईसाठी
घास आपुला दूर सारतो,
शरीर पिंजुनि गेले तरिही
हात उभारुनि अशरण वरती
या भूमीवर कोसळणारे
गगनाचे छत
रोखुनि धरतो !

खाकीमधले असेच हे मन—
तारतम्य वा सूज्ञपणाचा
विचार तेथे विरून जातो.

खाकीमधला देह असा हा
पृथ्वीमध्ये पिरगळलेले सर्व तणावे
क्रूरपणाने
तोडुनि सारे अपुल्या आपण
उन्मादाच्या अशा क्षणाला
मरून जातो !

संसाराच्या सीमेवरती
बर्फाच्या मरणाळ तटावर
तिथे पहा ती गर्द लाल रक्ताची धारा
वहात आहे
स्फटिकावरती उन्हात धूसर
अविवेकाचा गर्भ तांबडा
उत्सवतेने—
नहात आहे !

खाकीमधले असेच हे मन
हिशेब त्याने नव्हता केला
लाभ दरमहा होत रुप्याचा
किती खिशाला

नकाशातल्या रेषांसाठी
अस्तित्वाचे हवन करावे
व्यर्थ कशाला

व्यर्थ कशाला काठीवरती
फडफडणाऱ्या फडक्यासाठी
जाळुनि घ्यावे
का न करावे गहन विवेचन
आकाशातिल आदर्शांचे
विणीत कोळिष्टक शब्दांचे
दूरपणाच्या वळचणीस वा
का न बसावे !

खाकीमधली अशी माणसे
माणुसकीचा गहिवर त्यांना
येतच नाही
हजार मैलांवर ते घरटे पहा तयाचे
करुणेचा कवडसा तमी त्या
जातच नाही

बघा बापडी कुणी एक ती
चुलीतल्या जाळात खुपसुनी अभाव डोळे
श्रमिष्टतेने एकसारखी
पहात राही—
ओटीवरती म्हातारा तो
हात फिरवितो हवेत भवती
काठी त्याला
गवसत नाही—

दोन पाखरे अशब्द बसली
परसामधल्या निंबाखाली
पंख कुणाचा उडण्यासाठी
उकलत नाही—

या सर्वांचा विचार त्याने
वर्फावरती कोसळताना
केला काही ?
नाही...नाही...मुळीच नाही !

...लय, ठाणे. स्थ...
अनुक्रम........................ वि: ...............
[क्रमांक] ........................ नों दि...........

आकाशामधि मळभ कुणाचे
नाहि घनाचे
माझ्या स्तब्ध मनाचे

क्षितिजावर तेजोगिरि फुटले
ते बळ कुठले
माझ्या प्रबल मनाचे.

कधि पुनवेचा होउनिया पट
दिगंतरावर
मन माझे उलगडते,
जळके तुटके झाड हवेवर
बसते स्फुंदत
ते माझे मन रडते.

स्तनजघनांचे पऱ्या जळावर
दाविति चेटुक
ती मम लंपट आशा
फांद्यांवरुनी भुते वडावर
लोंबत खाली
त्या जखमी अभिलाषा.

मीच मनातुनि माझ्या उठतो
जगात फिरतो
जग माझ्यासम करतो
पुनश्च म्हणतो असे तसे हे
त्या भ्रांतीतच
जगतो आणिक मरतो.

# स्मरण

आज प्रकाशातूनि चालता मुक्तपणे यात्रिका
स्मरशिल का त्या तिमिरामधल्या शतावधी तारका ?

थांब जरा ही अजुनि धुमसते राख इथे या स्थळी
जिथे न पणती जळे, पडे वा सुमनाची पाकळी.

इतिहासाची मिरवणूक ती गर्जत गेली पुढे
मानकऱ्यांस्तव पालखीतल्या दुमदुमले चौघडे.

या राखेला नकोत मुजरे नकोत माळा तुरे
आठवणीची एक जाग तव हृदयामधली पुरे.

दिगंतरातिल हाक ऐकली मनात भरले पिसे
क्षितिजावर तेजाचा पर्वत त्या भ्रांतीला दिसे.

तसेच उठले घरातुनी आषाढघनासारखे
जीवन ओतुनि क्षणात झाले इहलोका पारखे.

कुणी जळाले अर्धेमुर्धे पंख कुणाचा तुटे
जिण्यावरी कोणाच्या चढली काळोखाची पुटे.

त्या जीवांची जिवंत वा मृत राख इथे साचली
विस्मरणाच्या धुक्यात त्यांची आज कथा लोपली.

खुशाल लोपो कालरथाची अखंड आहे गती
पांथा, क्षणभर थांबुन केवळ आठव ती आहुती.

## मा र्ग

चालतो मी सारखा हा
चालण्याला अंत नाही
चाललो कोठे कशाला
हीहि आता खंत नाही.

एकदा पूर्वी मलाही
वेड होते शोघण्याचे
वेदनेवाचून काही
लाभ झाला त्यांत नाही.

जाणत्या थोरांकडेही
खूप केली चौकशी मी
शब्दजालांतून कळले
अज्ञतेला पार नाही.

योजनेचा या नकाशा
ज्या ठिकाणी ठेवलेला
खंदकाने वेढलेल्या
त्या स्थळाला दार नाही.

ना कळावे हीच इच्छा
जो कुणी आहे तयाची
शोधता त्याच्या कृपेचा
शोधका आधार नाही

मी म्हणोनी सोडला तो
नाद आता मंझिलाचा
चालण्याचे श्रेय आहे
अन्य धर्माचार नाही.

[illegible]
[illegible] ........ दि: ........
[illegible] ........ नोंद दि ........



त्या चंद्राचे या चंद्राचे
मुळीच नाही काही नाते.
त्या चंद्रावर—
अंतरिक्षयानात बसोनी
माकड मानव कुत्रा यांना
जाता येते;
या चंद्राला वाटच नाही
एक नेमके ठिकाण नाही
हाहि नभाचा मानकरी पण-
लक्ष मनाच्या इंद्रगुहांतुनि
भटकत राही.

नटखट मोठा
ढोंगीसोंगी
लिंबोणीच्या झाडामागे
केव्हा लपतो मुलाप्रमाणे
पीन स्तनांच्या दरीत केव्हा
चुरून जातो फुलाप्रमाणे
भग्न मंदिरावरी केधवा
बृहस्पतीसम करतो चिंतन
कधी बावळा तळ्यात बुडतो
थरथर कापत बघतो आतुन,
तटघुमटावर
केव्हा चढतो

कधी विदूषक पाणवठ्यावर
घसरुनि पडतो,
कुठे घराच्या कौलारातुनि
उतरुनि खाली शेजेवरती
तिथे कुणाची कमलपापणी
हळूच उघडुन
नयनी शिरतो,
कधी कुणाच्या मुक्त मनस्वी प्रतिभेसाठी
द्वारपाल होऊन जगाच्या
रहस्यतेचे दार उघडतो.

अशा बिलंदर अनंतफंदी
या चंद्राचे
त्या चंद्राशी कुठले नाते ?
त्या चंद्रावर
विज्ञानाची शिडी लावुनी
शास्त्रज्ञांना चढता येते
रसिक मनांना या चंद्राला
पळभर केव्हा
जळात वा डोळ्यातच केवळ
धरता येते.

तुम्हीच सांगा, सोंगावाचुन शक्य कसे हे आहे जीवन
जगणे म्हणजे चतुरपणाने सोंगांचे करणे संपादन !

संस्कृति सारी उभी आपुली सोंगावरती
बहुविध सोंगांनी भरलेली आहे धरती
सोंगपणातच संसाराची सगळी महती
सोंगतत्त्व निपटून काढता उजाड होइल हे रंगायन.

मीहि सजवितो बरीच सोंगे, खोटे नाही
तुम्हीहि सोंगी कुशल यात ना शंका काही
सनातनापासून प्रथा ही चालत राही
या सोंगांनी केले आहे मरुभूमीचे थोडे नंदन.

बघा मुखवटे अनेक माझे या भिंतीवर
प्रेमळ काही कुरूप काही, काही सुंदर
इथे वीर हा तेथे साधू, तिथे कलंदर
एक मुखवटा मुखावरी हा करण्यासाठी तुमचे रंजन

तुम्हीच सांगा, सोंगावाचुन शक्य कसे हे आहे जीवन

# एका टक्केवाल्याचे मत

शंभर टक्के सुख दोघांना विवाह असले अगदी थोडे
फारच थोडे

भूवर फिरती, जळात तरती, नभात उडती
कथेत केवळ असले घोडे;

सात सागरापैल सुरस हे
सामान्यांच्या प्रदेशात ना आढळणारे
आदर्शांचे अरबी वाडे.

चाळिस टक्के सुख देणारे बरेच दिसती
विविध कारणे त्याची असती :
कधि बुद्धीचे विषम विभाजन
एक मठ्ठ अन् कसबी दुसरी
कधि प्रीतीची परमोत्कटता
कोणी पाउल कुणी पायरी
कधी समंजसपण दोघांचे
भांडू-तंडू एक पथारी
अशा वगैरेमधून होते
तिथे गुणांची बरीच भरती.

बाकी सारी अपार दलदल
एक दोन दशकांची केवळ
कुठे दहाच्या कुंडीमधल्या दर्शनवेली
कुठे विसाची त्रोटक हिरवळ
–परस्परांचे तोडित लचके
सणासुदीला होती प्रेमळ !

दोनचारचे जे अधिकारी
त्यांच्यासाठी जीवन म्हणजे अखंड होई
तहाबाचुनी संगर तुंबळ.
आणि पुढे अंटार्टिक भूमी शुन्यगुणाच्या रेषेखाली
क्रूर भयानक तेथे नुसते—
बर्फांचे तळ !

ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ७०६२८
क्रमांक ... दि:
नोंद दि:

## वगैरे

कधी तुझ्यास्तव
मनात भरते
मेघ पिणारे
चांदल नाते
दवात जे घर
बांधुनि राही
पण ते नाही
प्रेम वगैरे

तव शरिरातुन
कधी पेटती
लाल किरमिजी
हजार ज्योती
त्यांत मिळाया
पतंग होतो
परी नसे तो
काम वगैरे

कधी शिवालय
पांघरुनी तू
समोर येता
विरती हेतू
मनात उरते
मात्र समर्पण
मी नसतो पण
भक्त वगैरे

रंगित असले
धुके धराया
सार्थ शब्द हे
अपरे वाया
त्या पलिकडचा
एक जरासा
दिसे बरासा
फक्त वगैरे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. हस्तलिखित
अनुक्रम........................ दि: ..................
क्रमांक ........................ नोंद दि: ..................

# बेसूर

तव सदनाच्या कमानीत या
पडता पाउल मनात माझ्या
तीव्रपणाने सतत टाचणी
असली सलते—

जिथे हवेवर वत्सल भैरव
चंदनतेने उकलत आहे
वागेश्रीचे त्यात खुपसतो
स्वर मी भलते.

# म्ह णू न

विजयासाठी कविता माझी कधीच नव्हती
म्हणून नव्हती भीती तिजला पराजयाची
जन्मासाठी हटून केव्हा नव्हती वसली
म्हणून नाही खंतहि तिजला मरावयाची.

या रस्त्याला फांदीवरती
लागुनिया धस चिरून पडले
नाव तुझे

या वाटेवर कुण्या नदीने
नेले वस्त्रापरी ओढुनी
गाव तुझे

या मुलुखातिल पंचभुतांनी
ओरबाडोनी सर्व तोडले
मखर तुझे

म्हणून येथिल जगात स्त्रीपण
अंबरगत ज्वालेपरि उरलें
प्रखर तुझे

# म्हणेन

समज–रंग जळत्या सोन्याचा
होउनि मी मद्यामधि भरलो
समज जरी मी काजळ होउन
नायकिणींच्या नयनी शिरलो

समज जरी मी भ्रमरपणाने
रसगंधाचे प्यालो दहिवर
अशातशांच्या सराईत वा
समज टेकलो या रस्त्यावर—

असेल साहस या सर्वांतुन
दुर्बळतेला करावयाचे
मरणाच्या छायेमधि अथवा
थोडे जादा जगावयाचे.

मराठी ग्रंथ संग्रहालय,

असेल हेही असेल तेही
वा मातीची फक्त उधाणे
असेल अथवा पोकळतेवर
विणावयाचे रंगित गाणे.

असेल काही–पण पलिकडचा
मी जर तुजला दिसलो नाही
म्हणेन परिचय झाला अपुला
परंतु ओळख झाली नाही.

## कोण

बसलो असता निवांत रात्री
टकटक झाली दारावरती
दार उघडता आत सरकली
कोणी व्यक्ती
बारिकतेने बघता कळले
हुबेहूब ती प्रतिमा माझी
दुसरी होती.

घाबरलो मी चाचरलो मी
पुसले त्याला कोण–कशाला—
स्मित संभावित करुनि म्हणे तो
पिशाच्च मी तव !
गतकालाच्या थडग्यामधला
निवास कोंदट असह्य झाला
म्हणून आलो
मालक जेथे तिथेच थारा
मिळे अम्हांला

पिशाच्च पण ते होते माझे
आपुलकीने स्वागत केले
गप्पा झाल्या
दूरपणाचे अंतर तुटले
आठवणींचे पर्व चालता
काळिज कढले.
वादळखेडे कधी पेटता

बंदिवान वाघांसम खवळुन
चिडुनि बोललो परस्परांना
स्वरही चढले.

अखेर होता पहाट, गेला
एक आमच्यामधला निघुनी
गेला कोण नि कोण राहिला
हे मज आता—जन्मभराचे—
कोडे पडले.

## तेव्हा

मस्तक ठेवुनि
गेलिस जेव्हा
अगतिक माझ्या
पायावरती

या पायांना
अदम्य इच्छा
ओठ व्हायची
झाली होती.

# ते व्हा

मस्तक ठेवुनि
गेलिस जेव्हा
अगतिक माझ्या
        पायावरती

या पायांना
अदम्य इच्छा
ओठ व्हायची
        झाली होती.

एकदा
मध्यरात्रीच्या नीरवतेतून
मी ऐकला होता एक भयानक चीत्कार
पलिकडच्या परसात असलेल्या
एका वृक्षाच्या काळ्याशार पानघुमटातून
उफाळलेला.

कोणत्यातरी पक्ष्याची प्राणांतिक किंकाळी
जी फोडीत गेली दहा दिशांच्या
तटस्थ तावदानी काचा,
अनिष्टपणाने धावली सैरावैरा अंतराळात
आणि कोसळली पुन्हा
चेंदामेंदा होऊन
त्याच वृक्षाच्या फांद्यांतून साचलेल्या
काळोखाच्या तळ्यामध्ये.

नंतर त्या किंकाळीला फुटत होते धुमारे
चिणलेल्या पण तीव्र स्वरांचे,
रात्रीच्या केसाळ काजळी त्वचेमध्ये
घुसत होते अणकुचीदार झटके
फांद्यांतून फुटणाऱ्या अपस्माराचे.

साऱ्या जगाबरोबर झोपी गेलेले ते झाड
अकस्मात झाले होते जागे
कोठल्या तरी दानवी अत्याचाराने,
आणि झाले होते स्वतःच
एक अगतिक वेदनेचे वारूळ

पृथ्वीच्या छातीतून उमाळलेले
आणि श्रुतिहीन आकाशाला
हाक मारणारे.

देव जाणे काय घडले असेल
त्या पानांच्या दुनियेमध्ये.
आले असेल एखादे जहर काळे रानमांजर
अमावास्येच्या योनीतून बाहेर सरपटलेले
क्रूर चमकत्या नजरेतून ठिणग्यांचे बुंद ढाळणारे
एका फांदीवरून दुसऱ्या फांदीवर
लसलसत्या नखाळ पंजांनी चढणारे.

त्याने अचानक अखेरच्या तळावरून
घेतली असेल उडी टाकली असेल झेप
उष:कालचे राजवर्खी स्वप्न पाहणाऱ्या
एखाद्या निद्रिस्त
गोजिरवाण्या पाखरावर.

मृत्यूच्या करवती दातांत जागृत झालेल्या
त्या पाखराने
फोडली असेल पहिली भीषण किंकाळी
आणि तुकड्यातुकड्याने शरीर तुटत असताना
घातल्या असतील त्या व्याकुल विझणाऱ्या हाका
भोवतालच्या विश्वाला.

नसेल रानमांजर असेल कदाचित घुबडही
असेल कदाचित एखादा अजगरी सर्प
कृतांताचे विळखे घालीत बुंध्यावरून सरकणारा,
असेल काहीही;

पक्ष्याऐवजी कुरतडली गेली असतील
कदाचित् त्याची पिलेही,

पण एक खरे की त्या दहा मिनिटांच्या काळात
परिसरातील एकाही वृक्षाचे
एकही पान हलले नाही,
काहीही शहारले नाही, काहीही उसासले नाही
क्षणार्धात झाले पुन्हा सारीकडे
शांत—शांत !

दूर झालो मी खिडकीपासून
पुन्हा मोठा केला रेडियोचा मंदावलेला गाज
आणि शिलगावला मेजावरचा दिवा.
कोठल्या तरी केंद्रातील विलायती संगीताच्या
इंद्रमहिरापी उभ्या राहिल्या
माझ्या खोलीतील विषण्ण हवेवर,
आणि प्रकाशाच्या सोनेरी रेषांनी
त्यांना मिठी मारली
माहेरवासी अधीरतेने;
सावल्यांत साखळलेल्या भिंती मुक्त झाल्या
त्यांनी धारण केले प्रचंड आकार पहाडासारखे
आणि उभे केले क्षणार्धात माझ्या सभोवार
एक स्नेहमय
शक्तिशाली आश्वासन.

...आयुष्यात पहिल्यांदाच
दिलासा वाटला मला
की मी पक्षी नाही.

# चाक

रस्ता तुमचा
रथही तुमचा.
रथचक्राला बांधुन मी हा
धावत आहे
जोवर मी हे मानित आहे.
तोवर
तोवर
तोवर सारे
चक्राखाली चिरडत माझ्या
नभोगतांचे निळे पिसारे,
तोवर तुमच्या पथधूलीवर
मम रक्ताची
धार किनारे,
तोवर माझ्या अस्तित्वाचे
अपूर्व स्पंदन
सूर्यकुलातिल या गोलावर
चिरते आहे,
जोवर माझ्या उरात तुमच्या
चाक रथाचे फिरते आहे.
तोवर...

गुदमरती मरती हे
फोडिति का हे टाहो
लक्ष्मीच्या अंकावर
देव कसा निजला हो !
    दुर्बळ हो बलसागर
    निष्ठुर हो करुणाकर
अथवा या दलितांपरि
देवहि दास्यात रुते !

Φ

निर्झर सरितेस मिळे
सरिता अन् जलधीला
जलधीतिल जल-कणिका
जलदांसह गगनाला !
    जीवन-क्रम सृष्टीतिल
    अधिकाधिक हो विशाल
परि मानव-जीवन हे
बंधनांत साकळते !

Φ

जरतारी वस्त्र महा
माणुसकीचे विणले
संतांनी जीवित निज
त्यासाठी खुडुनि दिले !
दंभाच्या स्वार्थांच्या
व्यवहारी अर्थांच्या
लोहावर लागुनि घस
हन्त, चिरे ते शतधा !

ф

मातीच्या चित्रांना
नाव दिले, गाव दिले
मातीच्या चित्रांना
तू अखेर भाव दिले
हृदयी तव सार्थकता
कौतुक बघुनी फुलता
मातीच्या चित्रांनी
देवा, तुज अश्रु दिले !

ф

नससी तू रूपधना
रसिका वा बुद्धिमती
हृदयातिल मधुकर हे
भ्रमतो तरि तुजभवती
अवगणुनी रम्य फुले
परिमल ज्यांतुन भरले
कारण हे विनित सुमन
पर्णांमधि दडलेले !

ф

पर्णतळी लपलेले
प्रीतीचे फूल मुके
नाही का येत तुला
नाजुक तो गन्ध सखे ?
    क्षणभर ये जवळ रहा
    लवुनि कुंपणात पहा
दिसतिल तुज फुललेली
भक्तीची श्वेत दले.

Φ

हिंडुनि मी सायंतनि
केला फुल-संभार
रात्रभरी जागोनी
केला त्यांचा हार
    वाहिन उद्ईक तुला
    स्वप्नी लागे डोळा
डोळे परि उघडित तो
हार दिसे सुकलेला !

Φ

लाजत तू म्हटले ' हो '
पृथ्वीवर स्वर्ग गमे
हृदयाच्या घुमटी तो
शंभरदा शब्द घुमे !
    तोच उदासीनपणा
    जाई स्पर्शून मना
प्रीतीहुन प्रीतीचा
शोधच की रम्य असे !

Φ

रात्र अशी अंधेरी
तेवत ना दीप कुठे
दडल्या तिमिरात दिशा
अंथरले पथि काटे !
    तूच इथे पाठविले
    तूच दिवे मालविले
पंकी पद पडता मग
बघशी का रागाने ?

ⵀ

राबुनि मी रात्रंदिन
केली ही आरास
येउनि तू पुसशी पण
कोणास्तव हा ध्यास ?
    नाही का ठाउक तुज
    हृदयातिल माझ्या गुज
किंवा ठाउक म्हणुनी
मर्मावर घाव असा ?

ⵀ

नयनांतुन होती या
दिसत निळी मज कमळे
आणि गुलाबाची नव
ओठांवर दोन दळे
    केतकि गाली उमले
    वक्षावर सूर्य-फुले
आज परी प्रेमाविण
सारे निर्माल्य बने !

ⵀ

क्षणभंगुर जीवित हे
क्षणभंगुर या जगती
कोमेजुन जाण्यास्तव
क्षणभर पुष्पे फुलती
    खरती नग कणकण ते
    भरती घन होत रिते
सर्व अनित्यात अशा
प्रेम तरी नित्य कसे ?

Φ

म्हणतो हे माझे घर
म्हणतो हे माझे जन
भ्रमरापरि कमलातिल
त्यामध्ये गुंते मन,
    पलिकडच्या परि निमिरी
    संगत मज कोण करी
माझे या जगति असे
केवळ हे माझेपण !

ग्रंथ संग्रहालय,

Φ

गजबजतो मी जगात
वर्तुळ हे हो विशाल
जे असे नसे तयास
रूपरंग दे मशाल.
    कोटरात केव्हा पण
    दडता हे माझेपण
गहन गूढ पोकळीत
कणिका मम भ्रमत बसे.

Φ

पूर्वकर्म बद्ध करी
जीवित जर हे माझे
वाहत शिरि आहे मी
गत जन्माचे ओझे
    माझे मज दास्यचि हे
    मुक्ती त्यातुन नोहे
रथचक्रापरि फिरणे
नियमित मार्गावरुनी !

ф

जीवन-जलधीवर या
एक मात्र मी तरंग
शाप मला, जलधिस जो
तोच वेग, तोच रंग
    बद्ध करी एक तीर
    आर्त एक करि समीर-
माझेपण सर्व हन्त,
सर्वांत विसर्जन हो !

ф

घूक निराशेचे हे
बसले मनि घर करुनी
आक्रोशत जगण्याचे
वैफल्यच फिरफिरुनी
    स्वर उदास ते रचती
    तिमिराचे तट भवती
जीवित ही रात्र जिला
नाहि उष:काल कधी !

ф

मृगजळ हे! मृगजळ हे!
हरिणा, फिर माघारी
निर्दय तो भास तुझ्या
प्राणांशी खेळ करी!
   डोळ्यांतुन दीन आस
   फुटतो छातीत श्वास
मृत्यूतच व्हावा का
हन्त तुझा भ्रमनिरास!

Φ

निबिड अरण्यात अशा
सर्पापरि वाट घुसे
तिमिरावर नजर फुटे
माझेपण मज न दिसे
   अवघा आकार विरे
   आत्म्याचे भान नुरे
जाणवते एक गती
जीस नियंता न कुणी!

Φ

मातीचा इमला हा
कणकण हळु ढासळतो
अविरत नद काळाचा
भवताली फेसळतो
   लाटा उठती फुटती
   भिंती पडती बुडती
अन्ती अवशेष नुरे
हीच असे का नियती

Φ

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
७०६२०
१५८३

# सूर्यफूल

पाखडसी सूर्यास्तव
सूर्यफुला, व्यर्थ जिवा
निर्दय त्या अग्नीला
भक्तीचा नच केवा

वेड्यापरि अनुसरसी
दिनभर त्या तेजासी

दिसशिलही त्यास न तू
देखत जो सर्वांना !

—उत्तरले ते मजला
" आत्मार्पण अंध असे
अणुरेणुत देहाच्या
केवळ भक्ती विलसे

सुफलित हो वा नच हो
पूजन नच खंडित हो

भक्तिस आरंभ असे
नाहि परी अस्त तिला !

तेजोनिधि येता तो
तळपत उदयाद्रिवरी
अग्निकिरण अगणित या
धगधगती देहभरती

भूवर मी तो व्योमी
तो अपार पामर मी

सर्वंकष दृष्टिस त्या
दिसणारहि मी नाही !

दिसणारहि मी नाही
कळणार न पूजा ही
ओलांडुन जाइल तो
कनकरथातून मही !

किरणांना मावळत्या
अभिवादन करुनी त्या

जाइन मातित मिळुनी
त्यातच मज मोक्ष असे !

# टीपा

## १ दूर मनोऱ्यात

अमावास्येची रात्र. वादळाने उच्छाद मांडलेला आहे. गलबताचे शीड फाटते आहे. अशा वेळीं भांबावलेल्या, भेदरलेल्या आपल्या सवंगडी नाखव्यांना त्यांच्यातलाच एक धीर देत आहे. तो त्यांचा नायक नसेलही, पण तो द्रष्टा असल्यामुळे आणि म्हणूनच वादळातही स्थिरचित्त असल्यामुळे त्यांच्या भवितव्याचा वाटाड्या आहे. तशा स्थितीतही धीरोदात्तपणाने तो त्यांच्या नजरा बंदराकडे खेचतो. तिथल्या स्तंभावरच्या शांत हिरव्या प्रकाशाकडे इशारा करतो. त्याच्या दृष्टीने तो केवळ प्रकाश नाही. केवळ ज्योत नाही तर

किरणांचा उघडून पिसारा देवदूत कोणी
काळोखावर खोदित बसला तेजाचीं लेणीं

अशी त्याची श्रद्धा. तुमची अश्रद्धा केवढीही काळीं कभिन्न असो, पाषाणासारखी कितीही कठीण आणि आडमुठी असो, श्रद्धेचा हा चिरंजीव देवदूत तिच्यावर तेजाची लेणी खोदीत बसला आहे असे आश्वासन तो त्यांना देतो. या दोन ओळींनी ही कविता भलतीच वर उचलली आहे. शब्दांच्या मोजक्या फटकाऱ्यांत जिवंत चित्र उभे करण्याची कुसुमाग्रजांची ताकद या कवितेत आरंभापासूनच दिसते, पण या दोन ओळींत तिने उच्चांक गाठला आहे.

'वादळला हा जीवनसागर' या पहिल्या ओळींतील 'जीवनसागर' या शब्दातील श्लेष लक्षात घेतला म्हणजे प्रत्यक्ष जीवनसमुद्राच्या वादळात सापडलेल्या आपल्यासारख्यांना ही कविता हे एक अभंग आश्वासन होऊन बसते. ही आश्वासकता हा कुसुमाग्रजांच्या कवितेचा एक स्थायीभावच आहे. तिचा प्रसाद आणि ओजोगुण स्वाभाविकपणे प्रगट होतील अशी भाषाशैली आणि वृत्तप्रकार तिला सहज वश होतात हेही येथे नजरेत भरते.

## २ हिमलाट

नव्या मूल्यांची पहाट उजळू लागली आहे. नेमक्या याच वेळी पाखरांना दाढांखाली रगडणारी आणि गोरगरिबांना गारठून ठार करणारी लांबसट अशी हिमलाट चोरपावलांनी आली आहे. ती मायावी आहे. भासते पण दिसत नाही. तिचे परिणाम भयानक आहेत. ती समर्थ असली तरी श्रीमंतांना वचकून आहे. त्यांच्या वाटेला जाण्याचा तिला धीर नाही. कवितेच्या पहिल्याच ओळींत 'पहा' असा सावधानतेचा इशारा आहे. श्रीमंतांना सोडून इतर सर्वांवर वरवंटा फिरवायला निघालेली कोण ही कृत्या? भांडवलशाही अर्थव्यवस्थेतून उद्‌भवलेली ही अंध निर्घृण शोषणशक्ती का? की दरिद्रता? कवी हे स्पष्ट सांगत नाही. नुसता संकेत करतो. कविता प्रतीकात्मक ठेवून कालाप्रमाणे तिच्यात नवीन आशय पाहता यावा अशी सोय जाणूनबुजूनच त्याने केली असावी. त्या कृत्येला तोंड देण्यासाठी कवीने अग्नीला—क्रांतिकारक दाहक वृत्तीला—आवाहन केलेले आहे. सामाजिक आशयाच्या कवितेला, कवीची तद्विषयक निष्ठा त्याच्या प्रतिभेत संक्रांत होण्याइतकी प्रखर असल्यास कलादृष्ट्या कशी आगळी कळा येते हे येथे पाहण्यासारखे आहे.

## ३ स्वप्नाची समाप्ती

कुसुमाग्रजांची ही अतिशय गाजलेली प्रेमकविता. या कवितेत कुसुमाग्रजांच्या कल्पकतेबरोबर त्यांची सौंदर्यवेधकता, निसर्गप्रीती, भावोत्कटता, स्वप्नलुब्धता, विचारशीलता आणि वास्तवाचे भान अशा त्यांच्या कितीतरी गुणांचा मनोज्ञ संगम सहजसुंदर रीतीने जमून आला आहे.

काढ सखे गळ्यातील तुझे चांदण्याचे हात
क्षितिजाच्या पलिकडे उभे दिवसाचे दूत

या पालुपदासारख्या येणाऱ्या कडव्यात स्वप्न आणि वास्तव यांच्यातल्या जन्मजात वितुष्टाकडे संकेत करून त्याची विदारकता त्यांनी मोठ्या संयमाने हाताळली आहे. शुक्रतारा मंद होऊ लागल्यापासून प्रकाशाच्या पावलांची चाहूल स्पष्ट होईपर्यंतची खेड्यातील पहाटेची परिवर्तने, आता स्वप्नाला आवर घातल्याशिवाय गत्यंतर नाही, या प्रियकराच्या जाणिवेच्या संदर्भात विलक्षण सौंदर्यवेधी वृत्तीने येथे टिपलेली आहेत. या गीतातला प्रियकर वास्तवाची ही अपरिहार्यता स्वीकारतो आणि त्या

दृष्टीने आपल्या प्रेयसीची समजूतही घालतो. पण तसे करताना त्याला आतून ज्या यातना होतात त्या धीराने तो आतल्या आत गिळीत असला तरी 'विषण्णता दाटलेली दिशांत्न' आणि 'जमू लागलेले दंव गवताच्या पातीवर। भासते भू तारकांच्या आसवांनी ओलसर!' या प्रतिमातून त्यांची झळ आपल्याला जाणवतेच. अशा मनःस्थितीतही हा संयमी आणि विवेकी प्रियकर सहज बोलून जातो :

ध्येय प्रेम आशा यांची
होतसे का कधी पूर्ती!
वेड्यापरी पूजितो या
आम्ही भंगणाऱ्या मूर्ती!

किती साध्या शब्दांत केवढे कटू व मनात विषाद निर्माण करणारे सत्य त्याच्या तोंडून आपल्याला ऐकायला मिळते! 'हे अतिसुंदर प्रेमगीत म्हणजे कुसुमाग्रजांच्या कल्पकतेने काठोकाठ भरलेला अमृतकलश आहे' हे खांडेकरांचे विधान अक्षरशः खरे आहे.

## ४ अहि-नकुल

अहि-नकुल ही कुसुमाग्रजांची अशीच एक अविस्मरणीय नितांतसुंदर कविता, पण या कवितेत त्यांच्या एका निराळ्याच शक्तीचा आपल्याला साक्षात्कार होतो. अहि-नकुलांच्या संग्रामाचे हे रौद्र दर्शन एखाद्या सप्तरंगी चलत्‌चित्रपटाप्रमाणे बारीकसारीक सर्व तपशीलांसह आपल्यापुढे मूर्तिमंत होते. ते पाहताना आपले डोळे बांधल्यासारखे होतात. ते त्याच्यावरून किंचितही हलत नाहीत. संग्रामातला सगळा त्वेश, आवेश आणि सगळे पेचपविते आपल्या स्तिमित दृष्टीपुढे उलगडू लागतात आणि आपण नखशिखांत थरारून जातो. नागाची चाल. त्याचा दिमाख, त्याचे चापल्य; त्याचे गांभीर्य आणि त्याचे विध्वंसक सामर्थ्य यांचे यथातथ्य वर्णन करताना कुसुमाग्रजांनी आपल्या कल्पनांचा अक्षरशः पाऊस पाडला आहे. पण योजलेल्या साऱ्या उत्प्रेक्षा कशा चपखल आणि त्याचे विविध विशेष नेमकेपणाने स्पष्ट करणाऱ्या आहेत! अशा या सामर्थ्यशाली नागावर झडप घालायला आलेल्या नकुलाची चाहूल लागताच त्याने स्वीकारलेले मरणाचे आह्वान आपल्याला दिपवून टाकते. त्यानंतरच्या उभयतांच्या झटापटीचे चित्र तर अंगावर रोमांच उभे करते. अशा वेळी कुसुमाग्रजांच्या भाषेवर लाव्हा रसाची तप्तता, कल्लोळशीलता आणि कांती चढू लागते.

...ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

रण काय भयानक, लोळे आग जळात
आदळती, वळती, आवळती क्रोधात

ही रचना पाहा आणि ‘ स्वप्नांची समाप्ती ’ या कवितेची भाषासरणी पाहा. दोन्ही ठिकाणची भाषा साधीच. पण रसानुकूल रूप धारण करण्यात ती किती निपुण आहे याची साक्ष पटते. सामर्थ्यमदाने सर्वत्रांना चळचळा कापायला लावणाऱ्या या नागाचा करुणास्पद अंतही कुसुमाग्रजांनी मोजक्या शब्दांत चित्रित केला आहे. त्याच्या रक्तात आनंदाने न्हाणारी गवताची पोती आणि त्याचे शतखंड कुरतडणारे कीटक यांचा उल्लेख करून नियतीने शेराला सव्वाशेर नेमलेलाच असतो हा दिलासाही ते देऊन जातात.

हुकूमशहा आणि लोकनायक यांच्यातल्या संग्रामावरील हे रूपक आहे असे कित्येकांचे म्हणणे आहे. तसे सूचन कवीला अभिप्रेत नसेलच असे काही म्हणवत नाही. पण या कवितेचा रसानंद अनुभवण्यासाठी अशा रूपकाची आवश्यता आहेच असे नाही. हे सारे चित्र इतके जिवंत आणि रोमहर्षक आहे की आपल्या स्वयंभू शक्तीने त्याची संपूर्ण रसप्रतीती येथे घेता येतें. मला तरी असले एखादे रूपक या कवितेचा रसानंद घेताना विक्षेपकारक वाटते. आणि ते तिच्या विशाल आशयाला मर्यादा घालणारेही वाटते.

## ६ मातीची दर्पोक्ती

सगळ्याचा शेवट शेवटी मातीतच व्हायचा या शतकानुशतचे आपल्याकडे चालत आलेल्या निवृत्तिविचारावरच ही कविता उभी आहे. पण या अतिपरिचित विचारानेच येथे असे अभिनव काव्यरूप धारण केले आहे की तो केवळ विचार राहत नाही तर एक जिवंत रसरशीत प्रत्यय होतो. घनधारा मृगाच्या पावसाने उन्मत्त, सचेत आणि गंधधुंद झालेले धूलिकण जणू येथे आपल्या सामर्थ्याचे संघगीत गात आहेत. आपल्याला अहर्निश तुडवणाऱ्या मानवांना त्यांच्या मर्यादांची जाणीव करून देत ते सांगतात, ‘ तुमचा पुरुषार्थ, पांडित्य, सत्तामद, सौंदर्यमद आणि सर्जनमद, यांचा शेवट अखेर मातीवर आणखी एक थर तयार होण्यातच होतो. श्रीमंती आणि गरीबी, पुण्य आणि पाप, नीती आणि अनीती या तुम्ही निर्माण केलेल्या सर्व द्वंद्वांवरून आम्ही सारखाच बोळा फिरवितो. ज्याला तुम्ही ईश्वर म्हणता, कर्ताकरविता मानता त्याचे निर्वाणदेखील आमच्या या मातीतच आहे. ’ सगळे काही मातीला मिळते असे आपण म्हणतो, पण ईश्वरदेखील

मातीलाच मिळतो असे म्हणायला आपल्यातले कितीसे धजतील? कुसुमाग्रज असे म्हणू शकतात. त्यामुळे हा जुना विचार एका क्रांतिकारी संदर्भात आगळेपणाने इथे सजीव होतो. माणसाच्या पुरुषार्थाचे सदैव उद्गायन करणाऱ्या कुसुमाग्रजांना नियतीच्या त्याच्यावरील निर्घृण नियंत्रणाचे भान आहे याची द्योतक अशी ही कविता त्याचमुळे लक्षणीय ठरते.

## ७ गोदाकाठचा संधिकाल

गोदाकाठच्या संध्याकाळचे हे एक वेधक चित्र आहे. गरुडपंखांनी येणारा काळोख, कापऱ्या पाण्यावरच्या वृक्षांच्या थरथरत्या सावल्या, वडाच्या पारंब्यांतून क्षणभर फडफड करून मुकाट उडणारी रातपाखरे, दूरच्या राईमधून मोडत मावळणाऱ्या धुराच्या रेषा, सांदीतल्या रातकिड्यांचा तीव्र स्वर, आतुर अंतःकरणाच्या आणि कातर डोळ्यांच्या ग्रामीण युवतींची द्रुत लयीतली पावले, पिसारा झडल्यासारखा पांढरा ढग, शुक्राचे मोहक चांदणे, शहरातले मिणमिणते दिवे, गंगेतल्या आपल्या प्रतिबिंबावर खिन्नपणाने दृष्टी लावून राहिलेला पडका वाडा, भंगलेले पण आतली मूर्ती जपत राहिलेले देऊळ ही सगळीच दृश्ये जणू एकमेकांचे रंग गडद करीत जातात. अशा वेळीं पाचोळ्याची सळसळ आणि डोहातली खळखळ ऐकून कवीला संभ्रम पडतो 'हा येणाऱ्या रात्रीच्या पावलांचाच तर आवाज नव्हे?' या निसर्गचित्रातून कवीचे मन सूचकतेने व्यक्त होत जाते.

कविता चांगली आहे. पण शुक्रताऱ्याला आत्मार्पण करणाऱ्या वीराची आणि देवळाला ध्येयनिष्ठ माणसाची उपमा दिल्यामुळे आणि शहरातले दिवे शुक्राच्या तेजाचे विडंबन करण्यासाठी मिणमिणत आहेत असे म्हटल्यामुळे मूळ चित्राच्या सुभगतेत भर पडण्याऐवजी तिला थोडी इजाच झाली आहे.

## ८ स्मृती

या कवितेत फक्त पाच चित्रे आहेत पण ती विलक्षण बंदिस्त अशी आहेत मुंबईतले मादक जीवन आपल्या एकेका विलासाची भुरळ घालीत असताना गोदा-काठच्या सात्त्विक जीवनाची एकेक तत्सदृश छटा कवीच्या कृतज्ञ स्मरणातून उगवू लागते, त्याला व्याकुळ करते आणि त्यासरशी मुंबईतल्या मादक जीवनाचा तो दिमाखदार विलास तिथल्या तिथे निःसत्व होतो, निस्तेज पडतो. नगरातले लख-लखणारे दिवे आणि माजघरातल्या मंद दिव्याची वात, शहरातली धुंद रातराणी

आणि घरच्या परसातला एकुलता निशिगंध, अफाट सागरतीरावरील श्रीमान् इमारतींचा थाट (येथे श्रीमान् हा शब्द कसा थाटांत आला आहे!) आणि गोदाकाठचा भंगलेला घाट, झणझणत्या नूपुरांतल्या जलशाचा रंग आणि साध्याभोळ्या दयितेने ऐकवलेला तितकाच भोळाभावडा अभंग आणि लावण्यवतींच्या संगतीतल्या मदिरेचा आरुणी फेस आणि त्याच दयितेच्या उदास डोळ्यांतला कारुण्यपूर्ण विलास अशा जोड्या तुलनेसाठी टाकून कवीने निष्ठेच्या सात्त्विकतेला हा एक कृतज्ञतेचा अंजलीच वाहिलेला आहे. आशय आणि आविष्कार यांच्या सहजसंवादामुळे या कवितेला अवीट गोडी लाभली आहे.

## ९ आगगाडी व जमीन

आगगाडी ही जुलूम करणाऱ्या शक्तीचे प्रतीक आणि जमीन ही सहन करणाऱ्या शक्तीचे प्रतीक असे कल्पून त्यांच्यातला संघर्ष कवीने येथे अत्यंत नाट्यात्मक पद्धतीने चितारला आहे. या कवितेची चाल चालतेही आगगाडीच्याच तालात. त्यामुळे तिच्या आशयाशी आपण चटकन तादात्म्य पावतो.

आधी सोशिक जमिनीची दीन विनवणी, त्यानंतर तिला आगगाडीकडून मिळालेले उद्दाम उत्तर आणि निर्घृण वर्तणूक आणि शेवटी जमिनीच्या दुखावलेल्या स्वाभिमानाने प्राणपणाने उचल खाल्यामुळे आगगाडीचा झालेला चक्काचूर अशा तीन नाट्यचित्रांतून ही कविता आपला परिणाम साधते.

समर्थांच्या दर्शनी शक्तीच्या मुळाशी असलेले दौर्बल्य आणि दुर्बळांच्या मुकाट अशक्तीत दडून असलेले अपार बळ याची जाण उत्कटतेने घडवण्याच्या कसबात या कवितेचे यश मुख्यतः सामावलेले आहे. उल्लेखलेली दोन्ही प्रतीके मानवी भावनांनी कशी बोलतात—वागतात हे येथे पाहण्यासारखे आहे. त्याचमुळे त्यांच्यामागचा आशय असा मूर्तिमंत होतो.

## १० क्रांतीचा जयजयकार

मृत्युंजय श्रद्धेतून उगवलेले हे एक अमर क्रांतिसूक्त. — गांधीप्रणीत अहिंसक क्रांतीच्या सर्व दैवी गुणांचा उज्ज्वल आलेख समूर्त करण्यासाठी त्याचा अवतार झालेला असला तरी जगातील कोणत्याही पुरोगामी क्रांतीचे आवेशपूर्ण प्रवक्तेपण ते समर्थपणे करू शकते. भारतीय साहित्यातच नव्हे तर जागतिक साहित्यातदेखील एवढ्या तोलामोलाचे क्रांतिसूक्त क्वचितच आढळेल. येथे कवीच्या वाणीला प्रेषितत्वाची

प्रतिष्ठा लाभली आहे. उघड्या डोळ्यांनी सूर्यमंडळाला हात घालू पाहणाऱ्या, मातृभूमीच्या मुक्तीसाठी आपले सर्वस्व होमायला निघालेल्या आणि जिवंतपणीच मृत्यूला जिंकून राहिलेल्या ध्येयधुंद क्रांतिकारकांची अपार श्रद्धा, अभंग आवेश आणि अढळ निर्धार यांचा या कवितेतला आविष्कार इतका प्रखर आहे की त्याच्या धगीने आपणही उद्दीपित होतो. यातल्या शब्दाशब्दात क्रांतीची दीक्षा देण्याचे मंत्रसामर्थ्य आहे. 'मृत्युंजय आम्ही! आम्हांला कसले कारागार?' किंवा 'एकच तारा समोर आणिक पायतळी अंगार,' अशा यातल्या एकाहून एक अग्निरसाने ओथंबलेल्या ओळी तप्त मुद्रेप्रमाणे आपल्या अंतःकरणावर चिरंजीव संस्कार करून जातात.

कशास आई, भिजविसि डोळे उजळ तुझे भाळ
रात्रीच्या गर्भात उद्याचा असे उषःकाल
सरणावरती आज आमुची पेटताच प्रेते
उठतिल त्या ज्वालांतुन भावी क्रांतीचे नेते

या ओळी तर कोणत्याही राष्ट्राला अवसेच्या अंधारात देखील उज्ज्वल ताऱ्यांप्रमाणे अमर प्रेरणा आणि अनंत आश्वासन देत राहतील. ज्या क्रांतिकारकांच्या तोंडी हे सूक्त घातले आहे त्यांच्या उत्तुंग अंतस्तेजाने ते झळाळून उठले आहे.

## ११ जालियनवाला बाग

नाट्यात्मकता हे कुसुमाग्रजांच्या प्रतिभेचे एक खास वैशिष्ट्य. त्याचा केव्हा आणि कसा उपयोग करावा हे ते फार चांगले जाणतात. याचे प्रत्यंतर म्हणून ही कविता लक्षणीय आहे. एरवी हजार ओळींत देखील जो विषय नीट सांगता आला नसता तोच अवघ्या बारा ओळींत इतक्या प्रभावीपणे व्यक्त झालाच नसता. जालियनवालाबागेतील अमानुष हत्याकांड त्यांच्या प्रतिभाचक्षूंपुढे उभे राहाताच आपल्या भाईबंदांची कत्तल झाली या विचारापेक्षा माणसाकडूनच माणसांचा आणि माणुसकीचा निःपात झाला ही जाणीवच त्यांना जास्तीत जास्त खोल जखम करून जाते. त्यामुळे त्यांची देशभक्ती मानव्यात आणि संताप करुणेंत संक्रांत होताल. या जखमेवर पुन्हा मीठ चोळले जाते ते या जाणिवेने की हा महाभयंकर प्रकार परमकारुणिक ख्रिस्ताचे अनुयायी म्हणविणाऱ्याकडून घडावा. ज्या ख्रिस्त भगवानाने प्रेम, शांती आणि क्षमा यांच्यातच परमेश्वराचे अधिष्ठान आहे, असा आयुष्यभर उपदेश केला आणि त्यापायी क्रूसावरचे अत्यंत हृदयद्रावक असे मरण देखील पत्करले त्याला आपल्याच पताका मिरवणाऱ्यांच्या अघोरी कृत्याबद्दल आणि

त्यात त्यांनी दिग्विजय मानल्याबद्दल काय वाटले असेल हा विचार त्यांच्या मनाला स्पर्शून जातो! आपली वेदना आणि आपली जखम ते त्याच्याचकडे उघडी करतात. आणि त्यांना भास होतो:

पाचोळ्यापरि पडली पाहुन प्रेतांची रास
नयन झाकले असशिल देवा, तू अपुले खास

एवढेच म्हणून ते थांबत नाहीत, तर या घटनेमुळे ईश्वरावर सैतानाची मात झाली आहे; किंबहुना तुझ्या काळजात ही आणखी एक जखम झाली आहे असे उद्गार ते काढतात. आपल्या काळजातली जखम ख्रिस्ताच्या काळजापर्यंत पोचवून विषयाच्या स्थलकालाच्या मर्यादा त्यांनी ओलांडल्या आहेत आणि त्याला देशकालातीत सर्व-स्पर्शित्व मिळवून दिले आहे. आपल्या नाट्यशक्तीला चित्रशक्तीची समर्पक जोड ते कशी मिळवून देतात तेही येथे पाहण्यासारखे आहे.

## १३ जा जरा पूर्वेकडे

कुसुमाग्रजांची कलावंत सहानुभूती स्वदेश आणि स्वकीय यांच्यापुरती मर्यादित नाही. राक्षसी अत्याचार जालियनवाला बागेत घडोत किंवा अन्य कुठेही घडोत, त्यांची सहानुभूती तिथे धाव घेते. पण तिचा स्वभाव कलावंत असल्यामुळे ती नाट्यमय किंवा चित्रमय पद्धतीने व्यक्त होते. बुभुक्षित गिधाडांच्या तांड्याला उद्देशून कवी म्हणतो, 'अरे, वाळवंटांतले ते कुत्र्याचे सडलेले मढे कुरतडीत काय बसलात? सध्या काळ तुमचा आहे. देव प्रसन्न आहे तुमच्यावर. त्याच्या कृपेने गरमागरम मांसाची लयलूट आहे. धारोष्ण रक्ताच्या नद्यांना पूर आला आहे. उत्साहाने आणि आनंदाने गात जरा पूर्वेकडे जा. माणसांच्या रक्तमांसाचा तिथे अमाप खच पडला आहे. बलदंड पुरुषांचे, लुसलुशीत स्त्रियांचे, कोवळ्या तान्ह्या अर्भकांचे असे सर्व प्रकारचे मांस तेथे सुलभ आहे. ते वाया का घालवता? ईश्वराची दया, माणसाची विज्ञानांतली प्रगती आणि त्यांच्या वासनांचा ऊत यांनी ही पर्वणी तुमच्यासाठी निर्माण केली आहे. ती वेळीच साधून घ्या. हे सारे कवीने अशा उपहासगर्भ शैलीने आणि चित्रमय पद्धतीने सांगितले आहे की आपल्या तथाकथित संस्कृतीच्या अमानुषतेवर आणि ढोंगावर विदारक प्रकाश पडावा. कवितेच्या शेवटच्या दोन ओळी या दृष्टीने अत्यंत बोलक्या आहेत. कवीच्या करुणेमुळे त्याच्या सात्त्विक क्षोभाला इथे विलक्षण धार आली आहे.

## १४ मूर्तिभंजक

साधनेच्या प्रवासात माणूस एकेक मूल्य तपासीत जातो आणि त्याचे वैफल्य उमगल्यावर त्याच्याही पुढच्या मूल्याचा शोध घेतो; असे करता करता अशी एक अवस्था येते की जेव्हा लोकाचारातल्या सर्वच मूल्यांचे वैयर्थ्य पटून तो अलौकिकाचा, निराकाराचा म्हणजेच शून्याचा वेध घेऊ लागतो. नेमक्या अशाच वेळी म्हणजे परम सत्याच्या जवळ तो पोचलेला असतो तेव्हाच तो लौकिक जगाच्या आकलना-पलीकडे जातो आणि त्यामुळे ते त्याला वेड्यात काढते आणि त्याच्या वर्तनातून काही शिकण्याऐवजी ते आपल्या मूल्यांचा विध्वंस करणारे आहे असे समजून त्या साधकाचा अधिक्षेप करते. स्टीफन्स झ्वायगची ' विराट ' ही कथा याच मुद्यावर आधारलेली आहे. मूर्तीसाठी जिवापाड परिश्रम करून तिच्यावर भव्य शिल्प उभे करणारा आणि तिच्या भजनपूजनात अष्टौप्रहर व्यतीत करणारा कलाकारच पुढे तिचा विध्वंस करतो, शून्यात नजर लावून बसतो आणि अखेर आल्यागेल्याच्या कायम उपहासाचा विषय बनतो ही कथा सांगून एका महान जीवनसत्यावर कवीने जसा उद्बोधक प्रकाशझोत टाकला आहे त्याचप्रमाणे जाता जाता, पाषाणाकडून वाट्याला यायची ती उपेक्षा आणि रानच्या वैभवाची उधळमाधळ असे सांगून मूर्तिपूजेविषयीची निरर्थकताही येथे नमूद करून ठेवली आहे.

## १५ कोलंबसाचे गर्व–गीत

ही कविता खरे पाहता गर्व-गीत नसून माणसाच्या दुर्दम्य विजिगीषू महत्त्वाकांक्षेचे आणि अनंत अशा ध्येयासक्तीचे गीत आहे. कोलंबस हा इथे मानवतेचे निशाण मिरवीत अज्ञाताचा महासागर धुंडाळण्यासाठी आणि त्यातील नवनवे प्रदेश जिंकण्यासाठी निघालेला अपराजित वृत्तीचा जीवनवीर आहे, किंबहुना अशा सर्व वीरांचा तो प्रतिनिधीच आहे. पण त्याचे चित्र उभे करताना कोलंबस म्हणून त्याची जी वास्तव व्यक्तिरेखा कवीच्या नजरेसमोर आहे तिचा ठळकपणा त्याने कुठेच पुसट होऊ दिलेला नाही. तो धर्माने ख्रिस्ती असल्यामुळे आणि त्याची आपल्या धर्मावरची श्रद्धा जाज्वल्य असल्यामुळे आपल्याला वेढणारे महासागराचे आक्राळविक्राळ वादळ हे त्याला स्वर्गातून खाली लोटल्या गेलेल्या सैतानाने सूडबुद्धीने मांडलेले रुद्रभीषण वेताळतांडव वाटते. या तांडवाचे वर्णन कोलंबसाच्या प्रमाथी व्यक्ति-मत्त्वाला साजून दिसेल आणि महासागराच्या क्षोभाच्या विराटत्वाचा स्पर्श घडवील अशा उत्तुंग प्रतिमांच्या साहाय्याने कवीने केले आहे. हे वर्णन जितके प्रत्यक्षातल्या

सागराचे आहे तितकेच ते अज्ञात जीवनसागराचेही आहे. जीवनाच्या महाकाव्याचा हा धीरोदात्त नायक येथे आधी पदच्युत सैतानाला आव्हान देतो आणि मग वादळातल्या आपल्या सवंगड्यांचा धीर खंबीर राहावा, स्वतःच्या जीवनव्रतावरची त्यांची श्रद्धा अभंग टिकावी, दिव्य उद्दिष्टावरची त्यांची दृष्टी पक्की असावी, आपण काय साधायचा निर्धार करून निघालो आहोत याचे भान त्यांच्या ठिकाणी जागते असावे याची त्यांना तो समयोचित समज देतो. तो त्यांना भलती आश्वासने देत नाही, नसत्या आशा लावीत नाही. आपले जीवन ही सुळावरची पोळीच आहे आणि आपण उघड्या डोळ्यांनी ते पत्करले आहे, किंबहुना ते नियतीनेच आपल्या जन्माबरोबर आपल्यावर सोपवले आहे हे तो त्यांना प्रखर आत्मविश्वासाने सांगत आहे. हे गीत म्हणजे आलेल्या प्रसंगाच्या निमित्ताने त्याने केलेले स्फूर्तिप्रद भाषणच आहे. येथे नाट्यगुणांच्या जोडीला कवीचे वक्तृत्वगुणही प्रकर्षाने प्रगट झाले आहेत. 'कशासाठी जपावे पराभूत प्राणा ?' या ओळीपासून सगळ्याच ओळी चढत्या श्रेणीने तेजस्वी सुभाषितांची कळा घेऊन अवतरल्या आहेत. कसली पत्रास ठेवता या सागराची ? त्याला सांगा :

'अनंत अमुची ध्येयासक्ती अनंत अन् आशा
किनारा तुला पामराला'

असे जेव्हा हा कोलंबस आवेशाने म्हणतो तेव्हा तर या कवितेतला ओजोगुण शीग गाठतो. 'क्रांतीचा जयजयकार' या कवितेशी या कवितेची तुलना करणे उद्बोधक ठरेल. दोघींचाही पिंड मुळात एकच आहे. फक्त संदर्भ तेवढे निराळे. या उभय कवितांतून जीवन आणि मरण या दोन्हींच्याही बाबतींतली कुसुमाग्रजांची मनोधारणा फार चांगल्या रीतीने स्पष्ट झाली आहे.

## १६ पृथ्वीचे प्रेमगीत

कुसुमाग्रजांच्या प्रतिभेला भव्यतेचे उपजत वेड आहे. परिमाणे जितकी मोठी तितका तिच्या गरुडविहाराला अधिक अवसर मिळतो. त्यांना ती भिडतेही मोठ्या आत्मविश्वासाने आणि सहज. मराठीत सुंदर, सूक्ष्म आणि सखोल प्रेमगीते काही थोडीथोडकी नाहीत. प्रत्येक कवीने या बाबतीत आपली प्रतिभा पणाला लावून पाहिली आहे. पण पृथ्वीचे प्रेमगीत लिहिण्याचे सुचले आणि साधले कुसुमाग्रजांनाच. या प्रेमगीतांची उभारणी पृथ्वीमातेला सूर्यनारायणाविषयी वाटणाऱ्या दाहक आणि उत्कट अशा भक्तीसदृश प्रेमाकर्षणावर आधारल्यामुळे पहिल्या ओळीबरोबर ते

आपल्याला उदात्ताच्या अंतरिक्षात घेऊन जाते. जगताच्या पितरांचा हा शृंगार दुबळा आणि हिणकस कसा असणार ? स्वभावतः तो समर्थ आणि दिव्यच असणार. तो दिव्याकाशातला आहे तसाच युगायुगांचाही आहे. त्यामुळे तो सहज स्थलकालातीत बनतो.

या गीतातील पृथ्वी प्रौढ आहे. सावित्रीसारखी निष्ठावंत आहे. बाहेरून शांत दिसली तरी तिच्या अंतःकरणातली प्रेमज्योत जळती, जागती आहे. तारे, चंद्र, शुक्र, मंगळ, ध्रुव, आणि धूमकेतू आपापल्या परीने आणि आपापल्या स्वभावानुसार तिचे मन जिंकण्याचा प्रयत्न करतात. या प्रीतीच्या ज्या परी कुसुमाग्रजांनी चित्रित केल्या आहेत त्या जितक्या वैशिष्ट्यपूर्ण आहेत. तितक्याच नीटस, रेखीव, आणि प्रत्येकाच्या स्वभावाला चपखल बसणाऱ्या आहेत. पण यांपैकी कुणाचाही अनुनय तिचा चित्तवेध करू शकत नाही.

परी भव्य ते तेज पाहून पूजून
घेऊ गळ्याशी कसे काजवे ?
नको क्षुद्र शृंगार तो दुर्बळांचा
तुझी दूरता त्याहुनी साहवे !

असे उद्गार ती काढते. दिव्य दीक्षामंत्रासारखे हे शब्द कानी पडताच आपण थरकतो, चमकतो, अंतर्मुख होतो. आम्हा माणसांच्या शृंगाराचा कस मनातल्या मनात तपासतो. पृथ्वीचे हे प्रेमगीत अथपासून इतिपर्यंत समर्थ प्रेमाचा साक्षात्कार घडवण्याच्या दृष्टीने अप्रतिम तर आहेच, पण त्याचबरोबर ग्रहगोलांविषयीच्या आपल्या शास्त्रीय ज्ञानाचा कलादृष्ट्या किती श्रेयस्कर उपयोग करून घेता येतो याचेही या गीतात अपवादात्मक पण समर्थ असे प्रत्यंतरही आपल्याला मिळते. त्या दृष्टीने ही कविता जितकी अपूर्व तितकीच अभ्यसनीयही आहे.

शृंगाराला उदात्ताची इतकी उत्तुंग बैठक आणि तीही इतक्या कलापूर्ण रीतीने देणारी असली दुसरी कविता दुर्मिळच म्हटली पाहिजे. या कवितेतले कुसुमाग्रजांचे यश अनन्यसाधारण आहे.

## १७ सात

या कथाकाव्याचे सूत्र किती छोटे ! पण त्यातून बलिदानाचे केवढे रोमहर्षक चलच्चित्र कुसुमाग्रजांनी उभे केले आहे आणि तेही केवढ्या नाट्यपूर्ण रीतीने !

प्रतापराव गुर्जराने रणात पाठ दाखवल्याचे कळताच महाराजांनी त्याला पाठविलेले जळजळीत पत्र, पत्रातल्या एकेका अक्षराने त्याच्या अंतःकरणात उसळलेले काहूर, त्यातून उमटलेले त्याचे पश्चात्तापाचे उद्गार, प्रमादाच्या परिमार्जनार्थ त्याने आपल्या सरदारांसह केलेली निर्वाणीची घोडदौड, छावणीतला निकराचा हल्ला आणि रणधुमाळीच्या वणव्यात करून घेतलेली प्राणांची होळी ही एकापेक्षा एक अंगावर काटा फुलवणारी चित्रे वीर भावनेचा पारा सारखा वाढवीत ठेवतात. 'वेडांत मराठे वीर दौडले सात' ही पालुपदाची ओळ तर तिच्या चढत्या लयीला घणाघाती ताल अखेरपर्यंत देत राहते.

परिणामांची तमा न बाळगता मूल्यांचा मान राखणे या खास मराठी बाण्याचे उद्गायन करण्यासाठीच ही कविता अवतरली आहे, पण हे तत्वच एवढे सार्वभौम आणि सनातन आहे, की तिचा प्रभाव मराठी मनापुरता मर्यादित राहात नाही ही या कवितेची थोरवी आहे. त्याचा त्याग आंधळा असेलही, पण त्याचे महन्मंगल आवाहन अजूनही कसे मिळू शकते हे शेवटच्या कडव्यात विलक्षण रसमयतेने दाखवून देण्यात आले आहे. दगडावर, पाण्यावर, क्षितिजावर, वाऱ्यावर, सर्वत्र ही दिव्य कहाणी वज्रलेप झाली आहे.

अद्याप विराणी कुणि वाऱ्यावर गात

या ओळींसरशी ती विराणी आपल्याही अंतःकरणात आर्त आलाप घेऊ लागते.

## १८ शेवटचे पान

क्षणाच्या सहवासाने युगांचा चटका लावून फिरून आपल्या खडतर जीवनाच्या मुशाफरीवर चाललेल्या आपल्या प्रियकराला जरा वळून तरी पहा अशी जीव तोडून आळवणी करणाऱ्या प्रेयसीचे हे एक आर्त गीत. तू मला भुलवलेस, माझे यौवन लुटलेस आणि त्याचे एवढेही स्मरण न ठेवता तू मला टाकून चालायला लागलास असे आरंभी ती रोषाने बोलते खरी पण तो देखील खराखुरा नसून त्याला अडवून ठेवण्यासाठी टाकलेला एक पेचच. अवसेने काळवंडलेल्या आपल्या जीवनात त्याने दुणी पौर्णिमा फुलवली याची तिला जाणीव आहे आणि त्याचमुळे तिच्याऐवजी आता दुणी अवस येणार म्हणून ती कासावीस झाली आहे. तरीही त्याच्या खडतर एकाकी प्रवासातील दुःखांची कल्पना तिच्या भक्तिभावनेला उमाळा आणते. 'उन्नत माझे ऊर उशाला घोष तुझा ज्यातून' या उद्गारांतून ती त्याला जशी आपल्या

सौंदर्याची आणि तारुण्याची भुरळ घालू पाहते त्याचप्रमाणे त्याला आपल्या निष्ठेची-ही खात्री देते. आणि एवढे करूनही तो आपल्या निर्धारापासून चळत नाही हे जेव्हा तिला स्पष्ट दिसते तेव्हा सारी आसक्ती बाजूला सारून ती त्याचे अभीष्टच चिंतीत राहते. त्याच्या पायात गुंतून बसलेले आपल्या हृदयाचे रेशमी धागे तुटले तर खुशाल तुटू देत असे निर्वाणीचे उद्‌गार काढण्यापर्यंत तिच्या समर्पणभावनेची मजल जाते. पराक्रमी आणि ध्येयवादी पुरुषावर जीव ओवाळून टाकणाऱ्या निष्ठावंत स्त्रीच्या भावाचे आणि स्वभावाचे मोठे विलोभनीय चित्र कवीने या गीतात रेखाटले आहे.

## १९ उष:काल

ही कविता स्वप्नाची समाप्ती या कवितेशी पडताळून पाहण्यासारखी आहे. तिच्यातही प्रियकर असेच प्रभातकाळचे वर्णन करतो पण ते प्रेयसीला वास्तवाचे भान आणून देण्याच्या हेतूने. पॅण्डोराच्या स्वप्नमंजूषेतील सगळी स्वप्ने उडून गेली. एक तेवढे तिने कसेबसे झाकले आणि जपून ठेवले. ते म्हणजे आशास्वप्न. स्वप्नांचा सगळा खजिना रात्र लगबगीने घेऊन गेली आहे आणि एकच उषास्वप्न काय ते चुकून राहिले आहे. ते जपून ठेव असे या कवितेतला प्रियकर आपल्या प्रेयसीला सांगत आहे, या स्वप्नाचा प्रसन्न गारवा, उत्साहवर्धक तजेला आणि विस्मयकारक अपूर्वाई यांनी चित्ताला दीर्घकाळ भुरळ घालावी अशा दृष्टीने येथील सर्व प्रतिमा एकमेकाशी संवाद साधतात. जणू सौम्य जलरंगातले तजेलदार चित्रच.

## २० प्रकाश-प्रभू

'अहो ! सूर्य काय शिळा ?" असा एके ठिकाणी ज्ञानदेवांनी मोठा उद्-बोधक प्रश्न विचारला आहे. पण सामान्यपणे रोज उगवणारा सूर्य आपल्या दृष्टीला शिळाच असतो. नित्यपरिचयाने आपल्या नजरेवर साचलेली धूळ उडवून लावून सूर्योदयाचा ताजेपणा आपल्याला उत्कटपणे जाणवेल अशा तऱ्हेने हे सूर्यागमाचे सूक्त कुसुमाग्रजांनी येथे गायले आहे. या विश्वचक्रवर्ती प्रकाशप्रभूचे असंख्य दूत तेजाचे घट ओतीत त्याचा राजमार्ग कसा संमार्जित करतात, मग आपली धीरगंभीर अरुणमंगल पावले टाकीत ही परमेश्वर-मूर्ती चराचरावर जीवनाचा अंजली शिंपडीत कशी पुढे येते, तिच्या दिव्य करस्पर्शाने दैन्यदुःखांचे मेघखंड दुभंग होऊन त्यातल्या ज्योती आकाश कसे व्यापून टाकतात आणि अशा या अद्‌भुत प्रकाश-

प्रभूच्या स्वागतासाठी भूमी, पर्वत, हिमवंती किंबहुना सर्व चराचर नटून थटून कसे सुसज्ज होते याचे रसरशीत चित्र जेव्हा कुसुमाग्रज आपल्यापुढे उभे करतात तेव्हा 'सूर्ये अधिष्ठिली प्राची । जगा राणीव दे प्रकाशाची' या ज्ञानदेवांच्या उक्तीचा प्रत्यक्ष साक्षात्कारच ते आपल्याला घडवतात. अशा वेळी

या माझ्या हृदयावर देवा,
पवित्र अपुले पाउल ठेवा.

ही सहज प्रार्थना अंतःकरणांतून उठावी हे स्वाभाविकच आहे. या सहज प्रार्थनेचा उगम आहे माणसाच्या प्राणभूत श्रद्धेत, जिने त्याची खातरजमा करून दिलेली असते की एकदा हे अमर पाऊल तुझ्या अंतःकरणावर उमटले म्हणजे कितीही अंधाऱ्या रात्रींनी तुझ्यावर आक्रमण केले तरी त्यांची खंत करण्याचे तुला कारण नाही. रोजचा सूर्योदय म्हणजे ईश्वराचे नित्यनूतन आश्वासन. हवे आहे ते त्याचे आवाहन स्वीकारण्याची क्षमता असलेले अंतःकरण; हेच कुसुमाग्रजांना येथे सुचवावयाचे आहे.

## २१ सैगल

सैगलच्या गाण्याची तान अचानक कानावर पडल्यामुळे कवीची चालती पावले जागच्या जागी थबकतात आणि भान हरपून तो त्या गाण्याशी एकतान होतो. त्याच्या आवाजीची मोहक झार, मंद्र लयीतली आर्तता, स्वरातून वाहणारे प्रशांत, सुंदर मार्दव आणि शब्दाशब्दातून होणारा कोमल भावांचा वर्षाव यामुळे मंत्रमुग्ध झालेल्या कवीला आपण जणू गहन भावांच्या पवित्र जान्हवीतच अवगाहन करीत आहोत असे वाटते.

दिवसभराच्या व्यापतापांनी गांजून गेल्यावर रात्री गोदाकाठच्या घाटावर डोके टेकून आपण पडलो असताना तेथल्या काळोखात सैगलची असलीच तान कानी पडून जवळच्या जुनाट देवळाच्या तटाप्रमाणे आपणही कसे शहारून निघत असू हे त्याला आठवते. दिव्य भावांनी रोमहर्षित करणाऱ्या गोदाकाठच्या अशा कितीतरी रात्री त्याच्या दृष्टीपुढे सजीव होतात. या आलापीमुळे अंतःकरणाचे वादळ थंडगार झाले आणि सर्व शल्यांचा विसर पडून चित्त चांदण्याच्या बरसातीत चिंब न्हाऊन निवाले असे तो कृतज्ञतेने उद्गारतो आणि मनातल्या मनात त्याला उद्देशून म्हणतो :

अशीच संगीते आळवी तुझी कलावन्ता,
घटिभर जागव रे आमुची अशीच मानवता!

आपल्या दृष्टीने उत्तम गाण्याची लक्षणे कोणती आणि त्याने अखेर साधावयाचे काय हे हा वैयक्तिक अनुभव शब्दरूप करताना कवीने व्यंजनेने सांगून टाकले आहे.

## २२ देवाच्या दारी

'देवाच्या दारी' या शीर्षकाखाली वस्तुतः आहेत तीन कविता. पहिली १९३२ साली लिहिली गेली आहे. दुसरी त्यानंतर पाच वर्षांनी आणि तिसरी आणखी दोन वर्षांनी. या तीन्ही कवितांतून भक्तिशील कविमनाचा आणि त्याच्या ईश्वरविषयक कल्पनांचा आणि प्रतीतीचा विकास आपल्याला दिसून येतो. त्यामुळे त्यांच्यात एक प्राणभूत संगती आहे. म्हणून तिला एक कविता मानणे जितके स्वाभाविक तितकेच उद्बोधकही ठरते.

या कवितेच्या पहिल्या खंडातला सूर आपल्या परिचयाचा आहे. आपल्या संतांच्या वाणीहून तो फारसा निराळा नाही.

चिखलात येता मूल माखोनिया
प्रेमे न्हाऊ तया घालतोसी.

या उद्गारांवरून ईश्वर हा कनवाळू आहे, भलेच करणारा आहे, अशी या कविमनाची श्रद्धाशील भूमिका आहे. येथे सारी भाषा अजीजीची आणि समर्पणाची आहे.

पण कवितेच्या दुसऱ्या खंडात हा सूर साफ बदलतो. एके काळी त्याच्या कनवाळूपणावर डोळे मिटून विश्वास टाकणारे हे मन वास्तव जीवनातील अन्याया आणि निर्दयता पाहून त्याच्या चांगुलपणावरील मूळचा विश्वास गमावून बसते.

चिमण्यांच्या घरा लाविसी मशाल
केवढी विशाल दया तुझी

असे उपहासगर्भ उद्गार ते त्याला ऐकवते आणि म्हणते :

तुझ्या महिम्याची प्रचंड पुराणे
गमती तराणे अर्थहीन

तरी देखील 'असो, भले बुरे वदलीसे वाचा
काय मानायाचा त्याचा राग

ही जवळिकेची भाषा येथेही आहेच. पण तिसऱ्या खंडात मात्र मुळातच ईश्वर आहे किंवा नाही अशी शंका त्याला ग्रासते आणि आपल्या भ्याडपणामुळे आणि

दुर्बलतेमुळे रणांतून पळ काढून आपणच त्यांची मूर्ती बनवली आणि तिचे देव्हारे माजवीत राहिलो असा त्याला साक्षात्कार होतो. या साक्षात्कारासरशी भक्ताला खरी आत्मजागृती प्राप्त होते आणि 'शूरांना निवारा समरात' अशी धारणा होऊन चुकल्यामुळे तो जीवनाच्या रणांगणाला सामोरा होतो. त्यामुळे,

आहेस की नाही आज नसे चिंता
दोहींमधे आता भेद नुरे

असे उद्गार सहजच त्याच्या तोंडून बाहेर पडतात.

बाह्यात्कारी दिसायला हा भक्त सात्त्विक वाटला तरी जीवनश्रद्धेत तो आस्तिकालाही मागे सारतो. आपल्या अंगच्या असांकेतिकतेमुळे ही कविता जितकी वेगळी तितकीच आगळीही ठरली आहे.

## २३ टिळकांच्या पुतळ्याजवळ

श्रांत, हताश आणि अस्वस्थ मनःस्थितीत पुळणीत डोके टेकून कवी बसलेला आहे. किर्र काळोख आणि रातकिड्यांचा आक्रोश यांच्यामुळे त्याच्या हृदयकल्लोळात आणखीनच भर पडली आहे. अशा स्थितीत एकाएकी त्याची नजर टिळकांच्या पुतळ्यावर जाते आणि त्याबरोबर क्षणार्धात त्याच्या अंतःकरणातील कोलाहल शांत होतो. 'दृष्टींत डोंगरा परी भरे ती मूर्ती' 'जी पाहुन सागर थबके, परते आत' या दोनच ओळींत टिळकांचे मृत्युंजय कर्तृत्व आणि जबरदस्त दरारा यांचे हुबेहूब चित्रच त्याने उभे केले आहे. या पुतळ्याचे दर्शन टिळकांचे ऊर्जस्वल जीवन आणि क्षणोक्षणी मृत्यूची उजळणी करणारे आपले पामर जिणे यांच्यातील विरोध त्याला तीव्रतेने जाणवतो आणि 'ते होते जीवित—अन् हा जीवितभास' असा उद्गार तो काढतो. मांडणीच्या दृष्टीने 'सात' या कवितेइतकी ही कविता बंदिस्त नाही. तरीही तिच्यातला उत्कट भाव आपल्यावर प्रभाव टाकतोच.

## २४ समिधाच सख्या या

येथे कुसुमाग्रज आपल्याला आपल्या कवितेचा स्वभाव काय, तिचे उद्दिष्ट काय आणि तिची आकांक्षा कोणती हे सांगत आहेत. आपल्या कवितेतून आपली जीवनसरिताच वाहात आहे अशी ते ग्वाही देतात. ही करामत नाही तर हा प्रत्यक्ष जीवनसाक्षात्कार आहे असे त्यांना म्हणावयाचे आहे. कधी तिला उधाण

येत असेल, कधी ती आटल्यासारखी दिसेल, पण ती कोणत्याही अवस्थेत असली तरी समुद्राकडे म्हणजेच विराटाकडे, विशालाकडे जाण्यासाठी वाट शोधीत असते असे रसिकाला ते आश्वासन देतात.

ती खडकाळ प्रांतांतून निघाली, कुणी वाटाड्या तिला मिळाला नाही किंवा त्याची वाट न पाहता ती स्वतःच आपली वाट शोधीत निघाली. तिच्या तीरावर रम्य राउळे किंवा कलापूर्ण घाट नसतील, पण तुरळक का होईना, सजीव वेली निश्चितच आहेत असे त्यांचे म्हणणे. या त्यांच्या आत्मनिवेदनात जशी लीनता आहे तसाच रास्त आत्मविश्वासही आहे.

आपली कविता सगळ्याच रसिकांना सारखीच रुचेल असे नाही. कुणी तुष्ट होईल तर कुणी शाप सुद्धा देईल याचीही त्यांना जाणीव आहे.

'आपल्या कविता म्हणजे समिधाच आहेत. त्यात ओलावा किंवा मकरंद शोधू नका. त्यांना फुलवायचा आहे तो तुमच्या प्राणातला अग्नी. त्यापरती अन्य आकांक्षा त्यांना नाही,' असे त्यांचे सांगणे आहे. आपला 'विशाखा' कवितासंग्रह रसिकांना सादर करताना स्वतःच्या कवितेविषयी कुसुमाग्रजांना काय वाटत होते हे समजून घेण्याच्या दृष्टीने ही कविता फार महत्त्वाची आहे. नवोदित असतानाही आपल्या कवितेविषयी ते किती डोळस होते हे या कवितेत आपल्याला दिसून येते.

त्यांच्या कवितेमुळे ते आता दूरस्थ राहिलेले नाहीत, तर असंख्य मराठी रसिकांचे अंतरस्थ झाले आहेत हे कुणी तरी त्यांना सांगायला पाहिजे.

## २५ किनारा

वादळी दर्याची मुशाफरी संपण्याच्या बेतात आली आहे. किनारा दृष्टीच्या टप्प्यात आला आहे. ज्यासाठी मोठमोठ्या नेत्यांनी स्वतःची जीवने होमून घेतली ते श्रेय पदरी पडण्याचा मंगल समय येऊन ठेपला आहे. आयुष्यभर कवीने ज्याचा ध्यास घेतला, जे यावे म्हणून रक्त आटवले ते स्वातंत्र्य आपल्या देशाला निश्चित मिळणार अशी लक्षणे दिसताच त्याला जो हर्ष झालेला आहे तो या कवितेच्या शब्दाशब्दातून ओसंडत आहे. 'तमाला जणू अग्निचा ये फुलोरा' या एकाच ओळीत तो कसा लखलखून उठतो पहा. पण या हर्षामुळेच स्वातंत्र्याच्या नाविकांना शैथिल्याची बाधा होऊ नये म्हणून आपल्यासाठी ज्यांनी स्वतःची जीवने होमून

घेतली त्या नेत्यांची कवी त्यांना आठवण देतो आणि म्हणतो,

तयांच्या स्मृती गौरवे वन्दुनी
उभे अंतिच्या संगरा राहुनी
किनाऱ्यास झेंडे जयाचे उभारा
आला किनारा

हर्षात सुद्धा आपल्या जागण्याच्या कर्तव्याला कवी विसरत नाही. संग्रामाची शेवटची शर्थ हीच पराक्रमाची आणि निष्ठेची खरी कसोटी हे त्याला माहीत आहे.

## २६ वर्षागमन

भव्यतेत रमणाऱ्या कुसुमाग्रजांच्या कल्पकतेचा हा आणखी एक विलास. कृतांतसदृश ग्रीष्माचे रुद्रभीषण दहनसत्र विझवीत येणाऱ्या वर्षागमाचे अत्यंत वत्सल आणि संजीवक चित्र त्यांनी या कवितेत उभे केले आहे.

सजल श्याम घन गर्जत आले बरसत आज तुषार
आता जीवनमय संसार

या पालुपदाच्या पहिल्याच ओळीसरशी वर्षागमाची ललकारी जशी आपल्याला जाणवते तसाच अशा वेळचा आपला उत्स्फूर्त हर्षोद्गारही ऐकायला मिळतो. त्यामुळे ही कविता आपल्या मनाची चटकन पकड घेते. पहिल्या कडव्यात ग्रीष्माचे थरकाप उडवील असे चित्र उभे केल्यावर त्याच्या दाहक संचाराचे तितकेच समर्थ रेखाटन ते करतात आणि मग माती, तृणबीजे, काळे डोह, रित्या नद्या, सुकलेले निर्झर, भकास राने आणि उदास डोंगर या सर्वांच्या जीवनात औत्सुक्य, आनंद आणि कृतज्ञता यांचे उमाळे कसे उठतात यांचे रसभरित वर्णन करतात. या हृदयंगम निसर्गचित्रात त्यांनी मानवी भावभावनांचे लोभसवाणे रंग इतक्या निपुणतेने भरले आहेत की ही कविता केवळ निसर्गवर्णनात्मक न राहता भावकवितेची पातळी गाठते.

## २७ विराट वड

नवीन पालवी क्वचित कोठे
जुनाट पानाचा देठ न तुटे

अशा अवकळेला पोचलेल्या एका विराट वडाची ही एक केविलवाणी कथा. त्याची जीवनशक्ती पार तुटली आहे आणि जिजीविषेही संपली आहे. एकेकाळी तो

अत्यंत समर्थ होता, पण आज

गिधाड घुबडें धरून शिरी
कोकीळ पूर्वीचे स्मरतो उरी

अशी त्याची स्थिती आहे. जुनाटपणामुळे तो आता सगळ्यांनाच भयप्रद झाला आहे. कुणी त्याच्या जवळपास देखील फिरकत नाही. असे हे केविलवाणे जीवन त्याला कायमचे संपवायचे आहे. साध्या करवत-कुऱ्हाडीने आपल्याला गती मिळणार नाही. तशी गती फक्त आकाशीची वीजच काय ती आपणाला देऊ शकते हे कळून चुकल्यामुळे आशाळभूतपणाने तो आकाशातल्या त्या रुपेरी रेषेची वाट पाहात आहे. या कवितेतला वड हे एक प्रतीक आहे. ज्या जुनाटपणाचा 'संस्कृती संस्कृती' म्हणून आपण उदो उदो करीत असतो त्याचा भयाणपणा कवीने येथे समर्पकपणे चित्रित केला आहे आणि जालीम उपायांनी त्याचा निरास होणेच इष्ट असे सुचवले आहे. एकेकाळी अत्यंत कर्तृत्ववान असलेला माणूस किंवा समाज जेव्हा जुनाटपणाच्या आहारी जातो आणि आपली जीवनशक्तीच गमावून बसतो तेव्हा अशी मरणाची वाट पहात बसण्याशिवाय त्याला अन्य गतीच उरत नाही हे विदारक सत्यच कवीने प्रतीकात्मक पद्धतीने येथे मांडले आहे.

## २८ मायदेशाचा वारा

मायदेशापासून दूर असलेल्या कवीच्या अंगावरून गार आणि सुखद अशी झुळूक गेल्याबरोबर त्याच्या गावाकडच्या सगळ्या स्मृती त्याच्या मनात गर्दी करू लागतात. तिथल्या द्राक्षांच्या बागा, नागवेलींचे मांडव, विहिरीवरची गाणी, काळीतून वाहणारे पाट, नदीकाठची हिरवीकंच वृक्षराजी, कौलारांवरून वळत वळत अंतर्धान पावणाऱ्या धुराच्या रेषा, रसरसती पहाट, निशिगंधाने चिंब झालेली चांदरात, जात्यावरच्या ओव्या अशा कितीतरी दृश्यांनी त्याचा जीव कावराबावरा होतो. पण ही त्याची मनःस्थिती अधिकच व्याकुळ होते ती आपल्या एकाकीपणावर अश्रुसिंचन करीत बसलेल्या मधुराणीच्या हृदयातील आर्त करुण विराणीने. बाकी सर्व चित्रे मागे पडतात आणि ती विराणी मात्र त्या वाऱ्यावर सारखी लहरत राहिली आहे असे त्याला वाटते. 'गोदाकाठचा संधिकाल' या कवितेशी ही कविता पडताळून पाहण्यासारखी आहे.

## २९ उत्तररात्री

उत्तररात्रीच्या निवांताचे कुसुमाग्रजांना विलक्षण वेड आहे. त्यांनी त्यांचा आस्वाद घेत रात्रीच्या रात्री घालवल्या असतील. कदाचित त्याचमुळे,

त्या गहन अभावावरी तरंगत तारे
जणु कबरीवरती कुसुमांची बरसात

या अवघ्या दोन ओळींत त्या निवांताचे वेधक चित्र ते उभे करू शकतात. तेव्हाच्या निद्रिस्त जगातून कधी मंदपणे फिरणाऱ्या तर कधी गस्त घालीत घोंगावणाऱ्या वाऱ्याला

वा स्मशानभूवर भ्रमे एकला कोणी
मरणाचे इंधन सारित वेडा पीर !

अशी उपमा देऊन त्या वातावरणात त्यांनी अद्‌भुत आणि भयानक यांची भर टाकली आहे. सगळे व्यवहार थांबले आणि राजरस्ते रिकामे झाले या साध्या गोष्टी ते किती काव्यमयतेने सांगतात :

ती सुवर्णयात्रा खंडित घडिभर झाली
बाजारपथांच्या झाल्या रिक्त पखाली

त्यांच्या या शब्दप्रभुत्वाने आपण विस्मयचकित होतो. आकाशपुष्पांचे विशालस्वप्न पाहता पाहता निद्रावश झालेल्या वसुंधरेचे चित्रही असेच स्तिमित करणारे आहे.

पण या कवितेचा खरा गाभा आहे तो कवितेच्या शेवटच्या कडव्यात.

घन तमीं शुक्र बघ राज्य करी
रे ! खिन्न मना, बघ जरा तरी

अशाच अर्थाचे उद्‌गार येथेही आहेत, पण येथे त्यांना विलक्षण उत्कटता आली आहे. कवीचा जीव इथे निष्कारण जागा नाही. कसल्या तरी अनामिक व्यथेचे दाहक दिवे त्याच्या काळजात जळत आहेत.

शुक्राचा तारा तळपत देख उदेला
विश्रांत सख्या हो, ओसरते ही वेला !

या उद्‌गारांतले आश्वासन काही आगळेच आहे. वेळ ओसरत आहे. ती वाया जाऊ देऊ नकोस हा इशाराही अर्थपूर्ण आहे.

## ३० प्रीतीसाठी प्रीती

'प्रीतीसाठी प्रीती' या कवितेशी 'उषा-स्वप्न' आणि 'स्वप्नांची समाप्ती' या कविता पडताळून पाहिल्या तर कवीच्या प्रीतिविषयक भूमिकेत कोणते परिवर्तन घडले आहे हे सहज लक्षात येईल. त्या दृष्टीने या कवितेला महत्त्व आहे. 'उषा-

स्वप्न' या कवितेतली कवीची वृत्ती अशी आहे की प्रीतीचे एक तरी स्वप्न 'जिवा-भावाने सांभाळावे. ' स्वप्नाची समाप्ती ' या कवितेत ही वृत्ती थोडी बदलली आहे. येथे कवीला वास्तवाची कठोर अपरिहार्यता पटली असल्यामुळे त्याची वृत्ती स्वप्नांना आवर घालून वास्तवाशी मिळते घेण्याची आहे, तर या कवितेत ती वृत्ती अधिकच विवेकी झाली आहे. या अशाश्वत जगात जर सारेच अशाश्वत तर प्रीती तरी शाश्वत काय म्हणून मानावी ? त्यापेक्षा भविष्याची निष्कारण चिंता करीत न बसता समोर आलेल्या क्षणाचे सोने करून समाधान का मानू नये ? अशी तिची भूमिका आहे.

## ३१ निळा पक्षी

उषःकालचा हा सुंदर निळा पक्षी म्हणजे बाळपणीच्या आपल्या मनाची निरागसता. निळ्या पक्ष्याच्या रूपकातून त्याची स्वप्नशीलता, लाघव, मार्दव यांचे बहारदार चित्र कवीने येथे रेखाटले आहे. अशी ही निरागसता म्हणजे आकाशाचा आशीर्वादच, या एकाच उद्गारात तिचे सर्व श्रेयस सुंदर रीतीने व्यक्त झाले आहे. ती निरागसता आता प्रौढत्वाबरोबर मावळली आहे आणि संसाराच्या झळा तेवढ्या सोसण्याची पाळी आली आहे ही येथे कवीची खंत. निरागसतेचा सहजसुंदर लोभसपणा आणि ती हातची निसटल्याची हळहळ बालकवीच्या नाजुक कुंचल्याने कवीने येथे चित्रित केली आहे.

## ३२ ताजमहाल

या कवितेच्या पहिल्या आठ कडव्यांतून कुसुमाग्रजांच्या सौंदर्यवेधी मनाने एकाहून एक वरचढ अशा उत्प्रेक्षांचा ताजमहालच उभा केला आहे. या आठ कडव्यांपैकी चौथे कडवे शेवटी घेऊन जर ही कविता संपवली असती तर कलादृष्ट्या ती कितीतरी अधिक परिणामकारक ठरली असती. ' तळिं समाधिस्त ही पण कारुण्य अपार ! ' ही समर्थ ओळ रसिकाच्या चित्तात नवनवीन भाववलये आणि विचारतरंग निर्माण करण्यास पुरेशी होती. पण स्पष्टीकरण करण्याचा मोह आडवा आल्यामुळे कवितेच्या रसप्रतीतीत विक्षेप मात्र निर्माण झाला.

## ३३ उषा-स्वप्न

येथे उषेने, आपल्याला पडलेले अनिरुद्धाचे स्वप्न, सखीला अत्यंत मुलायम आणि रेशमी रंगांत वर्णन करून सांगितले आहे. तिच्या स्वप्नाचे चलच्चित्र जसे

चित्तवेधक आहे तसेच ते तिच्या मुग्ध भावभावनांचा बारीकसारीक तपशीलही व्यक्त करणारे आहे. चित्रणाचा सारा बाज कालिदासी थाटाचा वाटतो. तसा तो वाटावा म्हणूनच तर कवीने संस्कृतातले अक्षरगणवृत्त येथे वापरले नाही ना, अशी शंका येते. मात्र मात्रावृत्तात ही कविता अधिक खुलली असती असे वाटते.

## ३४ जीर्ण देवळापुढे

पडक्या देवळाच्या पायऱ्यांवर एक क्षीण एकाकी पणती जळत आहे. उदास अंधार, भयाण एकान्त, घाटातल्या चिऱ्यांत कुजबुजणारे नदीचे पाणी, आणि शिशासारखी दाटून आलेली रात्र असे सारे चित्र. कातर वेळेचे वातावरण, देऊळ पडके, आत मूर्ती देखील नाही आणि तरीही ती पणती बिचारी जळतेच आहे. भीती आणि शंका आवरून अफाट पसरलेल्या काळोखावर तेजाच्या कणिका ढाळतेच आहे. आपल्या व्यक्तित्वाचेच रूप कवी या पणतीत पाहात असेल का? एवढे खरे की ही कविता खोल कुठे तरी आपल्याला चटका लावते. आपण आपलाच ठाव शोधू लागतो आणि असे वाटते की हीच या कवितेची फलश्रुती.

## ३५ समाधान

खुज्यांच्या आणि मूर्खांच्या या जगांत आदर्शांचे वेड घेतलेल्या जिवाने निष्कारण आपला तिळपापड करून घेण्यात काय अर्थ? वारुळांतल्या मुंग्यांची घालमेल आणि धावपळ तटस्थपणे पाहून जशी आपण करमणूक करून घेतो तशाच वृत्तीने या जगाच्या व्यवहाराकडे आपण पाहिले पाहिजे आणि स्वतःची जाणीव उन्नत आणि उदात्त करीत विश्वतादात्म्यात समाधान मानले पाहिजे असे म्हणत कवी येथे समाधान मानून घेत आहे आणि जगाने दिलेले ताप-संताप विसरण्याचा प्रयत्न करीत आहे.

## ३६ पाऊलचिन्हे

ही छोटीशी कविता एका चमत्कृतीवर आधारलेली असली तरी अवघ्या चार शब्दांत ती फार मोठा आशय सांगून जाते. ईश्वरी अस्तित्वाबद्दल साशंक असलेला माणूस नक्षत्रांना विचारतो, ‘ तुम्ही तरी त्याला पाहिले आहे का? ’ ती उत्तर देतात, ‘ काळोखावर उठलेली त्याचीच पावले अशी जी आम्ही त्यांनाच तू ‘ तो आहे की नाही ’ हे काय विचारतोस? ’ खचलेल्या अवस्थेत नक्षत्रखचित

आकाश पाहून ज्याची श्रद्धा सावरली गेली त्याला या कवितेचा अभिप्राय सहज उमगेल.

## ३७ फेरीवाला

ही कविता ' जा जरा पूर्वेकडे ' या कवितेशी पडताळून पाहिली म्हणजे संस्कृतीचे पवाडे गात पुढारलेली राष्ट्रे जो युद्धाचा भस्मासुर उभा करतात आणि त्यातून आजवरच्या सर्व मंगल मूल्यांची जी होळी रचतात तिच्याविषयी कुसुमाग्रजांना केवढी चीड आहे हे सहज लक्षात येते. या कवितेत युद्धाचा हा भस्मासुर– प्रत्यक्ष काळच– फेरीवाल्याचा वेष घेऊन आला आहे. त्याचें रूप, वेष, गती आणि आपला माल खपवण्यासाठी तो वापरीत असलेली थंड पण काळजाचे लचके तोडणारी भाषा आपल्यापुढे त्याच्या निर्घृण विध्वंसक सामर्थ्याचे विलक्षण नाट्यमय असे जिवंत चित्र उभे करतात. आजच्या तथाकथित संस्कृतीमागचे विदारक ढोंग शेवटच्या कडव्यात विशेष तीव्रतेने स्पष्ट होते.

## ३८ नौका

जीवनसागराला पालाण घालायला निघालेल्या या नौका विदग्ध साहित्याच्या आहेत. असल्या या नौकांचा संचारसोहळा रंगवताना कवीने साहित्याचे उद्दिष्ट, ऐश्वर्य आणि फलश्रुती मोजक्या शब्दांत सुंदर रीतीने सचित्र केल्या आहेत.

## ३९ कलंदर

माणसाच्या आत्मतेने अहंतेची मर्यादा कायमची ओलांडली आणि 'हे विश्वचि माझे घर' ही भावना त्याच्या ठिकाणी स्थिर झाली की' अवघाची चराचर। आपणचि जाहला ' अशा अवस्थेत तो कोणती प्रतिष्ठा पावतो ते ह्या कवितेत अत्यंत सुभग शैलीत दाखवले आहे.

## ४० पालखी

पहाटेच्या काळोखातील कवीला जाणवलेला एक दिव्य भास या कवितेत शब्दबद्ध झाला आहे. निद्रा आणि जागृती, लौकिक आणि अलौकिक, वास्तव आणि स्वप्न यांच्यामधील सीमेवर या भासाचा अवतार झालेला आहे. खूप दूरातून आलेल्या घंटानिनादांच्या लहरींवरून एक लाल पालखी हेलावत चालली आहे. तिचा

मागही तिच्यासारखाच दिव्य आणि अद्‌भुत. अशा मार्गाने मिरवत जाणारी ही वैभवसंपन्न पालखी कवीच्या दारावरून जाते आणि तिच्या किनखापी पडद्यातून एक सकंकण हात तेवढा विजेसारखा त्याची नजर बांधून जातो. हा हात कुणाचा ? प्रतिभेचा ? प्रेयसीचा ? की या भासात या दोन्ही छटा एकमेकीत एकजीव झाल्या आहेत ? हा जो संभ्रम येथे निर्माण होतो त्यातच या कवितेचे सारसामर्थ्य एकवटले आहे.

## ४१ पहाटपक्षी

शेलेची 'स्कायलार्क' आणि कालिदासाचा 'मेघदूत' तसा हा कुसुमाग्रजांचा पहाटपक्षी. पण त्या दोघांचे सत्त्व आणि सौंदर्य आत्मसात करून स्वयंशक्तीने उदात्ताच्या आकाशात तो विहार करीत आहे.

## ४२ रे परत पांखरा

गती हाच ज्याने धर्म मानला, आकाश-नीलिम्यांतच आपला देव पाहिला आणि दृष्टी जाईल तिथले सौंदर्य टिपून स्वरांच्या सुवर्णरेषांनी दिगंतात आपली स्वप्ने चितारली असे वेल्हाळ पाखरू दिवसाची आपली 'रसयात्रा' संपवून वाढत्या काळोखात परतत असताना त्याच्या जीवनाची सार्थकता ओळखून कवी त्याला म्हणतो : 'तूं तुझ्या रसयात्रेने कृतार्थ आहेस. याच कृतार्थतेत आपल्या घरट्यात निश्चित विसावा घे. उद्याचे कुणी पाहिले आहे ?' कवी कदाचित आपलेच रूप त्या पाखरात पाहात स्वतःचे असे सांत्वन करीत असेल.

## ४४ तुझे गीत

आपल्या जिवलग जिवाचे गीत स्वतःच्या अपार कोवळेपणाने कधी कधी काळजाची जिव्हाळी काढून जाते. व्यवहाराच्या दाहाने पोळलेल्या जिवाला ती व्यथाच सुखाची शिदोरी होऊन बसते. हा मधुर भाव त्या गीताच्या कोवळेपणाचे लाड करीत मोठ्या नाजूकपणाने येथे सांगितला आहे.

## ४५ नाही

प्रीतीच्या व्यथेने पोळलेल्या निष्ठावंत, उन्नतमनस्क पण मानी अशा प्रियकराचे हे उद्गार जिवाला चटका लावणारे आहेत. संयमामुळे त्याच्या प्रीतीला

भक्तीचा जो गहिरेपणा आला आहे आणि त्याच्या आत्मतेला जो डौल लाभलेला आहे त्यांच्यामुळे तर हे उद्गार रसिकाच्या मनांत दीर्घकाल घर करून राहतात.

## ४६ शिलारूप मी

अंतःकरणाचीच परडी करून आपल्या पूजेसाठी आलेल्या लावण्यमयीच्या दर्शनाने मनात तिच्याविषयी अभिलाषा निर्माण होणे याच्यासारखा दुस्सह शाप नाहीं. त्यामुळे चित्ताची निरागसता मावळते आणि देवत्व लोप पावून शिलेचे जीवन वाट्याला येते. सारा लौकिक थोरवीचा पसारा कारागृह होऊन बसतो. अभिलाषेतून मुक्त न झालेल्या पराक्रमी पुरुषाची ही व्यथा कवीने येथे चार फटकाऱ्यांत उभी केली आहे. ‘ परत केधवा येशिल, जळते–शिळेमधे अंतर ! ’ या उद्गाराने तर ही व्यथा तीव्र घाव घालून जाते.

## ४८ अशब्द

या शब्दचित्रांत रेखाटलेली प्रेयसी जितकी प्रेमभावनेत उत्कट आहे तितकीच संयमीही आहे. अकस्मात आपला प्रियकर दिसल्यामुळे ती संकोचाने गोंधळून जाते. तिने आवरून धरलेला भाव तिच्या अंगप्रत्यंगांतून फुटू पाहतो. त्यामुळे तर ती जास्तच लोभसवाणी दिसते. त्यावेळीं तो तिला म्हणतो :

नको सांगूस कधीही
काय सांगायाचे आहे
अशा भाव-मोहनाचा
अंत अक्षरांत आहे.

शेवटच्या दोन ओळींच्या सुभाषिताने तर कळसच केला आहे. ती सांगायचे सांगून गेली तर प्रीतीचे सारे मांगल्य क्षणात मातीमोल होईल अशी त्याला भीती वाटते. ही कविता ‘ नाही ’ या कवितेशी पडताळून पाहावी.

## ४९ स्मरण

प्रीतीच्या दिव्याग्नीने पेटलेले दोन जीव ते चार क्षण उल्कांसारखे एकमेकांना अंतराळात भेटतात. पुढे पृथ्वीवर कोसळल्यावर त्यांनाही मातीची अवकळा येते. पण दिव्य भावांनी नटलेले ते चार क्षण जीवनाला आयुष्यभर बिलगून राहतात. त्यांची महत्ता कवीने येथे गायली आहे आणि त्यांच्या संजीवक आठवणीत समाधान मानले आहे.

## ५० मूर्ती

तुझी घडण जात्याच संगमरवरी शिल्पासारखी आहे. मी मात्र त्यात उगीच तऱ्हेतऱ्हेचे कोमल भाव वाचले आणि अहंकाराला वश होऊन स्वतःची फसवणूक करून घेतली. तुझ्या देवळातला मी काही एकमेव भक्त नाही हे त्याच अहंकारामुळे इतका वेळ माझ्या लक्षात आले नाही; असे म्हणून प्रियकराने येथे प्रेयसीचे लावण्य, तिची भावनिक अक्षमता आणि स्वतःची अहंमूलक फसवणूक यांचा एकाच वेळी मार्मिक आणि मर्मभेदक संकेत केला आहे. 'संगमरवरी मूर्तीचे तव स्नेहल डोळे' या एकाच अर्थपूर्ण उपमेने ही कविता शेवटपर्यंत कशी पेलून धरली गेली आहे; आणि त्याचमुळे ती कशी परिणामकारक झाली आहे हे पाहण्यासारखे आहे.

## ५१ मातीचे गायन

पृथ्वीतत्त्वाला आकाशतत्त्वाची जी स्वयंभू ओढ आहे तिच्यातूनच प्रीतीचा उगम असतो. या धारणेवर या प्रेमगीताची उभारणी आहे. स्त्रीरूप घेतलेले पृथ्वी-तत्त्व आपली सनातन आकांक्षा येथे जिवाभावाने बोलून दाखवते, त्यामुळे प्रेमगीताला उदात्ताची झळाळी लाभली आहे.

## ५२ आम्ही दोघे

माणूस म्हणजे जिवाशिवाची जोडी. जीव लौकिकाला चटावलेला तर शिव अलौकिकात निमग्न असलेला. एक भोगी आणि दुःखीकष्टी तर दुसरा त्यागी आणि सदासुखी. पिंडतः त्यांच्यात सख्य आहे आणि प्रत्यक्षात विग्रह आहे ही भारतीय तत्त्वज्ञानातली फार जुनी कल्पना आहे. तिलाच कुसुमाग्रजांनी येथे सुंदर काव्यरूप दिले आहे. जिवाशिवाचा विग्रह मिटणे हीच मुक्ती हा वेदान्ताचा विचार, पण 'दोन ध्रुवांचे मीलन येथे दोन ध्रुवातिल राखुनि अंतर!' ही वस्तुस्थिती देखील कवीला पुरेशी वाटते.

## ५३ लाट तेजाची

जीवनाच्या सगळ्याच क्षेत्रांत आजकाल प्रचंड उलथापालथी चालू आहेत. त्या पाहून आपण स्तिमित होतो आणि त्यात हे जग रसातळाला तर जाणार नाही अशा शंकेने अनेकदा अस्वस्थही होतो. पण कुसुमाग्रजांना अशा लक्ष शून्यातून देखील जीवनाचा नवा नाद ऐकू येतो आणि काही नवे श्रेय आकारत असल्याचा

भास होतो. साऱ्या स्थिरचरातून तेजाची एक नवी लाट उफाळून येत आहे आणि रडण्याकण्हण्याचे पर्व संपून चिखलाच्या डोळ्यावर सोनेरी रेघांचे स्वप्न उमलत आहे असे आश्वासन ते आपल्याला देतात.

## ५४ ध्रुवपद

विज्ञान, वेदान्त आणि वाङ्मय यांच्या विकासाबद्दलच्या ज्या गोष्टी तुम्ही सांगता त्या खऱ्या असतीलही, पण जोपर्यंत तुमच्यातली खरीखुरी करुणा जागी होऊन या जगाचे दारिद्र्य, दैन्य आणि दुःख यांचा निपटा तुम्ही केला नाही तोपर्यंत तुम्ही सांगता तो सारा विकास फोल, वांझोटा आणि प्रलयंकर आहे. जगाच्या या दुःखत्रयीला आहे ती फक्त आंधळी जहरी प्रचंड गती. तिच्या पायी होऊ घातलेला सर्वनाश टळावा एवढ्याचसाठी या दुःखत्रयीच्या निरासाचा ध्यास माझ्या गीताने घेतलेला आहे, तेच त्याचे ध्रुवपद आहे असे कवी येथे जीव तोडून सांगतो.

## ५५ खुलदाबाद

निश्चेष्ट आणि भकास अशा कालग्रस्त खेड्याचे हे एक वास्तव आणि तितकेच काव्यमय चित्र. जितके बिनचूक तितकेच चटका लावणारेही.

## ५७ मौन

उत्कट शोक मौनानेच समर्थपणे व्यक्त होतो, जेव्हा ते मृत्यूइतकेच गहन, गूढ आणि अनाकार असते तेव्हा, ही या कवितेची मध्यवर्ती कल्पना. येथे शोकानेच विचाराचे स-घन रूप घेतले आहे.

## ५८ आग्ऱ्याच्या किल्ल्यात

आग्ऱ्याच्या किल्ल्यात शिवछत्रपतींचे पाऊल पडले तो क्षण कुसुमाग्रजांना मानवी मूल्यांच्या दृष्टीने क्रांतिकारक आणि युगप्रवर्तक वाटतो. कारण त्या क्षणी अभयाने दंभावर, प्रांजलपणाने कपटावर, साधेपणाने दिमाखावर आणि स्वातंत्र्य-निष्ठेने शाही लाचारीवर डोळे दिपवणारी मात केली असे ते मनःपूर्वक मानतात आणि त्याचमुळे त्यांनी तो तितक्याच ऊर्जस्वल प्रतिमांनी चितारला आहे.

## ५९ प्रवास

प्रीतीने पेटलेल्या क्षणी जीव हा उल्केसारखा असतो ही कल्पना ‘ स्मरण ’

या कवितेत आधी येऊन गेली आहे. ध्येयवाद ओसरल्यावर तोच जीव व्यावहारिक शहाणपणांत कसे समाधान शोधतो हे कवीने येथे उपहास करीत सांगितले आहे.

## ६० निराकार

प्रेमाची उपेक्षा किंवा अवहेलना झाल्यानंतर जाणवणाऱ्या अनाम, अरूप, आणि अनाकार दुःखाला शब्दांत धरण्याची येथे धडपड आहे. आटलेल्या पाण्याने ढगाचा आकार घेण्याआधी त्याची जी तगमग चालते त्याच्याशी तिचे साम्य कल्पून कवीने ती किती मूर्तिमंत केली आहे !

## ६२ मला हवा तो

एक वय असे असते की जेव्हा मुग्धेला किंवा ध्येयलोभी जीवनपथिकेला एकाच वेळी अनेक गोष्टी आकर्षित करतात; पण त्यांतल्या कुणाला आपली निष्ठा जन्मभर वाहावी याचा निर्णय मात्र करता येत नाही. या विभ्रमशीलतेचे हे एक सुरेख चित्र.

## ६३ पुनव

कार्तिक-पुनवेच्या विशुद्ध लावण्याने हरखून फुललेल्या मनाचा प्रीतिभाव कोमल संस्मरणांनी येथे मोहरला आहे.

## ६५ पणती

साधकाच्या प्रवासात एखादा क्षण असा येतो की जेव्हा त्याच्या सर्व शक्ती कुंठित होऊन तो दिङ्मूढ होतो, पण जीवनाची कृपा नेमक्या त्याच अभाव-स्थितीत त्याला आतून हाक देते आणि तीच पणती होऊन त्याला पुढची वाट दाखवते. असा हा जीवनसंक्रामक क्षण कवीने येथे निसर्गप्रतिमांतून चित्रित केला आहे.

## ६६ स्पर्श

जीवनदायी प्रेमस्पर्श, मग तो प्रिय व्यक्तीचा असो किंवा परमेश्वराचा असो, जवळ येतो आहे असे जाणवले की आर्त जीवाची जी कातर अवस्था होते ती येथे वर्णिलेली आहे.

## ६७ पांथस्थ

अज्ञाताची, असाध्याची ओढ माणसाला पुढे पुढे नेत असते. आधी त्याला उद्दिष्टाचे भान असते, तिथे पोचण्याची निकड असते. पण पुढे त्याला गतीचीच नशा चढते आणि तिच्यातच श्रेय आणि सांगता असल्याचे कळून चुकल्यामुळे उद्दिष्टाचे भान आणि तिथे पोचण्याची गरज होही उरत नाहीत. अखंड कर्मात मोक्ष तो हाच.

## ७० नदी

सर्वांची तहान भागवणारी आणि स्वतः सदाची तहानलेली ही नदी वास्तवांतलीच आहे असे आधी तिच्या लक्षणांवरून वाटते. पण ती भूतभविष्यही पिऊन वाहतेच आहे हे पाहिल्यावर कळते की ती आहे जीवनाची सर्वपोषक आणि सर्वभक्षक विराट नदी.

## ७१ अगतिक

पापाचा ठाव ज्याने डोळसपणे घेतला त्याला कळून चुकते की त्याचे अस्तित्वच भ्रामक आहे. त्याची गुहा म्हणजे आपणच कल्पनेने उभे केलेले भुताटकीचे घर. आपल्याच असंज्ञ, रुग्ण, निस्तेज, श्रांत आणि अगतिक अशा साकळलेल्या मनोदशेलाच आपण पाप ही संज्ञा देत असतो. जीवनाचा ? या क्षणी तुटलेला असतो एवढेच.

## ७२ गती

प्रत्येक कवीच्या काही लाडक्या कल्पना असतात आणि त्या वेगळ्यावेगळ्य तऱ्हेने खेळवणे हा त्याचा सहजछंद असतो. कुसुमाग्रजांच्या बाबतीत 'गती' ही एक अशी लाडकी कल्पना. 'पांथस्थ' या कवितेत ती कशी खेळवली गेली आहे हे आपण पाहिले आहे. त्याच कल्पनेचा आविष्कार इथे थोडा वेगळ्या तऱ्हेने झाला आहे.

## ७३ उषास्तवन

उषेचे दर्शन कुणालाही आल्हादक आणि संजीवक वाटतेच. पण कुसुमाग्रज तिच्याकडे आर्ष कवीच्या विस्मयचकित डोळ्यांनी पाहू शकतात आणि त्या दिव्य

दर्शनाने रोमहर्षित होतात. मग दारवेच्या पेटलेल्या झाडाप्रमाणे त्यांच्या पल्लवित प्रतिभेतून तेजस्वी उपमा-उत्प्रेक्षांचे कारंजे उसळते आणि त्यांतूनच आकारत, विलासत त्यांच्या कल्पनेतील उषा आपल्यापुढे साक्षात् होते. वेदकालीन ऋषी-कवींनी गायलेल्या उषासूक्तांत बराच वरचा पाट घेईल अशी या सूक्ताची योग्यता आहे. उषेच्या रूपाने त्यांनी अजर आणि अमर अशा मानवी संस्कृतीचेच दर्शन घेतले आहे असे म्हणता येईल.

## ७४ कैफ

व्यक्ती असो किंवा राष्ट्र असो, त्याने एकदा स्वतःभोवतालची दारे बंद करून घेतली म्हणजे असलेल्या ज्ञानाचा पिसारा झडून अज्ञानाचाच अंमल त्याच्यावर कायमचा कसा चढतो आणि त्याचे जीवन कसे साकळून बसते याचे हे एक करुण आणि अभ्यसनीय चित्रण.

## ७५ तो पक्षी

'पक्षी' ही कुसुमाग्रजांची आणखी एक लाडकी कल्पना. 'निळा पक्षी' या कवितेत त्यांनी जी कल्पना आणि तिच्याशी संबद्ध असलेली जी व्यथा आळवली आहे तिचाच अधिक विकसित आविष्कार आपल्याला या कवितेत आढळतो.

त्या पक्ष्याच्या
उरांत शिरला शर कोणाचा
　　कळले नाही
असेल माझा
ही शंका मज जाळित राही

या कवीच्या उद्गारांमुळे ती व्यथा इथे अधिक उत्कट झाली आहे.

## ७७ अतर्क्य

'निळा पक्षी' आणि 'तो पक्षी' या कवितांत वर्णिलेली व्यथा हे कुसुमाग्रजांच्या अंतःकरणातले एक खोल शल्य आहे. अलौकिक दुरावले आणि समंजसपणाच्या नावाखाली आपण लौकिकात सुरक्षितपणा शोधला ही जाणीव त्यांना त्रस्त करते. अशा वृत्तीचा त्यांना मनस्वी तिटकारा आहे आणि तोच या कवितेच्या रूपाने व्यक्त झाला आहे.

## ७८ मार्जिन

कुसुमाग्रज हे वाढत्या वयाबरोबर आणि अनुभवाबरोबर ते अधिकाधिक चिंतनशील कसे होत चालले आहेत याची साक्ष देणाऱ्या कविता अधिक संख्येने त्यांच्या 'विशाखा' नंतरच्या संग्रहांत आढळतात. हीही तशाच जातीची कविता. 'जोगीण' या कवितेत सुशिक्षित माणसाला नास्तिकतेचे आकर्षण वाटते, पण आस्तिकतेचा प्रभाव कसा बाजूला सारता येत नाही हे दाखवले आहे तर येथे ईश्वर नाही हे मान्य करूनही मंदिरातल्या तसबिरीतले किरीटधारी रूप पाहात राहण्याचे समर्थन तो कसे करतो हे दाखवून त्याच्यातल्या विसंगतीवर आणि दौर्बल्यावर बोट ठेवले आहे.

## ७९ सैनिक

या कवितेत सामान्य सैनिकाचे रोजचे कष्टमय जीवन आणि रणांगणातले त्याचे उदात्त समर्पित जीवन यांच्या विरोधातून त्याची महती दाखवून कवीने पर्यायाने त्याला आपला कृतज्ञतेचा अंजली वाहिला आहे आणि त्याचबरोबर रंगभूमीवरच्या दिखाऊ वीरश्रीला टाळ्या पिटणारी आग्ही कारकुनी वृत्तीची माणसे त्याच्या खऱ्या शौर्याविषयी किती उदासीन असतो हेही भेदकपणे सूचित केले आहे.

## ८० खाकी

हीही कविता सैनिकाच्याच थोरवीला वाहिली आहे, पण थोडी निराळ्या अंगाने. घरच्या दैन्याच्या पार्श्वभूमीवर त्याच्या ध्येयवेडाला उठाव देत आणि आपल्या भीरु आणि पामर सज्जपणाची लक्तरे उघडी पाडीत. विजयी सेनापतींचे गुणगान अनेकांनी केले आहे, पण कुसुमाग्रजांनी या दोन्ही कवितांतून सामान्य सैनिकाचे निरपेक्ष ध्येयवेड रंगविले आहे हा या कवितांचा लक्षणीय आणि अभिनंदनीय विशेष.

## ८१ मीच

सृष्टीची प्रसन्न किंवा विषण्ण विलसिते ही आपल्याच मनाचे विभ्रम होत. मनाने निर्माण केलेल्या मायानगरीतच आपले आयुष्य सतत घिरट्या घेत असते या कल्पनेवर ही कविता आधारलेली आहे.

## ८२ स्मरण

पारतंत्र्याचा काळोख संपून आपण स्वातंत्र्याच्या प्रकाशात आलो; जीवन आपल्या अखंड गतीने पुढेच जात राहणार आहे. पण हे भाग्याचे दिवस ज्यांच्यामुळे प्राप्त झाले त्यांच्या हालांची, विपत्तीची आणि बलिदानाची थोडी आठवण ठेवा असे सांगून कवी पर्यायाने त्यांना येथे आपली कृतज्ञता वाहात आहे.

## ८३ हा चंद्र

विज्ञानाच्या साहाय्याने माणूस ज्याच्यावर उतरू पाहातो त्या चंद्रावर एकदाचे त्याचे पाय लागल्यावर आपल्या काव्यमयतेला उत्तेजित करणाऱ्या चंद्राचा प्रभाव ओसरेल काय या प्रश्नाला कवीने दिलेले हे बिनतोड उत्तर आहे. त्या चंद्राचे या चंद्राशी कसलेच नाते नाही आणि म्हणून विज्ञानाने केवढीही प्रगती केली तरी हा चंद्र अक्षयच राहील असे त्यांचे सांगणे आहे आणि ते अत्यंत उद्‌बोधक रीतीने त्याने सांगितले आहे.

## ८४ एका टक्केवाल्याचे मत

प्रत्येक गोष्ट टक्क्यात मोजणारा एक माणूस ठिकठिकाणी दिसून येणारे वैवाहिक सुख टक्केवारीत येथे सांगत आहे आणि ते शंभर टक्के लाभावे या अपेक्षेतला फोलपणा दाखवीत आहे.

## ८५ वगैरे

या कवितेत प्रेमाच्या विविध अभिव्यक्ती सांगून देखील त्यांच्यासाठी वापरात असलेले रूढ शब्द कवीस अपुरे वाटतात आणि म्हणून ‘फक्त’, ‘वगैरे’ सारखे अनाकार शब्द त्याला अधिक बरे वाटतात. प्रीतीचा गंभीर भावच पण येथे थोडा मिस्किलपणे सांगितला गेला आहे.

## ८६ बेसूर

प्रेयसीचे आपल्याविषयीचे भाव वात्सल्याचे आणि उदात्ततेचे असल्याचे दिसल्यावर प्रियकराला त्या पार्श्वभूमीवर आपला साभिलाष प्रीतिभाव कसा विसंवादी आणि शल्यवत् वाटतो ते येथे सूचित केले आहे.



REF3K-0017550

## ८७ म्हणेन

अलौकिकाला धरण्यासाठी मी उद्या काही साहसे केली—मग ती पिंडाचा सहजधर्म म्हणून असोत, वंचनेपायीं असोत, कलासक्तीमुळे असोत किंवा अमरतेच्या फसव्या आशेमुळे असोत; आणि त्यातून माझा आगळेपणा—माझे अपार्थिव व्यक्तिमत्त्व तुला दिसू शकले नाही तर तुला झाला तो केवळ माझा वरवरचा परिचय, खरी ओळख नव्हे असेच मी म्हणेन, असे कवी येथे सांगतो आणि पर्यायाने सुचवतो की असले व्यक्तिमत्त्व ओळखते तीच खरी प्रीती.

## ८८ कोण

' आम्ही दोघे ' या कवितेशी ही कविता पडताळून पाहावी. आपल्या अंतर्गत विकासाच्या प्रकाशात येथे कवीला त्या दोघांचे तोंडवळे आणि स्वभाव अधिक स्पष्टपणे दिसले आहेत. रात्रभर ते चवताळून एकमेकांशी भांडले पण सकाळी त्यांतला एक निघून गेल्यावर कोण गेला आणि कोण राहिला याचे कवीला कोडे पडले. यावरून त्यांच्यातील विशिष्टाद्वैत त्याला चांगलेच उमगले आहे हे उघड आहे. असा गूढ अनुभवही कुसुमाग्रज किती ठळक रेषांत चित्रित करतात !

## ८९ झाड

अमावास्येच्या मध्यरात्री काळ्याकुट्ट वृक्षाच्या घनगर्द पालवीतून कोणत्यातरी पक्ष्याची प्राणांतिक किंकाळी कवीच्या कानावर पडते आणि त्याची करुणोद्भव कल्पकता त्या पक्ष्याच्या व्यथेचे कारण विश्वभर धुंडाळू लागते. कुणालाच तिची खंत नाही. सर्व आसमंत तटस्थ आणि चुपचाप आहे हे त्याला जाणवते. आपल्या भावनेचा ताण त्यालाही फार वेळ पेलवत नाही. तो रेडिओ लावून आश्वासनाच्या मोठ्या भिंती आपल्याभोवती उभ्या करतो आणि आपल्याला पक्ष्याचा जन्म लाभला नाही यातच समाधान मानतो. आकाशगामी जीवाच्या एकाकी उपेक्षित दुःखाचे भेदक चित्र जसे कवीने येथे गडद रंगात उभे केले आहे त्याचप्रमाणे ऐहिक शाश्वतीत उदासीनतेची ऊब शोधणाऱ्या पामर जीवनावर करडे भाष्यही केले आहे.

## काही जीवनलहरी

कुसुमाग्रजांनी आपल्या या जीवनलहरींसाठी जो पदप्रबंध वापरला तो मराठीला तसा नवीन नाही. पण ' जीवनलहरीला ' स्वयंपूर्ण कवितेचा घाट आणि ठळकपणा दिला



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

तो त्यांनीच. आपल्या काव्यसाधनेच्या आरंभकाळातच त्यांनी हा प्रकार हाताळायला घेतला. वेळोवेळी लिहिलेल्या सुमारे ६० जीवनलहरी १९३३ साली त्यांनी प्रकाशित केल्या होत्या. 'प्रत्येक जीवनलहरी प्रायः स्वतंत्र आहे. कल्पनेची, भावनेची विचाराची एखादी लहर प्रत्येकीत अनुस्यूत आहे' असे त्यांनीच प्रास्ताविकात म्हटले आहे. ही जीवनलहरी घटवता घटवता ती त्यांची किंकरी झाली. सुभाषिताची सूत्रमयता हा त्यांच्या 'जीवनलहरीं'चा ठळक विशेष आहे. येथे त्यांच्या २० निवडक जीवनलहरी दिलेल्या आहेत. रसिकाने निवांतपणे त्यातली प्रत्येक मनात घोळवीत तिचा आस्वाद घेतला तर तिची गोडी त्याला विशेष जाणवेल.

## सूर्यफूल

ही कविता चार जीवनलहरींत गुंफली गेली आहे. ज्या सूर्यफुलाचा भक्ती हाच धर्म त्याला सूर्य आपली पूजा पाहातो की नाही याची खंत नाही. समर्पणातच त्याची सार्थकता आहे. तोच त्याचा मोक्ष. या कवितेत सूर्यफुलाने केलेल्या आत्मनिवेदनातून 'प्रकाशपूजक' कुसुमाग्रजांचीच जीवनदृष्टी हृद्यपणे सूचित झालेली आहे.

—बा. भ. बोरकर